Visit **Dwarkadheeshvastu.com** For

**FREE** Vastu Consultancy, Music, Epics, Devotional Videos
Educational Books, Educational Videos, Wallpapers

****

All Music is also available in **CD** format. **CD Cover** can also be print with your Firm Name

****

We also provide this whole Music and Data in **PENDRIVE** and **EXTERNAL HARD DISK.**

Contact : Ankit Mishra ( +91-8010381364, dwarkadheeshvastu@gmail.com )

****

# UDDHAR KAISE HO

# (Marathi)

****

# विषय-सूची


| पत्रविषय | पृष्ठ | पत्रविषय | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १) इशारा | १ | २४) प्रेम आणि सेवा | ४३ |
| २) प्रेम आणि शरण | २ | २५) अनन्य प्रेम | ४४ |
| ३) प्रेम उत्पन्न होण्याचा उपाय | ३ | २६) मन स्थिर करण्याचा उपाय | ४५ |
| ४) निष्काम व्यवहार | ४ | २७) पूर्ण प्रेम कसे होईल ? | ४६ |
| ५) उद्धार कसा होईल ? | ५ | २८) अशोच्यानन्वशोचस्त्वम् | ४७ |
| ६) मृत्यूचा मुकद्दमा | ११ | २९) क्रोधनाशाचा उपाय | ४८ |
| ७) खरा सल्ला | १२ | ३०) प्रेम कसे वाढेल ? | ४९ |
| ८) वेळ कुठे ? | १५ | ३१) सगुणध्यान व मातृपितृसेवा | ४९ |
| ९) जीवन्मुक्तीचे कर्म | १६ | ३२) भगवत्कृपा व प्रेम | ५१ |
| १०) नाम आणि प्रेम | १९ | ३३) प्रभूचा प्रभाव, गुण आणि स्वरूप | ५८ |
| ११) हे पतित पावना ! | २१ | ३४) वैराग्य, प्रेम आणि ध्यान | ६० |
| १२) प्रयत्न का नाही करीत ? | २२ | ३५) 'मी' चा त्याग | ६३ |
| १३) भक्तीचा प्रवाह | २२ | ३६) इच्छा तेथे मार्ग | ६४ |
| १४) भगवंताचे अखंड स्मरण | २३ | ३७) प्रेमाची वागणूक | ६५ |
| १५) वैराग्य आणि प्रेमप्रतिज्ञा | २६ | ३८) मोहजालातून कसे सुटाल ? | ६५ |
| १६) वैराग्य आणि प्रेमाची हाक | २७ | ३९) भजनात प्रेम होण्याचा उपाय | ६६ |
| १७) ईश्वरप्रेमीच धन्य ! | ३० | ४०) श्रद्धा, सत्संग हाच उपाय | ६७ |
| १८) द्रष्ट्याचे ध्यान | ३२ | ४१) सच्चिदानंद परिपूर्ण आहे | ६८ |
| १९) प्रयत्न करा | ३४ | ४२) मरेन, पण मागणार नाही. | ६८ |
| २०) साधना | ३५ | ४३) 'मी' चा भाव जावा | ६९ |
| २१) जप, पाठ आणि जीवनाचे सार्थक | ३८ | ४४) व्यवहारसुधारणा आणि भक्ती | ७० |
| २२) जोपर्यंत मृत्यू दूर आहे ? | ४० | ४५) भ्याडपणा हाच मृत्यू | ७४ |
| २३) सत्संग | ४१ | ४६) विवेकीला सर्व दुःखच | ७६ |

हे सगळे पदार्थ तुमच्या काय कामी येतील ? एक दिवस सगळ्यांना इथून जायचे आहे. मृत्यू अटळ आहे. म्हणून जे काही करावयाचे ते लौकर करावयास हवे. अमूल्य श्वास व्यर्थ घालविणे उचित नाही, या उपर तुमची मर्जी.

## [ २ ]

स्वतःच्या स्वार्थासाठी कोणाकडूनही सेवा घेऊ नये. स्वार्थच पापाचे मूळ आहे. स्वधर्माकडे पाहाणे हेच माणसाचे कर्तव्य आहे. धन-दौलत तर सोडाच. पण जरी सर्वस्वाचा नाश झाला, तरी फक्त एका प्रभूवर भरंवसा ठेवून बाकी सर्वांचा आश्रय सोडावयास हवा. देवाच्या मनात जे असते, तेच घडते. मग चिन्ता कशाची ? त्याच्या प्राप्तीच्या प्रयत्नात सगळे गेले तरी बेहत्तर !

*'नारायण' होवे भले, जो कछु होवनहार।*
*हरिसों प्रीति लगायके, फिर कहा सोच विचार॥*

*लगन लगी सबही कहै, लगन कहावै सोय।*
*'नारायण' जा लगनमें, तन मन दीजै खोय॥*

प्रभूच्या मर्जीमुळे जरी आम्हांला नरकयातना भोगाव्या लागल्या, तरी त्याही आनंदाने भोगावयास हव्यात. जे काही होते ते प्रभूच्या नजरेखाली होते. त्याची नजर चुकवून काहीच होत नाही. असे असताना चिन्ता करून त्याच्या आश्रयात दोषी का ठरावे ? तो सर्वांठाई स्वयं सगुण किंवा गुणातील रूपाने विद्यमान आहे. मग तुम्हांला चिन्ता कसली ? प्रभूवर संपूर्ण विश्वास ठेवावयास हवा. जे काही घडेल, ते साक्षीभावाने पाहा. प्रभू जे काही करील, त्याचा आनंदाने स्वीकार करावयास हवा. त्याच्या विधानावर मन कलुषित करून तो संतुष्ट कसा होईल ? केवळ त्याच्या नावाचा जप केल्याने ध्यान आपोआप होईल. थोड्याच शब्दांत प्रेम आणि शरण याविषयीचा भाव लिहिला आहे. जेव्हा मन उदास असेल तेव्हा हे वाचावयास हवे.

## [ ३ ]

तुम्ही भगवंतावर प्रेम जडण्याचे उपाय विचारलेत ते ठीक आहे. प्रेम जडण्याचे पुष्कळ उपाय आहेत, त्यातील काही खाली लिहिले आहेत.

१. भगवद्भक्तांद्वारा भगवंताचे गुणगान, त्याचे प्रेम आणि त्याचा प्रभाव वगैरे गोष्टी ऐकण्याने अतिशीघ्र प्रेम जडू शकते. भक्तांची सोबत-संगत नसल्यास शास्त्राभ्यास सत्संगासमान असतो.

२. भगवंताच्या नावाचा जप निष्काम भावनेने व ध्यानसहित सतत केल्यावर भगवंतावर प्रेम जडू शकते.

३. भगवंताच्या मिलनाच्या तीव्र इच्छेनेही प्रेम वाढू शकते.

४. भगवंताच्या आज्ञेनुसार वागण्याने, त्याच्या मनाप्रमाणे चालण्याने भगवंतावर प्रेम बसू शकते. शास्त्राच्या आज्ञेलाही परमेश्वराची आज्ञा समजावयास हवी.

५. भगवत्प्रेमी भक्तांकडून ऐकलेल्या आणि शास्त्रांमध्ये वाचलेल्या भगवंताच्या गुणांविषयी, प्रभावाविषयी आणि प्रेमाविषयीच्या गोष्टी निष्काम भावनेने लोकांना सांगितल्याने भगवंतावर प्रेम जडू शकते.

वरील पाच साधनांपैकी केवळ एकाचे जरी नीट आचरण केले, तरी भगवंतावर प्रेम जडणे शक्य आहे. मानापमानाला समान समजून निष्काम भावनेने सर्वांभूती भगवंताचे स्वरूप बघून सर्वांची सेवा करावयास हवी. असे केल्यास ईश्वरकृपेने आपोआप प्रेम उत्पन्न होऊ शकते. सर्वांठाई परमेश्वर बघितल्यावर कोणाचाही राग येऊ शकत नाही. जर क्रोध आला तर समजावे की, अजून तो भाव आला नाही. चित्ताला कधी उद्वेग होता कामा नये. जे घडेल त्यात आनंद मानावयास हवा. कारण जे काही घडते, ते प्रभूच्या आज्ञेनुसार, त्याच्या इच्छेनुसार होते. म्हणून आपल्यालाही त्याच्या अनुकूलतेत अनुकूल राहावयास हवे. प्रभूच्या इच्छेविरुद्ध आणि त्याच्या आज्ञेशिवाय काही घडणे असम्भव आहे, असा दृढनिश्चय करून प्रभूच्या प्रसन्नतेत प्रसन्न होऊन सदा आनंदात मग्न राहावयास हवे.

## [ ४ ]

पहिल्यापेक्षा भगवत्सम्बन्धी साधनाबद्दल जरा बरे लिहिले आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. पत्रात माझी प्रशंसा केली आहे, असे लिहू नये. प्रशंसनीय केवळ श्रीपरमात्मा आहे. असे असता दुसऱ्या कोणाचा मोठेपणा सांगणे बरोबर नाही. तुम्ही विचारले आहे की, भगवंताच्या भजन-ध्यानात काय करावयास हवे आणि आपले शारीरिक निर्वाहाचे काम निष्काम भावनेने कर्तव्य समजून कसे करावे आणि ते काम करताना सतत भगवंताची आठवण कशी ठेवावी? यासंबंधी प्रत्यक्ष भेटल्यावर सांगू शकेन. पण साधारणपणे काय करावे, ते खाली लिहीत आहे.

१. कुठल्याही वस्तुचे मूल्य ठरविल्यानंतर त्या वस्तूच्या वजनात, मापात किंवा संख्येत फरक न करता वस्तू कमी देऊ नये किंवा अधिक घेऊ नये.

२. जी वस्तू गिऱ्हाईकांना दाखवली असेल, तीच त्यांना द्यावयास हवी. त्या मध्ये किंचितही भेसळ करू नये.

३. फायदा नक्की केल्यानंतर कमी देऊ नये किंवा अधिक घेऊ नये.

४. व्यवहारात आपल्या हक्काचा नसलेला पैसा घेऊ नये. कपटाने खोटे बोलून किंवा जबरदस्तीने पैसे घेऊ नये किंवा उगाचच उधार घेऊ नये.

५. निषिद्ध वस्तूंचा व्यवहार करू नये. विशेष पाप किंवा जीवहिंसा होत असेल, अशा वस्तूचा व्यवहार करू नये.

६. आपल्या मनाला विचारून ज्यात पाप आहे, असे काम करू नये.

व्यवहारातील वरील दोष पापाच्या भीतीमुळे, मृत्युभीतीमुळे, परलोकातील शिक्षेच्या भीतीमुळे किंवा प्रभु-मिलनात विलंब होण्याच्या भीतीमुळे कमी होऊ शकतात. परंतु लोभ सुटल्याशिवाय हे दोष सर्वस्वी जाणे शक्य नाही. भगवंतावर प्रेम जडल्यावर, त्याचा प्रभाव समजल्यावर लोभ सुटू शकतो. यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे भगवत्प्रीती. त्याचे उपाय तिसऱ्या पत्रात लिहिले आहेत. ते शुद्ध

व्यावहारिक उपाय पापांपासून वाचण्यासाठी लिहिले आहेत. परंतु काही गोष्टी त्याशिवाय ही आहेत. आणि त्या खालील प्रमाणे आहेत - लोभ सोडून त्यागाने, केवळ धर्म भावनेने, भगवंतालाच सर्वस्व समजून आणि त्याच्याच आज्ञे-प्रमाणे जे व्यावहारिक कर्म केले जाते, त्यामुळे संसारी लोकांना अतिशय लाभ होतो. ज्यांच्या व्यवहारात स्वतःसाठी केवळ शरीरनिर्वाहाचा भाव सुद्धा कधी-कधी नसतो आणि ज्यांना फायद्या-तोट्यामुळे आनंद किंवा दुःख होत नाही अशा लोकांचा व्यवहार केवळ लोकहितासाठीच असतो, धनासाठी नाही, त्यालाच निष्काम व्यवहार असे म्हणतात. त्यामुळे हृदयाची मोठी शुद्धी होते.

घरातल्या आणि जगातल्या सगळ्या माणसांबरोबर स्वार्थरहित त्यांच्या हिताची चिंता करून वागणे हे उत्तम होय. त्यामुळे हृदयाची शुद्धी होते. भजन-सत्संगही यामुळेच होऊ शकतो.

ध्यानाचा अभ्यास केल्यास ध्यानही होऊ शकते. प्रयत्नपूर्वक अभ्यास केल्याने सर्व काही होऊ शकते. सत्संग आणि जपाचा अधिक अभ्यास झाल्यानंतर ध्यान निरंतर होऊ शकते. काम करताना श्वासोच्छ्वासा द्वारा नामजप आणि मनात भगवंताच्या रूपाचे ध्यान धरण्याचा प्रयत्न केल्यास एकांतातही खूप फायदा होतो. सत्संग कमी होत असेल, तर भगवद्भक्तीचे ग्रंथ वाचावयास हवे. तोसुद्धा एक सत्संगच आहे.

## [ ५ ]

[ या पत्रात प्रश्नोत्तरे आहेत. प्रश्नकर्त्याचे प्रश्न लिहून मग त्याचे उत्तर दिलेले आहे. - सम्पादक ]

**प्रश्न** : सगळ्या जगातील जीव फार दुःखी होत आहेत. कुठल्याही देशात शांती नाही. देशा-देशात, घरा-घरात भांडणे होत आहेत. ठिकठिकाणी लोक दुसऱ्याचे नुकसान करत आहेत, वाईट करत आहेत. अशा परिस्थितीतून जीवांचा उद्धार व्हावयास हवा.

**उत्तर** : बरोबर आहे. उद्धार व्हावयास हवाच. त्याचे उपाय तुमच्या दुसऱ्या प्रश्नांच्या उत्तरांत पुढे लिहिले जातील.

**प्रश्न** : सध्या जग जणू दुःखाच्या दावानलात दग्ध होत आहे. जर अशीच परिस्थिती राहिली तर कदाचित थोड्याच दिवसात घरा-घरात, भावा-भावांच्यात परस्पर भयंकर खून, मारामारी होण्याचा दाट संभव आहे. लोकांचा देवावरील विश्वास उडत चालला आहे. दिवसेंदिवस जगाचे भवितव्य भयानक रूप धारण करत आहे. याचे कारण काय ?

**उत्तर** : हे म्हणणे काही अंशी बरोबर आहे. परंतु असे होण्याचे कारण म्हणजे भक्तिपूर्वक भगवत्संबंधी चर्चेचा अभाव आहे. जवळ जवळ सगळे जग फक्त भौतिक सुखालाच अंतिम साध्य मानून त्यामागे धावत आहे. सध्याच्या काळात जगाची दृष्टी केवळ सांसारिक विषयांकडेच वळलेली आहे. उपभोगाच्या वस्तूंच्या संग्रहालाच लोक पुरुषार्थ मानू लागले आहेत. त्यामुळे अनेक प्रकारचे अनाचार घडतात. उदा. धनलोभामुळे व्यवहार बिघडतो. त्याचप्रमाणे विषयलालसेमुळे सारे धर्माचरण बिघडते. जर अशीच परिस्थिती राहिली, तर कलह कदाचित आणखी वाढेल. कारण भौतिक सुखाची प्रबल आकांक्षा माणसाला पशू बनविते. सगळेच भोगांकडे धावतात. जिथे म्हणून भोग्यपदार्थ असतात, तिथे एकदम झडप घालतात. जसे एखाद्या कुत्र्याच्या तोंडात पोळी असेल किंवा एखादा पक्षी मांसाचा तुकडा घेऊन जात असेल तर बहुधा बरेच कुत्रे आणि पक्षी त्याच्या मागे पळतात. आणि मग त्यांचे परस्परात मोठे युद्ध होते. जडवादाला आदर्श मानल्यामुळेही असेच होते. म्हणून आराम मौज-मजा वगैरे विलासितेसहित जगातील साऱ्या भोगासक्तीचा मनाने त्याग करावयास हवा. असे केले तरच सुखाचा संभव आहे.

**प्रश्न** : जीव या अशा स्थितीत कुठपर्यंत पडलेले राहतील ? त्यांचा उद्धार कधी होईल ?

**उत्तर** : या गोष्टीचे उत्तर देता येत नाही. योगी कदाचित सांगू शकतील. पुरुषार्थ अनिश्चित आहे. पुरुषार्थाचे फळ कधी आणि कसे मिळेल, याचा

निर्णय होऊ शकत नाही. कोणाच्या साधनेचे फळ कधी आणि कसे असेल हे फक्त भगवंतालाच माहीत आहे. यासंबंधी मनुष्य निश्चितपणे काही सांगू शकत नाही. जर ही गोष्ट गृहीत धरली की, अमुक जीवाला तमुक वेळी परमपद मिळेल, तर साधनावरील श्रद्धा जाईल. लोक म्हणतील की, उद्धाराची वेळ पूर्वनिश्चित आहेच. मग साधनाची आवश्यकताच काय ? जर असे मानले की, परमेश्वरालाही या गोष्टीची माहिति नाही, तर त्याच्या त्रिकालज्ञतेस बाधा येते. म्हणून केवळ एवढेच सांगता येते की 'हे फक्त भगवंतालाच माहीत आहे'. पण या वाईट परिस्थितीतून उद्धार होण्यासाठी काही उपाय आहेत. जर हिन्दू जातीच्या दृष्टीने सांगितले, तर या जातीचे कष्ट दूर करण्यासाठी चार उपाय अमलात आणता येतील.

१. धार्मिक शिक्षणाचा प्रचार.

२. त्यागी, अनुभवी आणि विद्वान सज्जनांद्वारे संपूर्ण देशात शुद्ध धार्मिक भावांचा प्रचार.

३. कमी किमतीत धार्मिक ग्रंथांचा प्रचार.

४. अनाथ मुलांच्या धर्म-रक्षणासाठी अनाथालयांची स्थापना.

जर असे केले तर या जातीत नीती, त्याग, भक्ती आणि धर्माचरणाचा विकास आणि प्रचार होऊ शकतो. आणि या प्रचारामुळे बहुधा ही जात दुःख-दावानलात दग्ध होण्यापासून वाचू शकते.

जर सगळ्या जगाच्या दृष्टीने बघितले तरी सुद्धा साधारणतया हीच गोष्ट आहे. समष्टीच्या उद्धारासाठीसुद्धा त्याग, विद्या, भक्ती आणि सदाचाराच्या विस्ताराची विशेष आवश्यकता आहे. आणि हे काम स्वार्थत्यागी, सेवापरायण सत्पुरुषांच्या तत्परतेमुळेच होऊ शकते. निष्काम सेवा एक अशी विद्या आहे, की ज्यामुळे जग जिंकता येते. जोपर्यन्त परहितव्रती स्वार्थत्यागी पुरुषांद्वारा जगात वरील भावांचा प्रचार होत नाही, तोपर्यंत जगाच्या दुःखाचा नाश होणे कठीण आहे. असे पुरुष जगात विरळ आहेत. म्हणूनच जग दुःखी आहे. शक्य झाल्यास असे निःस्वार्थी पुरुष तयार करावयास हवेत. हे काम महापुरुषच

करू शकतात. श्रीगीतेच्या अध्याय १२ मधील श्लोक ३/४ आणि १३/१४ प्रमाणे स्वाभाविकपणे सर्व प्राणिमात्रांच्या हितासाठी तत्पर, सर्वभूतांठायी अद्वेष्टा, मैत्री, करुणा वगैरे गुणांनी संपन्न असा पुरुष जगातील ज्या भागात परिश्रम करील, त्या भागातील जीवांचे दु:ख बऱ्याच प्रमाणात कमी करू शकतो.

**प्रश्न** : जीवांच्या या दशेवर परमात्म्याची करुणा तर आहेच. पण आता करुणासागराची मर्यादासुद्धा तुटावयास हवी.

**उत्तर** : या प्रश्नाचे उत्तर कदाचित हे असेल की परमेश्वराने अवतार घेऊन जीवांचा उद्धार करावयास हवा. करुणेमुळे आपण असे म्हणू शकतो. पण वास्तविकपणे अशी वेळ अजून आली आहे किंवा नाही हे एका परमेश्वरालाच माहीत. अनुमानाने असे म्हणू शकतो की, बहुधा भगवंताला स्वत:ला अवतीर्ण होण्याची वेळ अजून आलेली नाही. वेळ आली असती, तर आत्तापर्यंत अवतार घेतला असता. जीवांची दशा त्याच्यापासून लपलेली नाही. पण असे वाटते की, तशी वेळ अजून आलेली नाही. कलियुगात जशा प्रकारची स्थिती असावयास हवी, त्याहूनही वाईट स्थिती झाली तर भगवंत अवतार घेऊ शकतात. पण अजून तशी दशा झालेली दिसत नाही. अजून माणसे आपल्या मरणानेच मरत आहेत. पोटाला अन्न मिळत आहे. सहसा जबरदस्तीने प्राणहरण होत नाही. असे संकट सहसा पशु-पक्ष्यांवर असते. भारतात असे संकट गाईंवर आहे. त्यांची मुद्दाम हत्या केली जाते. विशेषत: दुधाळ गाईंनासुद्धा विनाकारण मारले जाते. तुम्हांला जगाची वर्तमान दशा इतकी दारुण वाटते, असह्य वाटते, हा तुमच्या कमकुवतपणाचा परिणाम आहे. पण जर ह्याच गतीने अशी अंदाधुंदी चालू राहिली, तर कदाचित भगवंताला अवतार घेण्याची वेळ येईल किंवा कोणी अधिकारी पुरुष जन्माला येईल किंवा भगवंताच्या कृपेने भक्त-महात्म्यांना असा अधिकार मिळेल की, ज्यामुळे ते हे काम करतील. जसे राजाने कोण्या माणसाला व्हॉईसरायचे पद व अधिकार दिले तर तो तिथले काम करतो.

**प्रश्न** : श्रीपरमात्म्याच्या नित्य कृपेचा अनुभव जीवांना (लोकांना) सहजतेने होऊ लागला, तर जीव परमात्म्याची कृपा मिळवून कृतार्थ होऊ शकतात.

**उत्तर** : ठीक आहे, जीवाची इच्छा असेल तर असे होऊ शकते.

**प्रश्न** : का कोण जाणे, मायेची शक्ती एवढी प्रबळ आहे की, परमेश्वराच्या असीम कृपेचा पदोपदी प्रत्यक्ष अनुभव येऊनही मोहासक्त जीव पुन्हा-पुन्हा त्या विसरतो.

**उत्तर** : ठीक आहे. पण भगवंताच्या प्रबळ शक्तीपुढे मायेची शक्ती काहीच नाही. जे मायेच्या आधीन आहेत, त्यांच्यासाठीच माया प्रबळ आहे. परमेश्वराला आणि परमेश्वराच्या प्रभावाची ज्यांना माहिती आहे, त्यांच्यासाठी मायेची शक्ती काहीच नाही. कारण वास्तविक पाहता मायेची अशी शक्तीच नाही. पण मायेच्या बंधनात (मोहात) पडलेल्या जीवांना तिची शक्ती वाटते. जसे तंद्रावस्थेत असलेल्या माणसाच्या छातीवर हात पडताच चोराची कल्पना करून करून त्याला आपल्या छातीवर फार वजन आहे असे वाटते आणि मग घाबरून त्याच्या तोंडातून शब्दही फुटत नाही. पण वास्तविकपणे तिथे चोरही नसतो किंवा वजनही नसते. हीच अवस्था मायेची असते. जीव जोपर्यंत सचेत होत नाही, तोपर्यंत मायेच्या शक्तीला प्रबळ समजून दबून राहतो. जर जीव जागून परमेश्वराच्या चरणी शरण गेला आणि मायेचे स्वरूप समजले तर मग त्याच्यासाठी मायेची शक्ती काहीच राहात नाही.

(गीता अ. ७/१४ आणि अ. १३/२५ मध्ये पहावयास हवे) जीव खरे पाहता परमेश्वराचा सनातन अंश आहे. पण आपली शक्ती विसरला आहे, म्हणूनच त्याला माया प्रबळ वाटते. जर स्वत:ची शक्ती जागृत केली, तर मायेची शक्ती सहजतेने पराभूत होईल. मायेमध्ये अज्ञान आहे आणि अज्ञानाच्या नाशानेच मायेचा नाश आहे.

**प्रश्न** : जेव्हा परमात्मा कुठल्यातरी रूपात आपले रूप दाखवितो, त्यावेळी थोडा आनंद होतो. पण त्या आनंदात त्या आनंदरूपाला न ओळखल्यामुळे जीव त्याला जाऊ देतो आणि मग पश्चात्ताप होतो. तो पश्चात्ताप खरा की खोटा ते माहीत नाही. जर खरा असेल तर पकडत का नाही ?

**उत्तर** : ठीक आहे. पश्चात्ताप खरा असता, तर सोडले कशाला असते ?

**प्रश्न** : अशा स्थितीत जीवाच्या मोहाचा नाश कसा होईल ?

**उत्तर** : संसाराची आसक्ती हेच मोहाचे कारण आहे व त्याचा नाश वैराग्याने होतो. वैराग्यात पूर्वसंचित पाप अडचणी आणते. पण परमेश्वराला शरण गेल्यास त्याचाही नाश होऊ शकतो.

**प्रश्न** : कुठल्या उपायाने जीवाच्या अंतरंगात एकदम वीज लखलखेल, तो चैतन्यमय होऊन चेतना मिळताच आपल्या प्रियतमाला पकडेल ? कुठल्याही अवस्थेत सोडणार नाही. कोणत्याही मोहात फसणार नाही असा एखादा साधा सरळ उपाय जीवांच्या कल्याणासाठी दाखवावयास हवा आणि तो उपाय सर्वांना मोठ्याने सांगावयास हवा. म्हणजे सगळे जीव मोहबंधन तोडून आपल्या प्रियतमाला पकडू शकतील.

**उत्तर** : ठीक आहे, जप आणि सत्संगाद्वारे परमेश्वराच्या प्रभावाला समजून शरीर आणि संसाराला अनित्य समजून परमेश्वराच्या ध्यानात स्थित होण्याने हे कार्य होऊ शकते. हेच मोठ्याने सांगणे आहे.

**प्रश्न** : जबरदस्तीने खेचून पावन करण्याची संधी आहे. म्हणून पतितपावन नावाची सार्थकता आहे.

**उत्तर** : पतितपावन भले त्यांना कोणी न म्हणो, ही तर म्हणणाऱ्यांची मर्जी आहे. परमात्मा तर स्वतःच्या कायद्यानुसार सर्व काही करतो. परमात्म्याला पतितपावन, दीनबंधू आणि दीनदयाळू वगैरे नावांनी संबोधून त्याची प्रार्थना करणे उत्तम आहे. त्यात कुठलाही दोष नाही, त्यातही प्रेम आणि करुणेचा भाव आहे. पण त्याहीपेक्षा त्याला काहीही न सांगणे अधिक उत्तम. कुठल्याही प्रकारची खुशामत करू नका. त्यांना यायचेच असेल तर येऊ दे; नाहीतर त्यांची मर्जी.

[ ६ ]

तुम्ही लिहिले आहे की, 'तुमच्यावर फौजदारी खटला झाला होता तो रद्द झाला आहे' ही आनंदाची गोष्ट आहे. पण यमराजांच्या घरचा एक मुकद्दमा सगळ्यांवर लागला आहे, तो रद्द करावयास हवा. नाही तर फार कठीण आहे. त्या मुकद्दम्यासाठी तुम्ही जेवढा प्रयत्न केलात, तेवढाच यासाठीही प्रयत्न कराल तर लाभ होऊ शकतो. तुम्ही लिहिले आहे की, आता तुमच्यावर कुठलाच मुकद्दमा नाही. यावरून असे दिसते की यमाच्या मुकद्दम्याला कोणी मानतच नाही. खरे तर हाच मृत्युरूपी भयानक वॉरंटचा मुकद्दमा आहे की जो कोणी टाळू शकत नाही. फक्त तोच टाळू शकतो की ज्याने भगवंताचा आश्रय घेतला आहे. म्हणून सर्वांनी भगवंताला शरण जावे. भगवंताचे जे भक्त आहेत, ते खरे वकील आहेत आणि वेद-शास्त्रादी ग्रंथ, कायद्याची पुस्तके आहेत. म्हणून अशा वकिलांना भेटावयास हवे आणि कायद्याची पुस्तके पाहण्यासाठी सुद्धा वेळ काढावयास हवा.

अशाप्रकारे चेतावणी मिळाल्यानंतरही तुम्ही सावध झाला नाही तर मग कधी सावध होणार ? अशी संधी नेहमी-नेहमी मिळणे फार कठीण आहे. तुम्ही लिहिले आहे की, 'आजारामुळे माझे शरीर खिळखिळे झाले आहे'. म्हणून तुम्हांला उपचार करावयास हवा. आजारपण फार वाईट गोष्ट आहे. म्हणून उपचाराचा प्रयत्न करावयास हवा. शिवाय त्या रोगालाही दूर करण्याचा प्रयत्नही करावयास हवा की, ज्यामुळे आजपर्यंत जन्म-मरण होत आहे आणि भविष्यातही होण्याची संभावना आहे. उपाय केल्याशिवाय रोग जाणे कठीण आहे. शरीराचा आजार पापाचे भोग संपल्यावर आपोआप बरा होतो; पण भवसागरात जन्म-मृत्युरूपी भटकण्याचा आजार आपोआप बरा होत नाही. त्यावर इलाज करावयाची फार आवश्यकता आहे. निष्काम भावनेने सतत परमात्म्याचे भजन-ध्यान करणे, हे भवरोगावरचे उत्तम औषध आहे. भगवंताचे भक्त कुशल वैद्य आहेत, वेदशास्त्र आणि भक्तीसंबंधी ग्रंथ हे वैद्यकशास्त्र आहे, उत्तम कर्म आणि उत्तम आचरण सुपथ्य आहे आणि पापाचरणच कुपथ्य आहे, असे समजून या रोगाचा नाश करण्यासाठी प्रयत्न करावयास हवा.

त्यासाठी जे प्रयत्न केले जातात, ते कधी फुकट जात नाहीत. भगवंताचा नाम-जप आणि ध्यानरूपी औषध कधी निष्फळ होत नाही. शारीरिक रोगांचे औषध व्यर्थ असू शकते. शिवाय त्याचे मूल्यही द्यावे लागते. वैद्यसुद्धा सहसा लोभी असतात. प्रयत्न सुद्धा फुकट जातात; पण भगवान सच्चिदानंदाच्या भजन-ध्यानाचे प्रयत्न कधी व्यर्थ जात नाहीत. खेदाची गोष्ट आहे की, लोक यावर विश्वास ठेवत नाहीत. मित्रा ! ही फार आश्चर्याची गोष्ट आहे की, तप्त कुण्डात पडलेल्या माणसाप्रमाणे लोक निरंतर चिंतारूपी अग्नीत जळत आहेत. पण हे दुःख दूर करण्याचा प्रयत्न करत नाहीत. याशिवाय दुसरी मूर्खता ती कोणती ?

तुम्ही 'दुकानाचे काम लवकर संपविण्याविषयी लिहिले' ते ठीक आहे. या संसारातली खेकटी फार वाईट आहेत. म्हणून ती निस्तरणे ठीक आहे. कुठलेही काम मागे ठेवून जाऊ नये. संसारातल्या कुठल्याही कामात चित्त शिल्लक असेल तर पुन्हा जन्म घ्यावा लागतो. हे समजून काम लवकरच आटोपले पाहिजे, जेणेकरून नंतर नेहमीच आनंद असेल. बंधो ! जसे रेल्वेस्टेशनवर तिकीट घेऊन मनुष्य गाडीत बसण्यासाठी तयार असतो, त्याप्रमाणे सगळी कामे संपवून तयार राहावयास पाहिजे, म्हणजे कुठल्याही प्रकारची चिंता नाही.

[ ७ ]

तुम्ही व्यवहारासंबंधी जे काही विचारले, त्याचे उत्तर पुढीलप्रमाणे आहे.

(१) भगवंताच्या भजन आणि सत्संगात पिता, पुत्र, स्त्री, कुटुंब, शरीर आणि धन वगैरेला बंधन समजणे चूक आहे. बंधन तर आपल्या मनाचा दुबळेपणा आहे. मनच बंधनाचा हेतू आहे. जर वैराग्य असेल तर घरात राहण्याने काही नुकसान नाही आणि वैराग्य नसताना घर सोडण्यात काही लाभ नाही. जर भजन आणि ध्यानाचे साधन वाढले आणि घरातच राहिले तर काय हरकत आहे ? वैराग्ययुक्त भजन-ध्यानाचे साधन नसेल तर जागो-जागी भटकण्याने काही लाभ होत नाही.

सत्संगात श्रद्धा असेल तर थोड्याशा सत्संगानेही भगवत्प्राप्ती होऊ शकते. सत्संगाची उत्कंठा असूनही काही न्यायसंगत कारणामुळे सत्संगात न जाताही त्याला घरी बसल्या उत्तम उपदेश आणि साधुसंगाची प्राप्ती होऊ शकते.

भगवत्प्राप्तीसाठी जर सत्संगाची विशेष उत्कंठा वाढली तर स्वतः भगवान साधुवेशात त्याच्याजवळ येईल, म्हणून भजन-ध्यान आणि सत्संगाची विशेष उत्कंठा ठेवावयास हवी. भजन-ध्यान आणि सत्संगाच्या प्रतापामुळे मल, विक्षेप आणि आवरण क्षीण झाल्यावर साधकाचे भगवंतावर प्रेम जडते आणि त्यानंतर संसाराविषयी वैराग्य उत्पन्न होते. अशी अवस्था झाल्यानंतर त्याला संसारातील कुठलेही काम भारी वाटत नाही. किंवा कुठलेही काम किचकट वाटत नाही. तो निष्काम भावाने सारी कामे लीलया करतो. असा पुरुष वनात असो की घरात, त्याच्यासाठी दोन्ही सारखे आहे.

(२) तुम्हांला काय करावयास हवे, यासंबंधी माझे म्हणणे हे आहे.

क -- चार किंवा पाच तास निष्काम कर्मयोगानुसार परमात्म्याचे स्मरण ठेवून दुकानासंबंधी काम करण्याचा अभ्यास करावयास हवा. जर हे होऊ शकले नाही, तर कमीत कमी तुमच्या दुकानातल्या कामामुळे जनतेचे हित होत असेल तर काही हरकत नाही. तुमचे लक्ष कर्तव्याकडे असावयास हवे; लोभाकडे नाही. अशा प्रकारच्या व्यवहाराचा परिणाम चांगलाच होईल अशी आशा करता येईल.

ख -- सहा तास सत्संग किंवा शास्त्रांद्वारा मिळविलेल्या उपदेशानुसार एकांत जागी निष्काम भावनेने जपसहित ध्यान निरंतर करावयास हवे.

ग -- साधारण सहा तास ध्यानस्थ होऊन झोपले पाहिजे.

घ -- उरलेल्या वेळात तुम्ही तुमच्या इच्छेनुसार काम करू शकता.

पण प्रत्येक गोष्ट नामजप आणि स्वरूपाच्या ध्यानासहित झाली पाहिजे. जप किंवा ध्यान दोन्ही झाले नाही तरी भगवंताचे नामस्मरण अवश्य करत रहावयास हवे, मन, श्वास किंवा वाणीने.

(३) 'काम न करण्यात लोकलज्जेविषयी लिहिले' ते एक प्रकारे ठीक आहे. पण विशेष नुकसान कर्तव्यत्यागाने होते. भगवंताने श्रीगीता अध्याय २ मध्ये ४७ व्या श्लोकात हेच सांगितले आहे की, कर्माचा त्याग करू नये. कारण कर्तव्याचा त्याग फार लोक-हानिकर आहे.

(४) तुम्ही लिहिले आहे की, 'निर्वाहाच्या चिंतेसाठी काम करण्याचा काही हेतू नाही,' ते फार उत्तम आहे. पण स्वार्थरहित काम करते वेळी जर मन धोका देत नसेल तर भजन सुटण्याचे कारण काय ? जर अभ्यासाच्या कमतरतेमुळे असे होत असेल तर अभ्यासाने ही त्रुटी नाहीशी केली पाहिजे.

(५) दुःखदायक गोष्टींनी, पत्र आल्या-गेल्यामुळे हृदय उद्विग्न होणे, अंतःकरणाची निर्बळता आणि आत्मबळाच्या अभावाचा परिणाम आहे. वागणुकीत दुःखदायक व्यवहार असावयास हवा; पण अंतःकरणात उद्वेग असणे उचित नाही.

(६) भगवंताच्या स्वरूपात स्थिर राहून जे काही घडेल ते भगवंताची लीला समजून निर्विकार आणि स्थितप्रज्ञ राहण्याचा अभ्यास करावयास हवा. वेळ अमूल्य समजावयास हवा. वेळेच्या किमतीचे रहस्य समजल्यावर आणखी काही समजणे शिल्लक राहात नाही.

(७) शरीरापासून पृथक् राहून आणि शरिराच्या कर्माचा साक्षी बनून जो काम करतो, त्याच्या हृदयास विकार असू शकत नाही. जर विकार असेल तर त्याची स्थिती शारीरिक समजावयास हवी. या विषयी श्रीगीतेत अ. १४ मध्ये १९ व्या श्लोकात जे काही सांगितले आहे, त्याचे रहस्य श्री... ला विचारावयास हवे. श्रीनारायणाच्या स्वरूपाचे ध्यान तुम्हांला जसे आवडेल तसे

नाम - जपाबरोबर करत आनंदमग्न राहावयास हवे. आनंद होत नसेल तर आनंद होत आहे, असे समजावयास हवे. एक दिवस खरा आनंद सुद्धा मिळू शकतो.

(८) सगळ्या जगाला आनंदघन समजून सर्व काही आनंदाने परिपूर्ण समजावयास हवे. ज्याप्रमाणे पाण्यातील बर्फ केवळ पाण्याने भरलेला असतो त्याप्रमाणे सर्वांना आनंदघन परमात्म्यात परिपूर्ण समजावयास हवे.

(९) कुठूनही हे ज्ञान व्हावयास हवे की, शरीर मिथ्या आणि नाशवंत आहे आणि आपल्याशी याचा काहीही संबंध नाही. काही झाले तरी अंतःकरणात जरा सुद्धा विकार येता कामा नये. सदा-सर्वदा निश्चिंत राहावयास हवे. प्रत्येक क्षणी श्रीगीतेच्या अध्याय २ मधील ७१ व्या श्लोकानुसार भाव ठेवावयास हवा. कधी कितीही दुःख असो, श्रीगीतेच्या अध्याय २ मधील ११ व्या श्लोकाचा अर्थ लक्षात घ्यावयास हवा, तो लक्षात घेतल्यावर दुःख आणि चिन्ता राहणे शक्य नाही.

## [ ८ ]

तुम्हांला चांगल्या आचरणासाठी विशेष प्रयत्न करावयास हवा. सत्संगामुळेच उत्तम आचरण होणे शक्य आहे. म्हणून भजन-ध्यान आणि सत्संगासाठी विशेष प्रयत्न करावयास हवा. संसारातील तुच्छ भोगांकडे चुकूनही मन वळवू नका. संसारातील भोगामध्ये जो वेळ जातो, तो व्यर्थ आहे, हे समजून त्या खऱ्या प्रेमी परमात्म्याच्या भजन-चिन्तनात मग्न व्हावयास हवे. वेळ फार कमी आहे, ह्याचा विचार करून त्याचा उपयोग करावयास हवा. एका क्षणभराच्या साधनेच्या कमतरतेमुळे पुनर्जन्म घ्यावा लागेल. म्हणून असा प्रयत्न करावयास हवा की, जेणेकरून भगवंताची प्राप्ती होईल.

[ ९ ]

[ या पत्रातही प्रश्नकर्त्यांचे प्रश्न लिहून त्याची उत्तरे दिली गेली आहेत. ]

**प्रश्न** : निरंतर स्वरूपाची स्थिती असल्यावर शरीर आणि मनाने दुसरे काम होऊ शकते किंवा नाही ? जर होऊ शकत असेल तर मग तितक्या काळात स्वरूपाची विस्मृती होते का ? जर स्वरूपाची विस्मृती न होता दुसरे कामही नीटपणाने होत असेल तर ते कसे काय होते ?

**उत्तर** : निरंतर भगवत्स्वरूपात स्थित राहूनही शरीर आणि मनाने कर्तव्य कर्म करण्यास काही अडचण येत नाही. त्या काळात भगवत्स्वरूपस्थित पुरुषाच्या स्थितीत कणभर सुद्धा अंतराय येत नाही. कारण परमेश्वराला प्राप्त केलेल्या पुरुषाचा खरे पाहता अंतःकरणाशी काही संबंध असत नाही. केवळ लोकदृष्ट्या त्याचे मन आणि शरीर काम करताना दिसतात. हे सर्व समष्टि-चेतन सत्तेमुळे कर्तृत्वाचा अभिमान नसल्यामुळे पूर्व-अभ्यासानुसार होते. भगवंताने गीतेत सांगितले आहे -

*यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः ।*
*ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पण्डितं बुधाः ॥ (४/१९)*

*सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी ।*
*नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥ (५/१३)*

**प्रश्न** : परमेश्वराच्या प्राप्तीनंतर त्या पुरुषाला काम-क्रोध वगैरे असतो की नाही ? जर नसेल तर महर्षी लोमशाने काकभुशुण्डीला शाप का दिला ? आणि शंकर भगवान कामपीडित होऊन मोहिनीच्या मागे कसे धावले ? अशी दुसरी ही उदाहरणे सापडतात. त्याचे काय उत्तर आहे ? लोक म्हणतात की, काम-क्रोधामुळे स्वरूपाच्या स्थितीत काही अंतर पडत नाही.

**उत्तर** : परमेश्वराच्या प्राप्तीनंतर अहंकाररहित शुद्ध अंतःकरणात काम-क्रोध इत्यादी दुर्गण उत्पन्न होण्याचे काही कारण राहात नाही. महर्षी लोमशांना जर खरा क्रोध आला नसेल आणि केवळ शास्त्रानुसार कोणाच्या भलाईसाठी

ते तसे वागले असतील, तर काही हरकत नाही; पण जर त्यांना खराच क्रोध आला असे मानले तर समजावयास हवे की, त्यांना तोपर्यंत परमेश्वराची प्राप्ती झाली नव्हती. याच विषयावर श्री भुशुण्डिजींनी म्हटले आहे. -

*'क्रोध कि द्वैत बुद्धि बिनु... ।'*

श्री शंकर भगवानांविषयी काही सांगता येत नाही. भगवान् विष्णू आणि शंकर साक्षात ईश्वर आहेत. त्यांच्या कर्माचे मर्म समजणे माणसांच्या बुद्धीच्या कक्षेबाहेर आहे. ईश्वराच्या लीलांना समजण्याची शक्ती माणसात नाही. लोकांचे जे म्हणणे आहे की, काम-क्रोधामुळे स्वरूपाच्या स्थितीत काही अंतर पडत नाही, हे खरे नाही. यासाठी कुठल्याही प्राचीन महर्षींच्या वचनाचे प्रमाण असावयास हवे. याच्याविरुद्ध तर बरीच प्रमाणे आहेत. श्रीगीता अ. ३ - श्लोक ३६ ते ४३ आणि अध्याय १६ - श्लोक २१/२२ पहावयास हवेत. या शिवाय दुसरी अनेक प्रमाणे आहेत.

**प्रश्न** : परमेश्वराची प्राप्ती आहे. कुठल्याही वेळी आत्म्याची आत्म-स्थिती हटत नाही. केवळ भ्रम होता, तो नष्ट झाला. स्वप्नभंग झाला. त्यानंतर जे होते ते तसेच राहिले. म्हणून प्राप्ती पहिल्यांदा नव्हती, नंतर कुठल्यातरी साधनाने झाली असे कसे म्हणता येईल ?

**उत्तर** : आत्म्याची स्वस्वरूपात नेहमी एकच स्थिती असते, म्हणून परमेश्वराला प्राप्त केलेल्या पुरुषाचा हा भावच राहात नाही की, मी पहिल्यांदा अज्ञानी होतो आणि नंतर अमुक साधनेने तमुक काळात ज्ञान मिळाले. पण जो जीव अज्ञानी आहे, त्याला आपले अज्ञान नष्ट करण्यासाठी साधनाची नक्की आवश्यकता आहे. ज्या पुरुषांची अज्ञाननिद्रा नष्ट झाली आहे किंवा संसाराचा स्वप्ननाशाप्रमाणे अभाव झाला आहे, त्यांच्या अंतःकरणात काम-क्रोध वगैरे दुर्गुण कसे राहू शकतात ? ज्या पुरुषाची निद्रा तुटते, त्याचा स्वप्नाशी काही संबंध राहतो का ? स्वप्न संपल्यावर स्वप्नातील काम-क्रोध वगैरे गोष्टी नाहीशा होत नाहीत काय ?

**प्रश्न** : प्रारब्धाप्रमाणे फळाचे भोग भोगावेच लागतात. भोग

भोगल्याशिवाय प्रारब्धाचा नाश होत नाही, जीवन्मुक्तांनाही प्रारब्धाचे भोग भोगावे लागतात जर माणसाने वाईट कृत्य केले नाही, तर तो वाईट फळ कसे भोगेल ? म्हणून कामना किंवा इच्छा नसूनही प्रारब्धाच्या प्रबळतेमुळे पराधीना प्रमाणे प्रारब्ध-कर्म-भोगांसाठी माणसाला वाईट कृत्य करावे लागते. त्यामुळे ज्ञानात किंवा स्वरूपाच्या स्थितीत काय फरक पडतो ?

**उत्तर** : वास्तविक पाहाता जीवन्मुक्त पुरुषासाठी कुठलेही कर्म शेष राहात नाही. जेव्हा त्याच्या दृष्टीने एका परमेश्वराशिवाय दुसऱ्या कोणाचेच अस्तित्व राहात नाही, तेव्हा कुठल्याही कर्माचा भोग त्याला कसा भोगावा लागेल ? परंतु शास्त्रदृष्टी आणि लोकदृष्टीप्रमाणे त्याचे अंतःकरण आणि शरीर द्वारा प्रारब्धाचे भोग भोगले जातात, हे बरोबर आहे. म्हणून मानावे लागते की असे प्रारब्ध होऊ शकत नाही की जे पाप-कर्म केल्याशिवाय भोगावे लागत नाही. जर पापकर्मात प्रारब्धाला हेतू मानले तर त्यात तीन आपत्ती येतात.

१-- विधि - निषेध सांगणारी शास्त्रे व्यर्थ ठरतात.

२-- ईश्वराच्या न्यायीपणात दोष येतो. जर विधात्याने स्वतः त्याच्या प्रारब्धात पाप-कर्माचे विधान नक्की केले असेल, तर त्याला त्या पापाची शिक्षा का मिळावी ? याशिवाय हे सयुक्तिक नाही की, एका अपराधाच्या फलस्वरूप पुन्हा दुसरा अपराध घडावा, पाप अथवा अपराधाचे फळ दुःख भोगणे असावयास हवे. पुन्हा पापकर्म नव्हे.

३-- जो चोरी-जारी वगैरे नीच कर्म करतो, तो काम-क्रोध वगैरे गुणांनी युक्त आहे. त्याला ज्ञानी कसे म्हणावे ? त्याला नीचच मानावयास हवे. जेव्हा मल-विक्षेप आणि आवरण रूप तिन्ही दोषांचा नाश झाल्यावर अंतःकरण शुद्ध झाल्यावर ज्ञानप्राप्ती होते, तेव्हा त्या शुद्ध अंतःकरणात काम-क्रोध वगैरे कसे उत्पन्न होऊ शकतात ? म्हणून परमेश्वराची प्राप्ती झाल्यानंतरही प्रारब्ध कर्म शेष राहिल्यामुळे काम-क्रोध वगैरे नीच आचरण बाकी राहते, असे म्हणणे सर्वस्वी भ्रामक आहे. काम-क्रोधाच्या

उत्पत्तीचे कारणच आसक्ती आहे. (गीता अध्याय २ श्लोक ६२।६३ पाहावा.) आणि आसक्तीचा सर्वस्वी अभाव असल्यावर परमेश्वराची प्राप्ती होते. (गीता अध्याय २ श्लोक ५९ पाहावा.) जर कारणच नसेल तर कार्य कुठून संपन्न होईल ?

[ १० ]

'मनाच्या पाजीपणा बद्दल लिहिले' ते ठीक आहे. चिंतारहित होऊन प्रेमाने आणि आनंदाने सतत परमेश्वराचे नामस्मरण होत राहील, असा प्रबळ प्रयत्न करावयास हवा. ध्यानाच्या वेळी आळस आला तर डोळे उघडावयास हवेत. तरीही आळस गेला नाही तर सद्ग्रंथ पहावयास हवा. एवढे करूनही आळस असेल तर उभे होऊन फेऱ्या मारत नाम-जप करावयास हवा. जर कशाही प्रकाराने आळस गेला नाही, तर थोडा वेळ झोपणे चांगले. ईश्वरावरील प्रेमाचा अभाव आणि अधिक पापांमुळे आळस येतो. भगवंताचा नामजप आणि सत्संगाच्या तीव्र अभ्यासाशिवाय कलियुगात पापांचा नाश होणे कठिण आहे. भजन अधिक झाले की हे प्रतीत होऊ लागेल की, सगळे जग काळाच्या ओघात नष्ट होत आहे. सत्संगामुळे भजन अधिक होते. भजनाच्या अधिकतेमुळे भगवंतावर प्रेम आणि संसारावर वैराग्य येते. वैराग्याचा प्रादुर्भाव झाला की, प्रयत्न केल्याशिवायही परमेश्वराचे ध्यान राहू लागते. मग ध्यानासाठी विशेष प्रयत्न करावयाची आवश्यकता राहात नाही.

लिहिलेल्या गोष्टींचा अंमल होत नाही, म्हणून माझ्यावर श्रध्दा कमी आहे, असे लिहिले आहे. बंधो ! मी एक सामान्य माणूस आहे. भगवान श्रद्धेय आहे म्हणून त्याच्यावर आणि त्याच्या वचनांवरील श्रद्धेत कमीपणा राहू नये.

अभिमान आणि तृष्णेच्या अधिकतेचा नाश होण्याचा उपाय विचारला आहे. त्यासाठी भगवंताच्या नावाचा जप आणि सत्पुरुषांचा संग सोपा आणि उत्तम आहे. एका भगवंताच्या नावाने सगळे दोष नाहीसे होतात. दोघांना राहावयास जागाच उरत नाही. भगवंताच्या नावाचे पारायण झाल्यावर दुसऱ्या

उपायांची आवश्यकता राहात नाही. भजन-सत्संगाच्या अधिक अभ्यासाने भगवंताचे मर्म समजते. मर्म समजल्यावर जेव्हा भगवंतावर पूर्ण प्रेम जडते तेव्हा शारीरिक प्रेम राहणे शक्य नाही. जेव्हा शरीरावर प्रेम नसेल, तेव्हा मान - मोठेपणा वगैरे गोष्टी उरत नाहीत.

तुम्ही लिहिले आहे की, भगवंताची पूर्ण कृपा झाल्यावरसुद्धा हरामीपण जात नाही. हे ठीक आहे; पण भगवंताच्या पूर्ण कृपेचा प्रभाव अजूनपर्यंत विदित झाला नाही. भगवंताच्या कृपेचा सतत अनुभव होत राहिल्यावर, स्वतःला त्याचा कृपापात्र समजल्यावर मग चिंता-फिकीर राहू शकत नाही. त्यानंतरही जर चिंता राहिली, तर ती गोष्ट ईश्वराला लज्जित करणारी आहे. वास्तविक आत्तापर्यंत भगवत्कृपेची पूर्णता मानली गेली नाही. मानल्याशिवाय फळ नसते. भजनाचा अधिक अभ्यास झाल्याशिवाय सांसारिक काम आणि लौकिक गोष्टींची प्रीती सुटणे कठीण. वास्तविक पाहता त्या कृपाळूची कृपा सदा सर्वांवर पूर्णतया आहे. कृपा करणारा माणूस कोण ?

जर भगवंताच्या नावाचा जप सतत प्रेमाने होत नसेल, तर प्रेमाशिवायही ही करावयास हवा. जपाच्या प्रभावाने प्रेम आपोआप जडेल. तुम्ही लिहिले आहे की बऱ्याच लोकांचे साधन चांगले दिसते. ते ठीक आहे. लोकांच्या भजन-ध्यानाच्या साधनेची तीव्रता पाहणे सुद्धा लाभदायी आहे. ते पाहून साधन प्रबळ करण्यासाठी उत्तेजना मिळते. उत्तेजनामुळे साधनाच्या तेजीत लाभ होतो, त्यामुळे भजन वाढते. भजनाच्या अधिकतेने अंतःकरणाची शुद्धी होते व त्यानंतर धारणा होते. बंधू हरीराम ! तू तुझ्या या नावाला कधी विसरता कामा नये. कधी निराश होता कामा नये. आणि परमेश्वराच्या निष्काम प्रेमभक्तीत मग्न राहावयास हवे. भगवंताजवळ काहीही मागणे उचित नाही, प्रेम केवळ प्रेमासाठीच करावयास हवे. भगवंतच एकमेव प्रेममूर्ती आहे. प्रेमाचे मर्म त्यांनाच माहीत आहे. संसारात एका प्रेमाशिवाय दुसरे काही नाही. त्या प्रेमाचे मर्म समजण्यासाठी परमेश्वराशी मैत्री करावयास हवी. मित्रभाव खरा असावयास हवा. आपल्या प्रियतम मित्रासाठी प्राण तुच्छ समजावयास हवे. असे प्रेमीच भगवंताला प्रिय असतात. भगवान प्रेमाच्या आधीन आहे. प्रेमी

आपल्या प्रेमरज्जुंनी भगवंताला बांधू शकतो. भगवान आपल्या प्रियाची सोबत कधी सोडत नाही. जो प्रेमासाठी आत्मसमर्पण करू शकतो, तोच खरा प्रेमी आहे. तो आपल्या तन, मन, धनाला आपल्या सर्वस्वाला आपल्या प्रेमपात्राची संपत्ती समजतो. जी वस्तू आपल्या प्रेमिकासाठी कामी आली, तीच सार्थक आहे असे समजणाराच यथार्थ प्रेमी आहे. असा प्रेमीच सर्वथैव पूजनीय आहे.

[ ११ ]

नामजपात अधिक चूक होता कामा नये. ज्या वेळी नामाचे स्मरण होईल, त्या वेळी नाम-स्मरणाशिवाय जो काळ गेला, त्यासाठी पश्चात्ताप करावयास हवा. मनातल्या मनात असे म्हणावयास हवे की, 'राम ! राम !! माझा इतका वेळ व्यर्थ गेला. मी बेसावधपणे अनाथाप्रमाणे फसलो. हे हरी ! मी आपला शरणागत आहे. तुम्हीच अनाथांचे रक्षक आहात. मी केवळ नामासाठी स्वतःला अनाथ समजतो. तुम्ही करुणासागर आहात; तुमच्याकडे पाहून मनाला धीर येतो. जर मी स्वतःकडे पाहिले, तर माझी हिम्मत होत नाही. पण जेव्हा तुमचा स्वभाव, सुहृदता, दयाळूपणा आणि प्रेम बघतो, तेव्हा हिम्मत येते'. याप्रमाणे जर करुणापूर्ण हृदयाने अश्रुपात करत परमेश्वराची प्रार्थना केली, तर त्यामुळे हृदयातील पापांचा नाश होतो, अंतःकरण शुद्ध होते. ज्या लोकांचे अत्यधिक प्रेम असते, त्यांचा प्रेमाश्रुपात होताच त्यांच्या मनात धैर्याचा अभाव राहात नाही.

नामजप करतेवेळी त्या नारायणाच्या स्वरूपाचे चिंतन करत त्याची स्तुती करावयास हवी आणि म्हणावयास हवे की 'तुम्ही असताना माझी दुर्गती झाली तरी काही हरकत नाही. तुमचे चिंतन होत राहिले पाहिजे. मग कितीही शारीरिक कष्ट का पडेनात. तुमचे चिंतन सोडून मला दुसऱ्या कोणत्याही सुखाची इच्छा नाही. हे प्रभो ! मला आपले चिंतन प्राणाहूनही अधिक प्रिय केव्हा वाटेल ? ज्या लोकांना तुमचे चिंतन प्राणाहूनही अधिक प्रिय आहे, ते धन्य होत. जे असे नाहीत, त्यांचे मनुष्यदेह धारण करणे सर्वथा व्यर्थ आहे.

[ १२ ]

साधन प्रबळ करण्यासाठी विशेष प्रयत्न करावयास हवेत. साहस सोडता कामा नये. तुम्ही जितके सुधारला आहात, तितका तुम्हांला मोठा लाभ झाला आहे. आता पुढे काही करणे तुमच्या साधनावर अवलंबून आहे. पूर्वीच्या काळी हजारो वर्ष सतत प्रयत्न केल्यानंतर भगवंताचे दर्शन होत असे. पण सांप्रत फार लौकर होऊ शकते. अर्थात आत्तापर्यंत तुमचे ज्या प्रकारचे साधन आहे, त्यात कदाचित जास्त वेळ लागेल. म्हणून तुम्हांला आता फार नेटाने प्रयत्न करावयास हवा. श्रीनारायण देवाचा साक्षात्कार झाल्याशिवाय इथून जावे लागले, तर फार नुकसान आहे. मनुष्यदेह फार उत्तम कर्म केल्यानंतर मिळतो. तो केवळ भगवत्प्राप्तीच्या साधनाकरता आहे. मूर्ख लोक त्याला पतंगाप्रमाणे सांसारिक भोगांच्या दुःखदायी अग्नीत जाळून भस्म करतात. तुम्ही असे करू नये. संसाराच्या भोगांना अग्नीसमान समजून त्यापासून वाचले पाहिजे. तुमच्यामध्ये सांसारिक आसक्तीचा दोष विशेष दिसतो. म्हणून तुम्हांला हा विशेष इशारा दिला जात आहे. तुम्हांला आपली सगळी शक्ती या साधनात लावावयास हवी. नाही तर परमेश्वराचे मिलन कसे होईल ? तुमच्यात फार शक्ती आहे, तिला तुम्ही कामी लावली पाहिजे. आणि कटिबद्ध होऊन साधन करावयास हवे. जर एवढे करूनही तुम्हांला परमेश्वराचे दर्शन झाले नाही, तर मग तुमची काही चूक नाही. तुम्ही या तुच्छ संसारातल्या नाशवान्, क्षणभंगुर आणि अनित्य भोगांच्या लोभात अडकून आपला अमूल्य वेळ धुळीत का मिळवता कळत नाही ? तुम्हांला आपल्या मनाला विचारावयास हवे की, ते उद्धारासाठी विशेष प्रयत्न का करत नाही ? इतका हरामीपणा कुठून आला ?

[ १३ ]

संसारात श्रीनारायणाची भक्ती नेटाने वाढवावयास हवी. वेळ निघून जात आहे. भक्तीचा प्रवाह प्रबळ झाल्याशिवाय काम कसे होईल ? तुमचे या संसारांत कुठल्या हेतूने येणे झाले, याचा विचार करावयास हवा. उद्‌देश्य उच्च

ठेवावयास हवे. मनुष्याचे आद्य कर्तव्य संसारातील लोकांना भगवद्भक्तीला लावून धर्माची स्थापना करणे होय. जे प्रत्यक्ष नारायणाला अप्राप्य मानतात, त्यांचा विश्वास बसावा म्हणून आणि त्यांचे नारायणावर प्रेम जडावे म्हणून नामजपाचा प्रसार करावयाचा विशेष प्रयत्न करावयास हवा. ज्यांना हे माहीत आहे की, परमेश्वर सर्वव्यापी आहे आणि तोच सर्वांचा आत्मा आहे. तेच महात्मे आहेत. त्यांच्यासाठी परमेश्वर सर्व ठिकाणी प्रत्यक्ष आहे. त्यांना काही करावयाचे शिल्लक राहात नाही. त्या लोकांद्वारा जे काही केले जाते ते केवळ लोकहितासाठी असते. ज्यांचा अजून असा भाव झाला नाही, त्यांच्यासाठीसुद्धा या भावनेने साधन करणे. उत्तम आहे. उत्तम पुरुषांच्या कर्माचे अनुकरण सुद्धा उत्तम असते.

## [ १४ ]

भगवंताची स्मृती सदैव राहण्यासाठी भजन, ध्यान, सत्संगाचा प्रबळ प्रयत्न करावयास हवा. तुम्ही लिहिले आहे की, जपात फार चुका होतात. या चुका लगेच दूर करावयास हव्यात. चूक दुरुस्त करण्याची इच्छा होणे हे फार उत्तम आहे. चूक का दुरुस्त होत नाही, यावर विचार करावयास हवा. चूक दुरुस्त करण्याचा निकराने प्रयत्न केल्यावर चूक दुरुस्त होऊ शकते.... संसार, भोग आणि शरीराला नेहमी मृत्युमुखात पहावयास हवे. सर्वांभूती भगवंताला सत्स्वरूपात पाहिल्याने चूक कमी होऊ शकते. हा मिथ्या संसार बऱ्याच काळाच्या अभ्यासाने सत्य वाटू लागतो. वास्तविक संसार म्हणजे कुठली एक वस्तू नाही. सर्वांठायी केवळ एक सच्चिदानंदच परिपूर्ण आहे, पण विश्वास असावयास हवा. सगळ्या ठिकाणी परमेश्वर प्राप्त होत आहे पण असे मानावयास हवे. हे मानणे जप, ध्यान आणि अधिक सत्संगाने संभवनीय आहे. ज्यांनी संसाराला नेहमी दृढ मानले आहे, त्यांचे प्रत्येकवेळी भगवत्‌चिंतन कशा प्रकारे होऊ शकेल ? जर प्रत्येक वेळी इच्छा असेल तर भगवंताचे स्मरणसुद्धा होत राहणे काही कठींण नाही. सांसारिक काम करतेवेळी या शरीरासहित सगळ्या संसाराला मृत्युमुखात नाशवंत पाहण्याने नामाची स्मृती

अधिक राहू शकते. संसारातील कामांना मिथ्या समजून प्रसन्नचित्ताने हसत हसत देवाची आठवण ठेवून खेळ समजून करावयास हवीत. किंवा सच्चिदानंद भगवंताच्या सर्वव्यापी स्वरूपात स्थित होऊन शरीरापासून अलग द्रष्टा बनून (साक्षी भावाने) सांसारिक कामे करावयास हवी.

श्रीगीतेच्या अध्याय १४ तील १९ व्या श्लोकानुसार साधन करावयास हवे. भगवंतावर प्रेम जडण्याचा उपाय विचारलात. तर भगवंताचा भाव समजल्यावर जेव्हा तीव्र इच्छा होते, तेव्हा प्रेम वाढते आणि नंतर भगवंताची प्राप्ती होते. धन मिळविण्यासाठी जितके प्रयत्न करता त्याच्यापेक्षा जास्त प्रयत्न परमेश्वराला भेटण्यासाठी केले तर परमेश्वर भेटू शकतो.

तुम्ही लिहिले आहे की, अधिक बोलावे लागते आणि कामही अधिक करावे लागते. तर त्यात नुकसान काय आहे ? भगवंताच्या स्वरूपात स्थित होऊन त्याच्या नावाची आठवण ठेवून सावधपणे प्रसन्न मनाने बोलावयास हवे. जर असे झाले तर आनंदाची गोष्ट आहे. अभ्यास केला तर अशी स्थिती होऊ शकते. परमेश्वरावर असे प्रेम जडावयास पाहिजे की, त्याला भेटल्याशिवाय चित्ताला चैन पडू नये. असे झाल्यास चूक होणार नाही. जरी एकदम संसारातून चित्त बाजूला झाले नाही तरी काही हरकत नाही. प्रत्येक क्षणी भगवंताच्या नावाची आठवण आणि त्याच्या स्वरूपाचे चिंतन व्हावयास हवे. मग आपोआप संसारातून मन हटून भगवंतावर प्रेम जडू शकते. सर्व ठिकाणी एक नारायणच पूर्ण आहेत. नारायणाशिवाय दुसरे काहीच नाही. संसार सगळा मिथ्या आहे, असे समजून सतत नारायणाच्या चिंतनाचा आधार घ्यावा. संसारातील कुठल्याही पदार्थाची इच्छा कधी करू नये. प्रत्येक क्षणी भगवंताचे ध्यान आनंदाने करून आनंदमग्न राहावयास हवे.

जे काही घडते ते परमेश्वराच्या आज्ञेने होते, असे समजून जे घडेल त्यात प्रसन्न राहावयास हवे. चित्तात चिंता किंवा कसली इच्छा उत्पन्न झाल्याने शरणागतीत दोष निर्माण होतो. सगळे काही त्याचाच संकल्प आहे. त्याला वाटेल तो करील. त्यामुळे विकार निर्माण होण्याचे कारण नाही. परमेश्वराच्या विधानात आपला कुठल्याही प्रकारचा हट्ट न ठेवल्याने वैराग्य आणि सत्संगात प्रेम अधिक दिसेल.

विश्वासाने भजन-ध्यान-सत्संगाचा प्रयत्न करत राहावयास हवे. असे करता-करता भगवंताचे मर्म समजते. म्हणजे मग भजन-ध्यानाची आवश्यकता राहात नाही. म्हणून पहिल्यांदा अभ्यासाने मर्म जाणावे. हे अधिक विश्वासाने होते. मर्म कळत नाही, तो पर्यंत संसाराच्या जबरदस्त आठवणी झाल्या तरी हरकत नाही. प्रसन्न मनाने सच्चिदानंद परमात्म्याच्या चिंतनासहित श्वासासोबत नामजपाचा प्रयत्न करावयास हवा: भगवंताच्या कृपेच्या प्रभावाचा निश्चय अंतःकरणाची शुद्धी झाल्यावर होतो. नीट विचार केल्यावर भगवंताची कृपा, दया वगैरे गुणांची प्रतीती होते. भजन, ध्यान आणि सत्संग वगैरे सर्व काही भगवत्कृपेने होते. अंतःकरणाची शुद्धी भजन, ध्यान आणि सत्संगाने होते. सतत भगवंतावर प्रेम असणे आणि संसाराविषयी तीव्र वैराग्य होणे, तीव्र इच्छेवर आधारित आहे. जोपर्यंत याविषयी पूर्ण आनंद होत नाही, तोपर्यंत तीव्र इच्छा होण्यासाठी प्रयत्न करावयास हवा.

श्रीभगवंताच्या चरणकमलरूपी नौकेचा आश्रय आणि भगवंताच्या नामजपरूपी दोरीचा आधार प्रत्येक वेळी राहण्यासाठी तीव्र इच्छा हा उपाय आहे. काळ निघून जात आहे. लौकरच हे शरीर मातीला मिळणार आहे. जर शरीरच आपले नाही, तर धन-दौलत आणि संसाराच्या भोगांची गोष्टच कशाला ? म्हणून तुम्हांला एका क्षणाचाही विलंब करावयास नको. तुमचे असे कोणते काम आहे की, ज्यामुळे भगवंताच्या भेटीसाठी विलंब करत आला ? श्रीभगवंताचा विरह तुम्हांला सहन होतोय. म्हणून लिहावे लागत आहे की, तुम्हांला भगवंताचा प्रभाव पुरतेपणी माहीत नाही. हे रुपये, स्त्री आणि संसाराचे भोग व वस्तू तुमच्या काय कामी येतील ? आता तरी समजून-उमजून तुमची गफलत होऊ नये. अशी कुठली अडचण आहे की, ज्यामुळे श्री नारायणाच्या प्रेमात त्रुटी राहते. तुम्ही ज्यांच्यासाठी भजन-ध्यानात विलंब करत आहात, ते काही कामी येणार नाहीत. तुम्ही ज्याला आपले समजता, ते काहीही तुमचे नाही. तुमचे फक्त एक नारायण आहेत. म्हणून तुम्हांला त्यांच्या चरणी शरण जावयास हवे. बाकी सर्व मिथ्या आहे. जसे तुम्ही स्वतःत दुसऱ्या कुठल्याही वस्तूला बघत नाही, त्याप्रमाणे भगवंतातही त्याच्याशिवाय दुसरे काही नाही. स्वप्नात जे भासते, ते प्रत्यक्षात काही नसते. त्याप्रमाणे संसारात जे भासते तसे काही नसते  जिथे तुम्ही आहात त्या ठिकाणी आणि तुमच्यात दुसरा कुठलाही अंश नसतो. याचा अर्थ तुम्हांला

समजला नाही तर कधी तरी भेटीत विचारा. इथे भगवंताच्या अस्तित्वाचा भाव लिहिला आहे. शरीरात बरेच विकार आहेत. अंतःकरणातही विकार आहेत. पण जिथे तुम्ही आहात तिथे कोणताही विकार नाही. तुमच्यात आणि तुमच्या अंतरंगात काही भिन्न दिसत नाही. जिथे तुम्ही आहात त्या जागी दुसऱ्या वस्तूला स्थान नाही. त्या प्रमाणे भगवंताच्या आनंदस्वरूपाची घनता आहे. स्वास्तविक कोणीच नाही. अशा प्रकारे विश्वास ठेवावयास हवा की सगळ्या ठिकाणी भगवंत आहे. जर असा अनुभव झाला तर सर्व ठिकाणी भगवंत भासू लागेल. यानंतर कदाचित संसाराचा भास झाला तर काही हरकत नाही. जर प्रत्येक क्षणी अशा प्रकारे ध्यान होऊ लागले, तर भगवंताची प्राप्ती होईल.

[ १५ ]

तुम्हांला जेणेकरून भगवंताची प्राप्ती लौकर होईल, असेच काम करावयास हवे. चकोराप्रमाणे दृढप्रतिज्ञ व्हावयास हवे. प्राण गेले तरी चालेल पण भगवंताच्या प्राप्तीचे साधन, ध्यान, भजन क्षणभरसुद्धा विसरू नये. भजन, ध्यान आणि सत्संगात कमी का राहते ? नंतर पश्चात्ताप करून काही मिळणार नाही. तुमच्याजवळ अशी कोणती शक्ती आहे की, जिच्यामुळे मृत्यूपासून वाचू शकता ? म्हणून चकोराप्रमाणे प्राणांची पर्वा न करता प्रतिज्ञा पूर्ण करावयास हवी.

*पपिहा प्रण कबहुँ न तजै, तजै तो तन बेकाज।*
*तन छूटै तो कछु नहीं, प्रण छूटै तो लाज॥*

असा विचार करून ज्यासाठी जन्माला आलो, ते काम कधी विसरता कामा नये. भगवंताच्या नाम-जपाचा, ध्यान आणि सत्संगाचा मनात ध्यास ठेवावयास हवा. सत्संग, भजन आणि ध्यान वैराग्याशिवाय होत नाही. संसाराच्या भोगात वैराग्य आल्याशिवाय ईश्वरावर पूर्ण प्रेम होऊ शकत नाही. संसारातील सुख किंवा धन कुठल्या कामी येईल ? सगळे इथेच राहील. जर भगवंताच्या नावाचा जप झाला नाही, तर संसाराचे सुख काय कामाचे ?

*सुख के माथे सिल पड़ो, (जो) नाम हृदय से जाय।*
*बलिहारी वा दुःखकी, (जो) पल पल राम रटाय॥*

शरीर आणि संपत्ती इथेच राहील. मृत्यूनंतर ती तुमच्या कामी येणार नाही. म्हणून जोपर्यंत त्यावर तुमचा अधिकार आहे, तोपर्यंत त्यापासून आपल्या इच्छेप्रमाणे काम घ्या. ईश्वरप्राप्तीत पुरुषार्थच प्रधान आहे, हे समजून धनाला धुळीसमान समजून त्या खऱ्या आनंदासाठी प्रबळ प्रयास करावयास हवेत, म्हणजे लौकरच ईश्वरप्राप्ती होईल.

## [ १६ ]

मृत्यूनंतर शरीर आणि धन काय कामाचे ? सगळे मातीमोल होईल. म्हणून जोवर्यंत तुमच्यावर तुमचा काहीही करण्याचा अधिकार आहे, तोपर्यंत साधन करा. वेळ का लावता ? काळ निघून जातोय. सगळ्या वस्तूंचा त्याग नक्की करावा लागेल. मग पश्चात्ताप करून काही उपयोग नाही. हे समजून माणसाने त्या परमानंदस्वरूपात मग्न व्हावयास हवे. 'मी आणि माझे' हा भाव तत्काल सोडावयास हवा. नाही तर फार नुकसान होईल -

*मैं जाना मैं और था, मैं तो भया अब सोय।*
*मैं तैं दोऊ मिट गई, रही कहन की दोय॥*

असा भास होण्यासाठीचा उपाय करावयास हवा. दुसऱ्या कामासाठी एक क्षणसुद्धा वाया घालविणे, महामूर्खपणा आहे. याचे कारण अविश्वास आहे. म्हणून नाम-जपा सोबत अशी श्रद्धा असावयास हवी की, जे काही सगळे आहे ते 'ॐ' आहे. मी काहीच नाही. जर मीच नसेन, तर माझे काही असूच शकत नाही. एक 'ॐ' म्हणजे सच्चिदानंदघनच आहे. सर्वव्यापी शान्तानंद, पूर्णानंदाशिवाय वेगळे दुसरे काहीही नाही. नामजपासोबत अर्थाकडेही लक्ष ठेवावयास हवे. ध्यान असे असावयास हवे की, मन त्यात पूर्णपणे लीन होईल. आनंदघनालाच आपले स्वरूप समजून आनंदघनातच स्वस्वरूप पाहून साऱ्या जगाला आपला एक अंश आहे, असे मानून आनंदघनात स्थित झाल्याने 'मी' आपोआपच शांत होतो. दृश्याचा अभाव झाल्यावर 'मी' चा अभाव आपोआप होऊ शकतो.

चकोराची गोष्ट विचारलीत. चकोराचे जरी प्राण गेले, तरी तो पावसाच्या पाण्याशिवाय दुसरे जमिनीवर पडलेले पाणी पीत नाही, असे ऐकले आहे.

*चातक सुतहिं पढावही, आन नीर मत लेय।*
*मम कुल यही स्वभाव है, स्वाति बूँद चित देय॥*

अशा प्रकारे भगवंतावर प्रेम असावयास हवे. ऐकले आहे की देवाजवळही अशी प्रतिज्ञा केली आहे की, मी आपले स्मरण करीन. म्हणून ती प्रतिज्ञा की, जिच्यासाठी जन्म घेतला आहे, ती कधी मोडू किंवा सोडू नये. भगवंतावर प्रेम जडण्याचा उपाय विचारला आहे, तर भगवंताच्या नावाचा जप आणि ध्यान करणे हाच खरा उपाय आहे. भगवंताच्या नावाचा जप आणि स्मरण होण्याचा उपाय सत्संग आहे. सत्संग करण्याने आणि भगवंताचा गुणानुवाद श्रवण करण्याने, वाचण्याने भगवंतावर अखंड श्रद्धा ठेवून भगवंताचे सतत स्मरण करण्याने पापांचा नाश होऊन भगवंतावर पूर्ण प्रेम जडते, असे ऐकले आहे. म्हणून मनाला संसारातील सर्व भोगांपासून निवृत्त करून केवळ एका परमात्म्याचा नामजप आणि ध्यान अधिक कसे होईल, तो उपाय करावयास हवा. फसवी सुखे तुमच्या कशी आणि कुठे कामी येतील ?

*सुख के माथे सिल पड़ो, (जो) नाम हृदय से जाय।*
*बलिहारी वा दुःखकी, (जो) पल पल राम रटाय॥*

शारीरिक सुखभोग आणि संपत्ती इथेच राहणार आहे. नाशवंत वस्तूंसाठी नित्य वस्तूंचा त्याग करणाऱ्यासारखा दुसरा मूर्ख कोण ? सांसारिक वस्तू, धन आणि शरीराला सच्चिदानंद भगवंताची प्राप्ती लौकर होईल, अशा कामी लावावयास हवे.

प्रतिक्षण भगवंताच्या नावाची आठवण राहावी यासाठी विचारले आहे. तर भगवंतावर प्रेम जडल्यानंतर आणि सांसारिक भोगांविषयी तीव्र वैराग्य आल्यानंतर भगवंताच्या नावाचा क्षणभरही विसर पडत नाही. प्रेमसहित भगवंताचा नामजप होण्याचा उपाय विचारला आहे. तरी त्यासंबंधी मी काय सांगू शकतो ? पण अनुमानाने सांगतो की, भगवंताचे गुणानुवाद आणि

प्रभावाविषयीच्या गोष्टी वाचल्याने ऐकल्याने, मनन करण्याने आणि भगवंताच्या स्वरूपाचे चिंतन करून प्रसन्नचित्ताने आनंदमग्न होऊन वारंवार स्मरण करावयास हवे. जसे संजयाने गीता अ. १८ श्लोक ७७ मध्ये सांगितले आहे. जप आणि ध्यानात चूक होणार नाही असा उपाय करावयास हवा. अशा प्रकारची इच्छा होणे फार चांगले आहे. अशी इच्छा झाल्यावर विशेष वेळ लागत नाही. कारण ज्याला खरी इच्छा आहे तो माणूस प्रयत्नपूर्वक तत्पर होतो. ज्याला सतत भजन-ध्यान क़रण्याची इच्छा असेल त्याला भजन-ध्यानाशिवाय दुसरे काही चांगले वाटणार नाही. असे झाल्यावर विषयांची आठवणही कमी होते. जपाच्या वेळी आठवण होईल पण निष्काम भावनेने सतत जप व्हावयास हवा. अधिक जप झाल्यानंतर जेव्हा भगवंताच्या प्रेमासहित आपोआप ध्यान होऊ लागते, तेव्हा विषय स्फुरणसुद्धा आपोआप नष्ट होते. आणि थोडे स्फुरण झाले तरी फार वेळ राहात नाही. जोपर्यंत संसारात प्रेम आणि ईश्वराच्या सत्तेचा नाश होत नाही तोपर्यंत स्फुरण झाल्यास काही नुकसान नाही. भगवंताचे चिंतन करण्याने भगवंतावर प्रेम जडते. काहीही असले तरी भगवंताचे चिंतन करावयास हवे. जर चिंतन होऊ शकले नाही, तर भगवंताचा नामजप अवश्य करावयास हवा. ज्याच्यावर प्रेम असते, त्याचेच अधिक चिंतन होते.

क्रोधाची गोष्ट समजली. संसारात सत्ता आणि प्रेमाचा अभाव झाल्यावर क्रोधाचा समूळ नाश होतो. पण क्षणोक्षणी मृत्यूची आठवण केल्याने, जे काही भासते, ते कालकवलित समजल्याने, नंतर त्याचा अभाव होणार हे समजल्याने, भगवंताची लीला जाणण्याने आणि परमेश्वराच्या स्मरणाने क्रोध येऊ शकत नाही. जे काही असेल, त्यात आनंद मानावयास हवा. जे काही घडते ते परमेश्वराच्या आज्ञेने होते. जे काही आहे ते परमेश्वराचेच आहे, त्याची लीलामात्र आहे, असे समजून आनंद मानावयास हवा. त्याच्याविरुद्ध इच्छा का करावी ? इच्छाच क्रोधाचे मूळ आहे.

[ १७ ]

ध्यान नीट होत नाही तर नामजपाचा सतत अभ्यास केल्याने ध्यान होऊ शकते. भगवंताच्या नावाचा सतत जप होण्यासाठी सत्संग करावयास हवा आणि शास्त्राभ्यास करण्याचा प्रयत्न करावयास हवा. तीव्रपणाने प्रत्येक क्षणी भगवंताचा नामजप होऊ लागला, तर मग भगवंतावर प्रेम जडून आपोआप प्रेमसहित जप होऊ लागतो. आणि भगवंताच्या कृपाप्रभावाची जाणीव होते. भगवंताची पूर्ण कृपा आहेच, पण ती योग्य पात्रात प्रत्यक्ष भासते. जसा सूर्याचा प्रकाश सगळीकडे परिपूर्ण असूनही आरशात प्रत्यक्ष भासतो. भगवंताच्या कृपेचा थोडासा प्रभाव समजल्यावर साधक जे काही घडते, ती भगवंताची कृपाच समजतो आणि मग तो आपली इच्छा सोडून साक्षीभावाने आनंदमग्न राहतो. भगवंतावरील प्रेम इतके वाढते की, तो भगवंताला सोडू शकत नाही. पुरुषार्थ अधिक झाल्यावरच अधिक भजन होते. अधिक भजन झाल्याने भगवंताचा प्रभाव समजतो. भगवंताचा नामजप अधिकात अधिक करण्याचा प्रयत्न करणे आपल्या पुरुषार्थाच्या आधीन आहे.

तुम्ही लिहिले आहे की, भगवंताच्या प्रेमाविषयी कुणी सांगितल्यानंतर समजले, तर ते दाखविणेसुध्दा भगवंताचे भजन-ध्यानच आहे. भजन-ध्यानाद्वारा हृदय शुद्ध झाल्याने प्रेम उत्पन्न होते. तुम्ही लिहिले आहे की, तुमचा बराचसा काळ निघून गेला आहे. आता लौकरच उपाय व्हावयास हवा. तर अशी इच्छा होणे अतिशय चांगली गोष्ट आहे. तुम्ही लिहिले आहे की अशी सुसंधी मिळूनही जर उद्धार झाला नाही तर मग कधी होईल ? ते ठीक आहे. जर याप्रमाणे वेळेचे महत्त्व समजले, तर त्याने त्याचा वेळ भजन-ध्यानातच घालवला पाहिजे. वेळेचे महत्त्व समजल्यावर तुमचा उद्धार होणे फार मोठी गोष्ट नाही. उलट त्यामुळे दुसऱ्या संबंधित प्राण्यांचाही उद्धार होऊ शकतो. जरी आपला उद्धार झाला नाही तरी केवळ प्रेमसहित भगवंताचे चिंतन व्हावयास हवे. तुम्हांला स्वतःला उद्धार लौकरात लौकर करण्याची इच्छा आहे, हे उत्तम आहे. मग काही काळजी नाही. तुम्ही लिहिले आहे की, अजून आनंद होत नाही. आनंद नाही झाला तर नाही. केवळ प्रेमसहित भगवंताचे चिंतन व्हावयास हवे.

आनंदाची इच्छा तुच्छ आहे. ध्यान आनंदासाठी थोडेच केले जाते ? भजन आणि ध्यान भगवंतासाठी केले जाते. मी तुम्हांला भगवंताचा भक्त लिहिले होते ते ठीकच होते. शिवाय काही गोष्टी जाणण्याची आवश्यकता होती. पण पूर्ण भक्त झाल्यावर मी आणि माझा याचा अभाव होतो.

संयोग-वियोग सगळे विधीच्या आधीन आहे. कमी भेटलो तरी प्रेम असावयास हवे, ते आपले आहे. परंतु निष्काम प्रेम जेवढे वाढेल, तेवढे उत्तम.

तुम्ही लिहिले आहे की ह्यावेळी जेवढे ध्यान झाले, तेवढी धारणा झाली तर कृतकृत्य होईन. तर भले कृतकृत्य झाला नाहीत तरी प्रेमसहित निरंतर ध्यान व्हावयास हवे. निष्काम भावनेने सतत भजन करणाऱ्या पुरुषांच्या दर्शनाने हजारो पुरुष कृतकृत्य होतात. अर्थात त्यांनी श्रद्धा आणि भक्तीने भक्तांचे दर्शन केले आणि त्यांना त्यांचा प्रभाव समजला तर.

संसार मिथ्या आहे. भगवंताची लीला आहे. तो खरा आहे, असे समजल्याने आसक्ती निर्माण होऊन इच्छा उत्पन्न होऊन माणसामध्ये अनेक दोष निर्माण होतात. म्हणून भगवंताला शरण जावे हे उत्तम. जे काही होते ते भगवंताच्या आज्ञेने होते. भगवंताला शरण गेल्यावर त्याची आज्ञा का टाळावी ? जे काही होते ते त्याचे कल्पित, मिथ्या आणि केवळ त्याची लीला आहे. काहीही झाले तरी आम्हांला काही हरकत नाही. केवळ साक्षी राहावयास हवे. असे करूनही जर दुःख झाले तर समजावयास हवे की भगवंताला शरण गेलोच नाही. परमेश्वर जे काही करील त्याचा आनंदाने स्वीकार करावयास हवा. जर मनाला थोडेसेही दुःख झाले तर समजावयास हवे की परमेश्वराच्या करण्यावर विश्वास नाही. सगळे काही त्याचेच तर आहे. तो आपल्या वस्तूचा त्याला पाहिजे तसा उपयोग करू शकतो. आपला संबंधच काय ? त्यामुळे मनाला वाईट वाटून घेण्याने तो आम्हांला मूर्ख समजतो आणि समजतो की ह्याने मिथ्या वस्तूला खरे मानले आहे. हा संसारातील मिथ्या वस्तूंचा आश्रय घेतो. हा मूर्ख संसाराचा दास आहे. जो संसाराचा दास होईल तोच संसाराची इच्छा करील. सांसारिक वस्तूंची इच्छा करणाराच संसारात जन्म घेतो. असा पुरुष भगवंताच्या अंतःकरणाचा आणि मनाचा स्वामी होऊ शकत नाही. भगवंताचा प्रेमीच भगवंताच्या सर्वस्वाचा

मालक होतो. संसारातील भोगांचा प्रेमी तर संसारातील किडा आहे. संसारातील भोगांचा मिथ्या आणि लीला समजून आपल्या मनाने त्याचा त्याग करावयास हवा. जो त्रैलोक्याचे राज्य तुच्छ समजून केवळ एका भगवंताचा प्रेमी आहे, तो धन्यवादाला पात्र आहे. भगवान प्रत्येक क्षणी त्याच्या जवळ राहतो.

[ १८ ]

वैराग्याचा प्रभाव सदैव राहण्याचे साधन विचारले आहे. तर त्याचे साधन भजन, ध्यान आणि सत्संगाचा तीव्र अभ्यास हेच आहे. संसारात दुःख आणि दोषबुद्धीमुळे सुद्धा वैराग्य उत्पन्न होते. परंतु संसाराविषयी अभाव आणि सच्चिदानंदात भाव-बुद्धी झाल्याशिवाय संसाराविषयी पूर्ण वैराग्य होत नाही.

सच्चिदानंदघन परमात्म्याच्या स्वरूपाची प्रेमसहित स्थिती राहण्यासाठीचा उपाय विचारला आहे. तर प्रेम आणि प्रभावसहित भजन आणि सत्संगाच्या उत्कट अभ्यासाचा तीव्र प्रयत्न हा एक उपाय आहे, असे मला वाटते. म्हणून सतत अभ्यास होण्यासाठी विशेष प्रयत्न करावयास हवा. मग प्रेम आपोआप होऊ शकते.

निरंतर प्रेमसहित अभ्यास होण्यासाठी प्रबळ उपाय विचारला आहे. तर माझ्या समजुतीप्रमाणे आळस सोडून शरीराला मृत्तिकेसमान मानून विश्वासाने तना-मनाने ध्यान आणि जपाचा तीव्र प्रयत्न करावयास हवा. ध्यानाच्या स्थितीत जर काही भासले तर ते केवळ कल्पित आणि मृगजळासमान समजणे उचित आहे. काहीही नाही, असे समजून दृश्य लक्ष्य विसरावयास पाहिजे आणि ते अनित्य समजून त्याला सोडून द्यावयास हवे. केवळ अचिन्त्यात अचिन्त्य होऊन संकल्प-त्यागाचे ज्ञानही विसरून जाणे उचित आहे. केवळ सच्चिदानंदघनाशिवाय दुसरे काहीच नाही, असा भाव व्हावयास हवा. जर वैराग्य आले, तर प्रयत्न केल्याशिवायही साधन होऊ शकते. परंतु अंतःकरण शुद्ध असल्याशिवाय वैराग्य फार काळ टिकणे कठीण आहे. संसार आणि शरीराला क्षणभंगुर आणि कालकवलित समजून आणि वेळेला अमूल्य समजून

भजन केल्याने भजन-ध्यान अधिक होऊन अंतःकरण निर्मळ होते आणि जेव्हा अंतःकरणातील पाप आणि दोष नष्ट होतात तेव्हा वैराग्य अधिक काळापर्यंत टिकू शकते.

X X X X च्या पत्रात ध्यानाविषयीचा खुलासा विचारला आहे. त्याचा सारांश या प्रमाणे वाटतो.

(१) सगळीकडे एक सच्चिदानंदघन समभावाने स्थित आहे. त्यात ज्या गोष्टी भासतात त्या वास्तविक नाहीत. ज्याच्या द्वारे भासते आणि जे काही भासते ते शरीर आणि संसार केवळ कल्पनामात्र आहे. वास्तविक पाहता एक परमेश्वरच समभावाने सगळीकडे परिपूर्ण आहे. जर दुसरी कुठली वस्तू भासली तर तिला मानू नका. केवळ आनंदघनच बाकी राहील आणि तो आनंदघन असल्याचा भावसुध्दा त्या आनंदघनातच आहे. आनंदघनाला समजणारा दुसरा वेगळा कोणी नाही.

(२) सर्वव्यापी सच्चिदानंदघन परमात्म्याच्या स्वरूपात स्थित होऊन त्या सर्वव्यापक स्वरूपाच्या अंतर्गत संसाराला संकल्पाचा आधार मानून सर्वव्यापक द्रष्टा होऊन सर्वव्यापक ज्ञाननेत्रांनी संसाराला कल्पित आणि परमात्म्याहून भिन्न पाहावे. गीता अध्याय १४ श्लोक १९ व्या प्रमाणे सर्व व्यापकाच्या अंतर्गत कल्पित शरीराद्वारा प्रत्येक वेळी भजन होत आहे.

सर्वव्यापक भगवत्स्वरूपात स्थित राहून त्या शरीरासहित भजनाला समष्टिबुध्दीने अर्थात सर्वव्यापी ज्ञाननेत्रांनी पाहा.

(३) सर्वव्यापक अनंत बोधस्वरूप द्रष्टा होऊन या मनुष्यशरीराला, ज्यात पहिल्यांदा आपली स्थिती होती, त्याला ॐकाराचा आकार समजून ॐकाराचे चिंतन करत राहा. त्या ॐकाररूप शरीराला आपल्या संकल्पाचा आधार समजा. खरे पाहता त्या सच्चिदानंदघनाशिवाय वेगळे असे दुसरे काही नाही. याप्रमाणे आपल्या निश्चयात स्थित राहा. असा दृढ अभ्यास झाल्याने एका सच्चिदानंदघनाशिवाय दुसरे काही उरतच नाही, कल्पित शरीराचे लक्ष्यसुद्धा सुटते. ॐकाराचा अर्थ सच्चिदानंदघन आहे आणि तोच शेवटी

शिल्लक राहातो. ॐकाराचे चिंतन समजल्यानंतर सोडता कामा नये. एकांतात याप्रमाणे साधन करावयास हवे.

(४) श्री सच्चिदानंदघनाचा भाव (असणे) आणि शरीर, संसार आणि जे काही चिंतनात येईल, ते काहीही खरे नाही, असा दृढनिश्चय झाल्याने एका सच्चिदानंदघनाशिवाय सगळ्याचा अभाव होऊन परमानंदमय एक सच्चिदानंदच सगळीकडे उरतो. हेच परमपद आहे.

वरील समाचार X X X X च्या चिठ्ठीतील भाव आहेत. माझ्या बुद्धीप्रमाणे ध्यानाविषयी नीट समजण्यासाठी थोडे आणखी विस्ताराने लिहिले आहे.

वेळ अमूल्य समजावयास हवा. हे समजणारा एक क्षणसुद्धा मिथ्या कामात घालवत नाही. जे मिथ्या आणि वृथा कामात वेळ घालवतात, ते वेळाचे महत्त्व समजत नाहीत. अल्प किमतीची वस्तूसुध्दा कोणी फुकट जावी असे इच्छित नाही. मग तो अमूल्य वस्तूला व्यर्थ कसे जाऊ देईल ?

ज्या ध्यानाच्या वेळी आनंदाची लालसा असते, ते ध्यान निम्न श्रेणीचे आहे. अशी इच्छा ठेवणाऱ्याने तर थोड्या वेळाच्या सुखासाठी किंवा आनंदासाठीच ध्यान केले. भगवंताचे चिंतन ही एक अमूल्य वस्तू आहे. हे मर्म समजणारा ध्यान सतत कसे राहील, असा प्रयत्न करील. आनंदाची आकांक्षा ठेवणार नाही. काही काळासाठी मिळणारा आनंद जरी मिळाला नाही, तरी त्याची काही आवश्यकता नाही. पण भगवंताचे चिंतन सतत राहावयास हवे.

[ १९ ]

काळ निघून जात आहे. जे काही करावयाचे ते लौकर करावयास हवे. तुम्ही उशीर का करता ? तुम्हांला काय पाहिजे ? तुमच्यावर कसले दडपण आहे ? तुम्ही भगवंताला क्षणभरसुद्धा विसरता कामा नये. शेवट एका भगवंताला सोडून दुसरे कोणीही तुमचे होणार नाही. या असार संसारात काही सार नाही. सगळे मायावी आहे, असे समजून बुद्धिमान या जाळ्यात अडकत नाहीत. पण

जे समजत नाहीत ते या मायेच्या मोहजाळ्यात भोगरूपी दाण्याच्या लोभाला बळी पडून फसतात.

[ २० ]

'दुखण्यामुळे अधिक वेळ पडून राहावे लागते आणि त्यामुळे आळस आणि झोप जास्त येते. त्यामुळे साधनात अधिक चुका होतात', असे लिहिले आहे. ते ठीक आहे. अशा वेळी श्रीगीतेचा अभ्यास करावयास हवा. जर जास्त वेळ अभ्यास करण्यामुळे झोप आली तर ध्यानसहित भजन करता करता झोपावयास हवे. भगवंताचे स्मरण ठेवण्यात खूप चुका होतात. त्या होऊ नयेत म्हणून तीव्र अभ्यासाचा प्रयत्न करावयास हवा.

भगवंतावरील प्रेम वाढण्याविषयी विचारले आहे, तर यासंबंधी पहिल्यांदाच लिहिले आहे. भगवंताचा गुणानुवाद वाचणे, ऐकणे आणि सांगण्याने तसेच त्याचे लक्षण, आशय आणि प्रभावाकडे ध्यान दिल्याने भगवंतावरील प्रेम अधिक होऊ शकते. आणि या सगळ्या गोष्टी तीव्र भजन आणि सत्संगानेच सिद्ध होतात. ज्या गोष्टीची तीव्र इच्छा होते, त्यासाठी स्वाभाविकपणेच अधिक प्रयत्न आणि उपाय केले जातात. ज्यांना धनाची आवश्यकता असते, ते धन मिळविण्यासाठी तना-मनाने प्रयत्न करतात, आणि त्यांच्या मनात बहुधा सतत हीच चिंता असते की धन कसे मिळवता येईल ? धन मिळविण्यासाठी ते आपले मन-बुद्धी आणि सर्व काही कामी लावतात. ज्यांना धनाची लालसा असते, त्यांना धनाची विशेष चिंता असते. त्याचप्रमाणे ज्यांना भगवंताला भेटण्याची इच्छा असते त्याचे मन आणि बुद्धी भगवंताला अर्पण होते. आणि भगवंताला भेटण्यासाठी त्यांना भजन आणि सत्संग करावयाची इच्छा होते. तीव्र इच्छा होण्याने कशी दशा होते हे धनप्राप्तीच्या उदाहरणावरून दिसून येते. ज्या वस्तूची तीव्र इच्छा होते, त्यासाठी उपाय आणि प्रयत्नसुद्धा तीव्र केले जातात.

कोणी माणूस आजारी आहे. वैद्य सांगतात की, अमुक एक वस्तू मिळाली तर हा वाचू शकेल. अशा वेळी त्या वस्तूच्या प्राप्तीसाठी किती प्रयत्न होता असेच प्रयत्न आणि उपाय भजन आणि सत्संगासाठी व्हावयास हवेत. तीव्र इच्छा झाल्यामुळेच तीव्र प्रयत्न होतात. आणि तीव्र प्रयत्न केल्यानेच इष्ट वस्तूची प्राप्ती होते. मिथ्या सांसारिक वस्तू तर प्रयत्न करूनही कधी-कधी मिळत नाहीत. आणि मिळाल्यानंतरही लाभ होतो किंवा होत नाही. पण भजन आणि सत्संगासाठी प्रयत्न केल्याने अवश्य सफलता मिळते. भजन-सत्संगरूपी औषधाचे बराच काळ सेवन केल्याने जन्म-मरणरूपी कठीण भव-रोग जरूर नष्ट होतो. सत्याचा प्रयत्न कधी व्यर्थ जात नाही.

'जपात जास्त चुका होतात', असे लिहिले आहे. तर त्याच्यासाठी काय करावे ते आधी लिहिलेच होते. जपाचा अधिक अभ्यास केल्यानेच जपाची चूक दूर होऊ शकते. आणि चूक झाल्यावरसुद्धा प्रसन्न मनाने जप करण्याचा अभ्यास चालू ठेवल्याने पुढे प्रेमपूर्वक जप होऊ शकतो. ज्यावेळी जप सतत होतो, तेव्हा तो प्रेमपूर्वकच होतो. वैराग्य झाल्यावर तर ध्यानसहित जप प्रयत्न केल्याशिवायही सतत होत राहतो. 'भगवंताचे स्मरण सतत होत राहावे' अशी इच्छाच भगवंताचे निरंतर चिंतन होण्याचा हेतू आहे. जर जप करताना सांसारिक स्फुरण झाले तर प्रयत्नपूर्वक भगवंताविषयी स्फुरण उत्पन्न करण्याचा अभ्यास करावयास हवा. असा अभ्यास केल्याने जपाबरोबर ध्यानाची वृद्धी आणि सांसारिक वासनांचा नाश होऊ शकतो. जर सत्ता आणि आसक्तिरहित स्फुरण झाले तर काही हरकत नाही. सांसारिक सत्ता आणि आसक्तीचा नाश होण्याचा उपाय जप आणि सत्संग आहे. तो होण्यासाठी अभ्यासाची अधिक आवश्यकता आहे.

भगवंताच्या नावाचे स्मरण सतत व्हावयास हवे. मग अभ्यास वाढल्यावर संसारात वैराग्य आणि भगवंताच्या स्वस्वरूपात स्थितीसुद्धा होऊ शकते. श्री परमात्म्याची तर सर्वांवर असीम कृपा आहे. ज्याला हे पटते, तोच भगवंताचा कृपापात्र आहे. मग त्याला लौकरच देव भेटतो. कारण मग त्याला भेटल्याशिवाय त्याला चैन पडत नाही. संसार आणि शरीराला मिथ्या आणि नाशवंत आणि

फक्त एका परमेश्वराला आनंदाने परिपूर्ण बघितल्यावर वैराग्य येऊ शकते. संसाराविषयी घृणा निर्माण झाल्यावर सांसारिक चिंतन आपोआप कमी होऊ शकते.

प्रेम जडण्याचा उपाय त्याच्या स्वरूपाचे चिन्तन, नावाचा जप आणि सत्संगच आहे. प्रयत्न जितका अधिक होईल तितकाच जपही अधिक होईल. जो भगवंताला सर्वज्ञ, अन्तर्यामी, दयासिन्धू आणि अकारण हित करणारा समजेल, तो कधीही कुठल्याही गोष्टीसाठी त्याला प्रार्थना करणार नाही. जर प्रार्थना केली तर निरन्तर भावसहित चिन्तन होण्यासाठीच करील. प्रत्येक क्षणी नामस्मरणाचा अभ्यास झाला, तर मग ध्यानाची स्थिती होऊ शकते. भगवंताची आठवण ठेवूनच सांसारिक कामे करण्याचा प्रयत्न करावयास हवा. सांसारिक कामांपेक्षा भजन-ध्यानाला उत्तम आणि बहुमूल्य समजावयास हवे.

सांसारिक कामांचे कितीही नुकसान झाले, तरी त्या अनित्य कामांसाठी भजन-ध्यान सुटता किंवा चुकता कामा नये. असा दृढ विश्वास झाल्यावर मग सांसारिक कामे करताना सुद्धा भजन होऊ शकते.

विवाहाच्या वेळी कशा प्रकारे काय करावयास हवे, त्यासंबंधी पहिल्यांदाही लिहिलेच होते. विवाह वगैरे सांसारिक कामे नदीच्या प्रवाहासारखी आहेत. जो कोणी पुरुष भगवत्-चरणरूपी नौकेवर नामरूपी दोरी पकडून ध्यानाद्वारे आरूढ होईल तोच वाचू शकतो. जो नदीच्या प्रवाहात वाहात जातो; त्याची फार दुर्दशा होते.

भजन-सत्संग अधिक झाल्यानंतर अंत:करण शुद्ध झाल्यावर धारणा होण्यास वेळ लागत नाही. सांसारिक इच्छा राहू नये, यासाठी तुम्ही प्रयत्न करता आहातच, पण त्यासाठी आणखी प्रयत्न आणि पुरुषार्थ करावयास हवा. त्यासाठी सतत अभ्यासच महत्त्वाचा आहे. अभ्यास भगवंत कृपेहून स्वतंत्र आहे. तुम्ही जगात येऊन काय केले ? जर वेळ असाच निघून गेला तर काम लौकर कसे पूर्ण होईल ? वेळ अमूल्य कामातच घालवावयास हवा. नाहीतर संसार, धन आणि भोग काय कामाचे ? तीच वस्तू आपली आहे की जिच्यामुळे

भगवंतावर विशेष प्रेम जडेल. उरलेली सगळी माती आहे. सोन्याच्या आणि दगडाच्या डोंगरात काय फरक आहे ? काहीच बरोबर येणार नाही. शरीरसुद्धा मातीत मिसळणार आहे. हे समजून शरीराचा पूर्ण फायदा घ्यावयास हवा. भगवंताच्या भजन-ध्यानाशिवाय एक ही क्षण व्यर्थ जाऊ देऊ नये. कशाहीसाठी क्षणभरसुद्धा भजन-ध्यानाशिवाय जाऊ देऊ नये. कारण सगळे काही अनित्य आहे. अनित्यासाठी आपला अमूल्य वेळ वाया घालवू नये.

[ २१ ]

तुम्ही विचारले आहे की, भगवंताचे भजन कशा प्रकारे करावे ? तर सतत भगवंताचे नामस्मरण आणि त्याच्या स्वरूपाचे ध्यान करावयास हवे. भगवद्भक्तांबरोबर आणि शास्त्रांच्या विचाराने सुद्धा अधिक भजन होऊ शकते. भक्तांद्वारा भगवंताचे गुणगान आणि त्याचे प्रभाव ऐकून भगवंतावर शीघ्र प्रेम जडू शकते, म्हणून भक्तांचा संग करण्याचा विशेष प्रयत्न करावयास हवा.

तुम्ही लिहिले आहे की, सुंदरकांडाचा पाठ करतो. ती उत्तम गोष्ट आहे. पण बाल, अरण्य आणि उत्तरकांडाचेही अध्ययन करावयास हवे. त्यातही भगवत्प्रेम आणि भक्तीच्या पुष्कळ चांगल्या गोष्टी आहेत. सगळ्या रामायणाचा पाठ करावयास हवा. तुम्ही लिहिले आहे की, गीतेचा आणि श्रीविष्णुसहस्त्रनामाचाही पाठ करतो. ती फार आनंदाची गोष्ट आहे. पण पाठ अर्थासहित करावयास हवा. त्याच्या अर्थासहितच्या अध्ययनाने मन आणि बुद्धी भगवंताकडे वळू शकते.

भगवंताच्या सगुण मूर्तीचे ध्यान जसे ध्रुवाने केले होते, तसे करावयास हवे.

पहाटे सूर्योदयापूर्वी चार घटका उठले तर फार उत्तम. नाहीतर कमीतकमी एक तास आधी तरी अवश्य उठावयास हवे आणि लगेच शौच-स्नान करून संध्या-गायत्रीबरोबरच वरील पाठ करावयास हवेत.

सकाळी १० वाजता मौनपणे भोजन करावयास हवे. एकदाच ताट

भरून घेऊन नैवेद्य दाखवून जेवणे उचित आहे. पंच महायज्ञ रोज करणे उचित आहे. जर सर्व रोज होऊ शकले नाही, तरी कमीत कमी संध्या, गायत्री-जप आणि बलिवैश्वदेव तरी अवश्य करावयास हवा.

सत्संग सकाळ-संध्याकाळ दोन्ही वेळा करणे उचित आहे. भजन, ध्यान आणि सत्संगाच्या अधिक अभ्यासाने सांसारिक वैराग्य आपसूकच होऊ शकते. सांसारिक पदार्थांना नाशवंत आणि क्षणभंगुर समजून भोगांचा त्याग करावयास हवा.

जर भवसागर पार करावयाचा असेल, तर सतत भगवंताच्या नावाचा जप करावयास हवा. जप करण्यामुळे भगवंताच्या स्वरूपाचे ध्यान आणि भगवंतावर अनन्य प्रेम आपोआप होते. निष्काम झाल्यावर प्रेम होण्यास वेळ लागत नाही. एकूण सगळ्याचे सार हेच की निष्काम भावनेने भगवंताचे नामस्मरण करावयास हवे.

काळ निघून चालला आहे. गेलेली वेळ परत येत नाही, म्हणून अमूल्य वेळाचा एक क्षणसुद्धा वाया घालवू नये. भजन-ध्यान विसरू नये.

काम, क्रोध, लोभ आणि मोह वगैरे शत्रू आपले खरे धन लुटत आहेत, म्हणून रामनामाचा बिगुल वाजवत राहावयास हवा. बिगुल वाजत राहिल्याने जसा शत्रू जवळ येत नाही, तसेच रामनामरूपी बिगुल वाजत राहिल्याने काम-क्रोधादी शत्रू जवळ येत नाहीत. म्हणून सावध राहावयास हवे.

*बिन रखवारे बावरे, चिडिया खाया खेत।*
*आधा परधा ऊबरै, चेत सके तो चेत॥*

*इस औसर चेता नहीं, पशु ज्यों पाली देह।*
*रामनाम जाना नहीं अंत पड़ी मुख खेह॥*

या दोह्याचे तात्पर्य समजावयास हवे. सत्संग आणि भगवंताच्या नावाचा निष्कामभावाने प्रेमपूर्वक सतत जप करणे हाच परम पुरुषार्थ आहे. त्यानंतर भगवंतावर प्रेम-विश्वास आणि त्याचे सतत ध्यान अवश्य होते. आपल्या

आयुष्याची वेळ जवळ आली आहे. म्हणून अज्ञाननिद्रेतून शीघ्र सचेत होण्याची आवश्यकता आहे.

हा देव-दुर्लभ मनुष्य देह मिळाला असता जीवन व्यर्थ न जाऊ देता सार्थक करावयास हवा. जो माणूस मनुष्यजन्माला येऊन भगवद्भजन करत नाही त्याला शेवटी फार पश्चात्ताप होतो. कारण जर आपले शरीरसुद्धा काही कामाला येत नाही, तर दुसऱ्या पदार्थांची आशा करणेच व्यर्थ आहे.

## [ २२ ]

तुम्हांला ज्या कामासाठी मनुष्यदेह मिळाला आहे, ते काम विसरू नये. आधी तर माणसाचा जन्म मिळणे कठिण आहे. त्यातही ब्राह्मणाच्या घरी जन्म होणे, यज्ञोपवीत संस्कार होणे, माता-पिता, भाऊ, बायको, मुले आणि व्यापार मनाप्रमाणे होणे, फार भाग्याची गोष्ट आहे. गरजेपुरते धन आणि घरसुद्धा तुमच्याजवळ आहे. अशा स्थितीतही जर आत्मोद्धारासाठी उपयोग झाला नाही तर मग कधी होईल ? अशी अनुकूल स्थिती सदा राहणार नाही. म्हणून जोपर्यंत मृत्यू दूर आहे आणि आरोग्य आहे, परिस्थिती अनुकूल आहे अशा वेळीच जे काही उत्तम काम करावयाचे ते करावयास हवे. म्हणजे मग पश्चात्ताप करावयाची वेळ येणार नाही. तुम्हांला आता संसारात आणखी काय हवे आहे? आता कुठल्या गोष्टीची कमतरता आहे की ती पूर्ण झाल्यावर तुम्ही स्वतःच्या कल्याणासाठी प्रयत्न कराल ? या जगात एका भगवंताशिवाय दुसरे कोणी तुमचे नाही. माता, पिता, भाऊ, बायको, मुलगा, घर, पैसे सगळे नाशवंत आहे. त्याचा संग थोड्या दिवसांचा आहे. यातील काहीही तुमच्याबरोबर येणार नाही. बाकी गोष्टी जाऊ देत, स्वतःचे शरीरसुद्धा बरोबर येणार नाही. इथेच राहील. आपल्या सगळ्या लोकांचा संयोगसुद्धा सदा राहणारा नाही. शरीराचा काहीही भरंवसा नाही. मी असूनसुद्धा जर तुम्ही तुमच्या परम गतीसाठी प्रयत्न करीत नाही, आणि जर मी आधी गेलो, तर तुमच्या कल्याण-साधनात आणखी ढिलाई होणे विशेष नाही. तुम्ही नाशवंत

क्षणभंगुर सांसारिक पदार्थांसाठी जेवढा प्रयत्न करता, तेवढा प्रयत्न जर भगवंताच्या प्राप्तीसाठी कराल तर लगेच भगवंताची प्राप्ती होऊ शकते. भगवंतासारखा प्रेमी, दयाळू आणि सर्वशक्तिमान दुसरा कोणी नाही. मग तुम्ही त्या खऱ्या प्रेमिकासाठी का प्रयत्न करत नाही ? दिवस-रात्र तुच्छ धनाचे पारायण का करता ? जर हे शरीरच तुमच्या कामी येणार नाही तर मग पैशाची काय कथा ?

शरीराचा नाश झाल्यावर फक्त आता केलेले भजन, ध्यान, सत्संग आणि शास्त्रांचा अभ्यासच कामी येईल, दुसरे काहीही कामीं येणार नाही. शरीराचा नाश अवश्य होईल. त्याला वाचविण्याचा काही उपाय नाही. पण शरीराचा नाश झाल्यानंतरही आत्म्याचा नाश होत नाही. म्हणून शरीराचा नाश झाल्यावर आत्म्याला परम सुख; परम आनंद मिळावा, यासाठी रात्रंदिवस प्रयत्न करणे हेच मनुष्य-जन्माचे उत्तम फळ आहे. त्यानेच श्री सच्चिदानन्द भगवंताची प्राप्ती होते. यासाठीच मनुष्यजन्म मिळाला आहे. म्हणून भगवंताच्या प्राप्तीसाठी तत्पर होऊन प्रयत्न करावयास हवा.

## [ २३ ]

तुम्ही लिहिले आहे की, सध्या चित्तवृत्ती संसारात विशेष लागली आहे. ते समजले. आसक्तिपूर्वक सांसारिक कार्य विशेष पाहिल्यामुळे असे होते. म्हणून सत्संग करावयास हवा. जर तुम्हांला सत्संगाची विशेष इच्छाच नाही तर दुसरा कोण काय करील ? आणि जर तुम्हांला सांसारिक कामामधून वेळच मिळत नाही, तर मी तरी काय उपाय करू ?

ऐकलंय की, तुमच्या घरी सत्संग होतो, पण त्यात तुम्ही जात नाही. तुम्हांला विवेकदृष्टीने विचार करावयास हवा की सांसारिक कामापेक्षाही सत्संग करणे निकृष्ट आहे काय ?

तुम्ही लिहिले आहे की, मी जेव्हा स्वत:च्या भगवद्भजन, ध्यान-साधन-संबंधी वर्तमान दशेचा विचार करतो, तेव्हा चित्त फार खिन्न होते आणि सांसारिक

कामेही कमी होतात असे वाटते. म्हणून भगवद्भजन-ध्यान होण्यासाठी पुन्हा पुन्हा लिहितो पण तुम्ही त्यावर विचारसुद्धा करत नाही. म्हणून विचार करावयास हवा की काळ व्यतीत होत आहे. भगवंताला दिलेल्या वायद्याचे दिवस जवळ येत चालले आहेत. जो काळ निघून गेला, तो परत येऊ शकत नाही. म्हणून माणसाच्या जीवनाचे सार्थक करावे. म्हणजेच भगवद्भजन, ध्यानासाठी वेळ काढावयास हवा. वेळ नक्की काढावयास हवा. कारण एकदा का 'काळा' चे बोलावणे आले की मिनिटभरसुद्धा थांबता येणार नाही. म्हणून या गोष्टीवर विचार करून आधीपासूनच सावध झालात तर फार आनंदाची गोष्ट आहे. नाहीतर मग पश्चात्ताप करावा लागेल.

तुम्ही लिहिले आहे की, माझ्या सोबत जसे भजन-ध्यान होत होते, तसे आता होत नाही. ते समजले. असे लिहिणे ही आपल्या प्रेमाची व श्रद्धेची गोष्ट आहे. मी तर एक सामान्य माणूस आहे. तुम्हांला अजून भजन-ध्यानाचा प्रभाव माहीत नाही. जर नीटपणे भजन-ध्यानाचा प्रभाव कळता, तर तुम्ही भजन-ध्यान सोडले नसते.

तुम्ही लिहिले आहे की, माझ्या संगतीत भजन-ध्यान विशेष होत होते. जर हे खरे आहे आणि तुम्हांला भजन-ध्यानाचा प्रभाव माहीत आहे, तर माझा वियोग आपल्याला कसा सहन झाला असता ? असो, माझ्या संगतीची गोष्ट ठीक आहे. पण श्री नारायण देवाला कधीही विसरता कामा नये. अर्थात् त्याचे निरंतर चिंतन करावयास हवे आणि असे प्रेम करावयास हवे की, त्याचा वियोग सहन होता कामा नये. त्याचा वियोग झाल्यास शरीरात प्राण राहू नये. जसा पाण्याशिवाय मासा राहू शकत नाही.

जर तुम्ही सांसारिक भोगांपेक्षा परमात्म्याच्या ध्यानाला श्रेष्ठ समजून अंशमात्र ध्यानापेक्षा त्रैलोक्याच्या राज्याला कमी समजला असता, तर तुमचे साधन दिवसेंदिवस प्रखर झाले असते आणि सतत ध्यानाची इच्छा जागृत झाली असती. जर तुम्हांला भगवंताच्या ध्यानाची व सत्संगाची विशेष आवश्यकता वाटली असती, तर त्यासाठी प्रयत्न सुद्धा झाले असते. माझ्या संगतीची तुम्ही जी थोडी इच्छा प्रगट केली, ती तुमची कृपा. पण फार

पश्चात्तापाची गोष्ट आहे की, तुम्हांला थोडासा का होईना, पण ध्यानजनित आनंद मिळाल्यानंतरही त्या आनंदाचा तिरस्कार तुमच्या द्वारे कसा केला गेला ? जर ध्यानात आनंद आहे हे सत्य आहे, तर मग त्यां आनंदासाठी प्राणान्त प्रयत्न का करत नाही ? आणि जर त्या ध्यानात आनंद नसेल, तर मग तुम्ही त्या ध्यानजनित आनंदाची प्रशंसा का करीत होता ? असो. जे घडून गेले ते जाऊ दे. भविष्यात सावधान व्हावयास हवे.

तुम्ही कुठल्या कामात तुमचा अमूल्य वेळ घालवता ? अशाच प्रकारे आजीवन वेळ घालवत राहिल्यावर या जन्मी आपले कल्याण होण्याची संभावना आहे ? आणि जर संभावना नसेल तर लगेच स्वत:च्या उद्धारासाठी कटिबद्ध होऊन ध्यानासाठी तीव्र प्रयत्न करावयास हवा. कारण शरीर क्षणभंगुर आहे. म्हणून शरीराचा काही विश्वास नाही. जर लगेच प्राणान्त झाला, तर मग काय करू शकू ? तुम्ही कोणाच्या भरवशावर निश्चिंत आहात ? तुमच्याजवळ कुठली शक्ती आहे ? केवळ एका नारायणदेवाशिवाय तुम्हांला मदत करणारे कोणीही नाही. कशासाठी या असार संसाराचा आसरा घेऊन आपले अमूल्य जीवन व्यर्थ घालवत आहा ?

[ २४ ]

संसारात भगवत्प्रेमाचा प्रवाह तीव्रतेने चालवावयास हवा. पूर्वीच्या काळी कितीतरी वेळा वेळो-वेळी प्रेम-प्रवाह वाहिला आहे. सध्याच्या काळीसुद्धा श्री नारायणदेवाची पूर्ण कृपा होत आहे. पण जो काही वेळ लागतोय, तो केवळ आपल्याकडून लागतो आहे.

जगात भगवद्भावाचा प्रचार करणारी बहुसंख्य माणसे तयार झाली, तर लगेचच श्रीभगवद्भक्तीचा प्रचार होऊ शकतो. परंतु विद्वान त्यागी आणि सदाचारी पुरुषांची अत्यंत आवश्यकता आहे. अशी माणसे स्वत: प्रेममग्न होऊन जगात भगवत्प्रेम, भक्तीचा प्रचार करतील, तर प्रेमाचा प्रवाह वाहू शकतो.

निष्काम भावनेने सर्वांची सेवा करण्यासारखे दुसरे कार्य नाही.

वास्तविकत: परमसेवा त्यालाच म्हणतात की जी सेवा केल्यानंतर कुठलेही कार्य शेष राहात नाही. अर्थात संसारी माणसांना भगवत्प्रेमाला लावून त्यांना भगवंताच्या परमधामी पोचविण्याची सेवाच वास्तविक परम सेवा आहे. तरीही उपाशी, अनाथ, दु:खी, रोगी, असमर्थ आणि भिक्षुक वगैरेंना अन्न, वस्त्र, औषध तसेच ज्या वस्तूंचा ज्यांच्याजवळ अभाव असेल, त्या वस्तूद्वारा त्यांना सुख देणे व श्रेष्ठ आचरणवाल्या योग्य विद्वान ब्राह्मण वगैरेंना धन वगैरे गोष्टींद्वारा सुख देणे सुद्धा एक प्रकारची सेवाच आहे. तरीही परमसेवा त्यालाच म्हणावे लागेल की, जी केल्यानंतर काही करावयाचे बाकी उरत नाही. अशा सेवेसारखी दुसरी कुठलीही सेवा असू शकत नाही. म्हणून तुम्हांला सुद्धा निष्काम प्रेमभावनेने जीवमात्राची परम सेवा करावयास हवी.

आपले तन, मन, धन व दुसरे जे काही असेल, ते जर संपूर्ण सांसारिक जीवांच्या उद्धारासाठी, त्यांच्या सेवाकार्यात कामी आले, तर ते सार्थक आहे आणि जे पदार्थ त्या सेवेशिवाय शिल्लक राहतील ते व्यर्थ होत; ते निरर्थक आहेत. असे समजून त्यांची परमसेवा करावयास हवी. असे केल्याने सर्वांभूती अपार प्रेम जडते आणि जीवमात्राबरोबर जे निष्काम प्रेम आहे, ते प्रेम भगवंताच्या बरोबरच आहे. कारण भगवंतच सगळ्या जीवांचा आत्मा आहे.

[ २५ ]

तुम्ही लिहिले आहे की, 'श्रीपरमात्मा देवावर अनन्य प्रेम जडून सांसारिक सत्तेचा अत्यंत अभाव होण्यासाठी उपयुक्त साधन लिहावयास हवे'. ते समजले. प्रत्येक क्षणी संसार स्वप्नवत् किंवा मृगजळासमान मानून सर्वत्र भगवंताच्या सर्वव्यापी स्वरूपाचे चिंतन करण्याने सांसारिक सत्तेचा अभाव होऊन सर्वत्र श्री सच्चिदानन्दघन परमात्म्याची प्रतीती होऊ शकते. भगवंताचे सतत आणि सर्वत्र चिंतन केल्याने आणि त्याच्या भक्तांचा संग केल्याने भगवंतावर प्रेम जडू शकते.

श्रीमद्भगवद्गीतेचा अर्थासहित अभ्यास केल्याने अथवा भगवंताच्या पवित्र नावाचा जप केल्याने, भगवंताच्या आज्ञेनुसार वागल्याने, भगवंतावर अनन्य

प्रेम जडून त्याच्या प्राप्तीची तीव्र इंच्छा होऊन भगवत्प्राप्ती लवकर होऊ शकते. यामध्ये पुरुषार्थच प्रधान आहे.

[ २६ ]

मन स्थिर होण्याचे काही उपाय पहिल्यांदा लिहिले होते - आता पुन्हा लिहीत आहे.

(१) अभ्यास आणि वैराग्याने मनाच्या वृत्ती स्थिर होतात.

(२) प्रत्येक क्षणी श्वासाबरोबर प्रयत्नपूर्वक विश्वास आणि प्रेमासहित प्रणव (ओंकाराचे) स्मरण करणे, याला अभ्यास म्हणतात.

(३) मन जिथे जाईल तिथे त्याला परमेश्वराच्या स्वरूपात लावावयास हवे.

(४) जिथे मन जाईल त्यातच परमेश्वराचे स्वरूप पहावयास हवे.

(५) ज्यावर अधिक प्रीती असेल त्यात भगवंताची भावना करून त्याचे ध्यान धरावे.

(६) एकांत जागी बसून ओंकाराचा जप करत नाकाने हळूहळू प्राणवायू बाहेर काढून यथाशक्ती रोखावा आणि पुन्हा त्याचप्रमाणे ॐकार जपाबरोबर अपानवायू पूर्ण करून सोडून द्यावा. हा सगळा अभ्यासाचा प्रकार आहे.

(७) पाहिलेल्या आणि ऐकलेल्या वस्तूंच्या आठवणी विसरून चित्त भगवंतावर लावण्याचे नावच वैराग्य. वरील प्रकारे अभ्यास करणे आणि वैराग्य भावना याने मन स्थिर होऊ शकते. यामधील जे करणे आवडत असेल, ज्यामुळे मन प्रसन्न होत असेल, त्याचाच अभ्यास करणे उत्तम आहे, असे मला वाटते.

[ २७ ]

'भगवंतावर प्रेम जडण्याचा उपाय विचारला आहे' तर या गोष्टीला तेच समजू शकतात, ज्यांचे भगवंतावर पूर्ण प्रेम आहे. पण जर तुम्ही विचारलेच आहे तर ते लिहिणे आवश्यक आहे. उत्तम पुरुषांचे म्हणणे आहे की, भगवंताच्या प्रभावाच्या आणि गुणानुवादाच्या गोष्टी वाचल्याने किंवा ऐकल्याने आणि भगवंताचा जप करण्याने अंत:करणाची शुद्धी होते आणि मग भगवंतावर प्रेम जडते. त्याच्या चिंतनाने, निष्काम भावाने त्याचे गुणानुवाद करण्याने व त्याचे गुण आणि प्रभाव समजण्याने त्याच्यावर प्रेम जडू शकते. प्रेम जडल्यावर प्रेमीसंबंधी गोष्टी ऐकूनच रोमांच, अश्रुपात वगैरे प्रेमानंदाची चिन्हे दिसू लागतात. प्रियतमाकडून आलेला साधारण मनुष्यसुद्धा प्रिय वाटतो. एखाद्या साधारण माणसावर प्रेम जडल्यावर त्याचे गुणगान आणि प्रेमाच्या गोष्टी ऐकण्यात आनंद वाटतो, तर मग प्रियतम-शिरोमणी भगवंताची तर गोष्टच काय विचारावी ? उद्धवाच्या गोष्टी ऐकून गोपी जशा प्रेमविव्हळ झाल्या होत्या, तसेच प्रेम आजही होऊ शकते. प्रेमात जितकी कमतरता असेल तितकाच विलंब होईल. भगवान तर सगळीकडे उपस्थित आहे. जोपर्यंत तुमचा विश्वास त्याच्याठायी बसत नाही, तोपर्यंत तो लपलेला आहे.

तुम्ही लिहिले आहे की, आजकाल भजन कमी होते. तर त्याचे काय कारण ? भजन कमी झाले, तर प्रेमही कमी झाले असे समजावे. संसार आणि शरीर वगैरेला अनित्य आणि क्षणभंगुर समजल्यावर विलंब होऊ शकत नाही. भजन अधिक होण्याचा उपाय दुसऱ्या पत्रात लिहिला आहे. केवळ वेळेला अमूल्य समजावयास हवे. मग काही करावयाची आवश्यकता उरत नाही. जर काही करावयाचेच असेल, तर आपल्या प्रिय भगवंतावर निष्कामभावाने पूर्ण प्रेम जडण्यासाठी आपले सर्वस्व त्याला अर्पण करावयास हवे. आपले शरीर आणि प्राण जर याकामी लागले, तर स्वत:ला धन्य समजावे. सत्संग केल्यानंतर भगवंताठायी मन रमत नाही असे होत नाही. सत्संगामुळेच तर उद्धार होऊ शकतो. जर अजून सत्पुरुष भेटले नसतील, तर वेगळी गोष्ट आहे. भजनासाठी वेळ कमी मिळतो असे लिहिले आहे, तर यासाठी तर वेळ काढावयासच हवा.

एक न एक दिवस सगळ्यांना इथून जायचे आहे. जो वेळेवरच वेळ काढतो तोच सदासाठी मुक्त होऊन सुखी होतो.

........ ........

[ २८ ]

तुमच्या वडिलांच्या मृत्यूचा समाचार आणि तुमच्या पुत्र-वियोगाचा समाचार... कडून मिळाला. तुमच्या वडिलांच्या मृत्यूचा समाचार ऐकून एवढा विचार आला नाही. पण तुमच्या पुत्र-वियोगाचा समाचार ऐकून फार विचार केला. पण ज्यावर आपली सत्ता नाही, त्यासाठी काय करावे ? चिंता करूनही काही उपयोग नाही. त्यांनी लिहिले आहे की, तुम्हांला फार चिंता वाटते आणि उद्वेग होतो. ते ठीक आहे. पण अशा प्रकारच्या घटना बघूनसुद्धा वैराग्य आणि उपरती झाली नाही, हे मोठे आश्चर्य आहे.

मी तुम्हांला काय धीर देऊ ? जगात लोक दुसऱ्यांना धीर देण्यासाठी मोठे-मोठे उपदेशाचे डोस पाजतात. पण स्वतःवर तशी वेळ आली असता ज्याचा धीर सुटत नाही, तोच खरा धैर्यवान आणि त्याचाच उपदेश खरा समजला जातो. मी केवळ मित्रत्वाच्या नात्याने तुम्हांला लिहीत आहे. जर काही चूक झाली, तर प्रेमाने तुमची क्षमा मागतो.

होणारे टळत नाही. अभिमन्यूचा मृत्यू प्रसिद्ध आहे. दुसऱ्या सुद्धा अशा अनेक घटना घडल्या आहेत. श्रेष्ठ पुरुषांचे असे म्हणणे आहे की, जगात चिंता करण्यासारखे काहीही नाही. खालील भगवंताच्या उपदेशाचे हे एक पद जर नीट समजले, तर चिंता राहणार नाही.

*'अशोच्यानन्वशोचस्त्वम्'*

याचा खरा अर्थ समजल्यावर चिंता करण्यासारखे काही राहात नाही, मग जर कुठली चिंता राहात असेल तर ती केवळ ईश्वरप्राप्तीची.

........ ........

[ २९ ]

अत्यंत क्रोधाच्या नाशाचा उपाय विचारला आहे'. तर खालील साधनाने क्रोधाचा नाश होतो

(१) सर्वांठायी एका वासुदेव भगवंताचे दर्शन करा. जर परमेश्वराला सोडून दुसरी कोणतीही वस्तूच राहिली नाही, तर मग क्रोध कोणावर करायचा ?

(२) जर सगळाच देव आहे तर मग देवावर क्रोध कसा होईल ? सगळेच देवस्वरूप असल्यामुळे मी सगळ्यांचा दास आहे. त्या नारायणाच्या इच्छेनुसारच सगळे काही होते. तोच सारे काही करवितो, मग क्रोध कोणावर करावयाचा ?

(३) भगवंताला शरण जावयास हवे. जे काही घडते ते त्याच्या आज्ञेने होते. आपल्या इच्छेनुसार करण्याने नारायणाच्या शरणागतीत दोष येतो. ईश्वर त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे ते करो, मी निश्चिंत आहे, अशी भावना असावयास हवी. इच्छा करण्याने क्रोध होतो. इच्छेशिवाय क्रोध असू शकत नाही.

(४) सगळे काही कालकवलित समजावयास हवे. थोड्या दिवसांसाठी मी कशासाठी क्रोध करू ? संसार असार आणि अनित्य आहे. काळानुरूप सगळ्याचा नाश होणार आहे. जीवन फार थोडे आहे. कुणाच्याही मनाला कष्ट होईल, असे काम का करावे ?

(५) जर आपल्यापेक्षा वडील माणसांवर क्रोध आला, तर त्यांची क्षमा मागून, पाया पडून त्यांनी जरी आपल्यावर क्रोध केला तरी हसून प्रसन्न मनाने बोलावे किंवा चूप राहावे.

(६) आपल्यापेक्षा लहानावर क्रोध आला, तर त्याच्या हितासाठी केवळ दाखविण्यासाठी क्रोध करावा. स्वतःच्या स्वार्थाचा त्याग करावयास हवा. इच्छेमुळेच क्रोध येतो. म्हणून इच्छेचा नाश होण्याचा उपाय करावयास हवा. भगवंताचे स्वरूप आणि त्याच्या नावाचे चिंतन केल्याशिवाय असे होणे कठीण आहे.

[ ३० ]

'तुम्ही भगवंतावर प्रेम वाढण्याचा उपाय विचारला आहे'. ती चांगली गोष्ट आहे. परमेश्वरावर ज्यांचे प्रेम आहे ते धन्यवादाला पात्र आहेत. मी तर एक सामान्य माणूस आहे. मी काय लिहू ? पण तुम्ही लोकांनी विचारल्यावर माझ्या मताप्रमाणे काही लिहावयास हवे.

माझ्या समजुतीप्रमाणे परमेश्वराचा प्रभाव आणि आशय समजल्याने त्यावरील प्रेम वाढू शकते. परमेश्वरासमान जगात प्रेम करण्यायोग्य दुसरे कोणी नाही. जे कोणी परमेश्वरावर प्रेम करू इच्छितात, ते सर्वांवर प्रेम करण्यास तयार राहतात. ज्यावर प्रेम करावयाचे तो जरी नीच असला तरी ते त्याच्या नीचतेकडे पाहात नाहीत. जर भगवद्भक्तांचा असा स्वभाव असतो, तर भगवंताची गोष्टच विचारू नका. परमेश्वराचा प्रभाव समजण्यासाठी त्याच्या भक्तांचा संग, नाम-जप, स्वरूपाचे ध्यान आणि यथासाध्य त्याच्या आज्ञेचे पालन करणे सर्वोत्तम समजावयास हवे. यासारखा उत्तम दुसरा उपाय माझ्या मते नाही.

[ ३१ ]

पत्र मिळाले. 'सर्वव्यापी' चे साधन प्रेमाने होण्यात अडचण येते असे लिहिले आहे. तर काही हरकत नाही; सगुण भगवंताचे ध्यान करावयास हवे. सगुणावर प्रेम जडल्यावर त्याचे दर्शन घडल्यावर निर्गुणाचा भाव लगेच लक्षात येऊ शकतो. प्रज्वलित अग्नीचे तत्त्व समजल्यानंतर व्यापक अग्नीचे ज्ञान लगेच होते. हे लक्षात घेऊन 'प्रेमभक्तिप्रकाश' नामक पुस्तकानुसार सगुण भगवंताच्या चरणांचे ध्यान करावयास हवे. तुम्ही लिहिले आहे की, 'भगवंताच्या स्वरूपात मन रममाण झाले नाही'. तर त्यासाठीही चिंता करण्याचे कारण नाही. सगुण भगवंताचे ध्यान असे प्रेमाने करावयास हवे की, मग आपल्या शरीराचीही शुद्ध राहू नये. चतुर्भुज श्रीविष्णू भगवान किंवा द्विभुज मुरलीमनोहर श्रीकृष्ण भगवान यांमधील आपल्या आवडीप्रमाणे कोणाचेही ध्यान करू शकता.

तुम्ही लिहिले आहे की, 'बुद्धी अजूनपर्यंत भगवंताच्या स्वरूपाचा निश्चय करू शकली नाही'. स्वाभाविकत: शुद्ध सत् चित् आनंदघनाचे स्वरूप बुद्धीच्या कक्षेत येणारी गोष्ट नाही. निर्गुण ध्यानाचा विषय कठीण आहे. त्यापेक्षा सगुण ध्यान करणे सोपे आहे. दोन्हीचे फळ एकच आहे. म्हणून तुम्हांला सगुण ध्यानच करावयास हवे.

तुम्ही लिहिले आहे की, 'अशी उत्कंठा असावयास हवी, ज्यात एका नारायणाशिवाय दुसरे काही असू नये.' अशी उत्कंठा गोपींची होती. त्या जेव्हा श्रीकृष्ण भगवंताच्या ध्यानात मग्न होत असत, तेव्हा त्यांना दुसरे काही दिसत नसे. अभ्यास केल्यानंतर तुमची दशासुद्धा तशी होऊ शकते.

साधनाच्या कमतरतेविषयी लिहिले, ते ठीक आहे; पण सत्संग आणि जपाचा अभ्यास वाढविल्याने साधनाची कमतरता दूर होऊ शकते. सगुण भगवंताला भेटण्याची अत्यंत उत्कंठा असल्यास भगवंताचे दर्शनही होते. याशिवाय दुसरा कोणता उपाय दिसत नाही. भगवत्प्रेमाची इतकी तीव्र इच्छा व्हावयास हवी की, भगवंताला भेटल्याशिवाय चैन पडू नये. अशी तीव्र उत्कंठा असल्यास देव भेटतो.

आई-वडिलांच्या सेवेत कमतरता झाल्याचा समाचार मिळाला. असे का होते ? आई-वडिलांची सेवा करणे परम धर्म आहे. पण ही कमतरता भगवंताच्या भजनाने पूर्ण होऊ शकते. सतत भगवंताचे भजन झाल्याशिवाय दोषांचा नाश होणे कठीण आहे. जे आई-वडिलांची सेवा करीत नाहीत, त्यांच्या जीवनाचा धिक्कार असो. आई-वडिलांना तर कुठल्याही गोष्टीसाठी नाराज करू नये. भजन, ध्यान, सत्संगासाठीसुद्धा त्यांच्या स्वार्थवश आज्ञेचे उल्लंघन करू नये. आपला मोठ्यात मोठा स्वार्थ साधण्याचे कामसुद्धा आई-वडिलांच्या आज्ञेविरुद्ध करू नये. जर अशी कुठली आज्ञा असेल की, जिच्यामुळे आई वडिलांच्या उद्धारात विघ्न येत असेल, त्यांना पापाचे भागिदार व्हावे लागत असेल, तर ती आज्ञा मानू नये. जशी भक्तराज प्रल्हादाने पित्याच्या हितासाठी त्याची आज्ञा मानली नव्हती.

याप्रमाणे जर भजन, ध्यान, सत्संगात अवरोध आणणारी, हिंसेला प्रवृत्त करणारी आई-वडिलांची आज्ञा मुलाने ऐकली नाही, तर काही हरकत नाही.

कारण त्यामुळे तो आई-वडिलांना पापापासून वाचवितो. त्यांच्या हितासाठी असे करतो. स्वत:च्या स्वार्थासाठी करीत नाही. पण हे सोडून इतर कामांच्यावेळी त्यांच्या आज्ञेचा भंग करू नये. धन-संपत्तीच नव्हे, तर त्यांची आज्ञा पाळण्यासाठी प्राण गेले तरी चालेल. कारण शरीर त्यांच्याच रजवीर्यापासून उत्पन्न झालेले आहे. त्यांनीच लालन-पालन केले आहे. त्या शरीरावर आपला काय हक्क आहे ? त्यावर आपले प्रभुत्व मानणे नालायकपणा आहे. जगात असे पुष्कळ मूर्ख आहेत, जे स्त्री, पुत्र, धन आणि आरामासाठी आई-वडिलांचे शत्रू होऊन त्यांना दु:ख देतात. त्यांची फार दुर्गती होते. आणि आपल्या या पापामुळे नरकात जावे लागते. जर शास्त्र सत्य असेल, तर अशा पुरुषांचा उद्धार होणे कठीण आहे.

यात काही शंका नाही की, भगवंताचे भजन, ध्यान आणि सत्संगामुळे अत्यंत नीच प्राण्यांचाही उद्धार होतो, ते तरून जातात. पण फार जुन्या दुखण्यासाठी औषधसुद्धा दीर्घकाळ घ्यावे लागते. त्याचप्रमाणे ज्यांचे जितके अधिक पाप असेल, तेवढा त्याला भगवंताच्या दर्शनासाठी अधिक वेळ लागतो. पापांच्या मुळे त्याचा देवावर विश्वास नसतो. म्हणून पापांपासून वाचून सदैव भगवंताचे भजन करावयास हवे.

## [ ३२ ]

तुमचे पत्र मिळाले. तुम्ही लिहिले आहे की, 'समष्टीचे ध्यान बहुधा निरंतर राहते. झोपणे, उठणेसुद्धा याच स्थितीत होते, असे अनुमान आहे. परंतु अचिन्त्याच्या ध्यानाची स्थिती बरोबर राहात नाही. ध्यानकाळात अचिन्त्य ध्यान विलक्षण होते. परंतु या विलक्षणतेला समजण्याच्या वृत्तीचा अभाव ध्यानकाळानंतर होत नाही. त्यावरून असे समजते की, ध्यानकाळातसुद्धा विलक्षणतेचा अनुभव करणारी वृत्ती अप्रत्यक्षरूपात होती ते ठीक आहे. तुम्ही लिहिले आहे की, 'माझी ही ध्यानाची स्थिती पूर्वीप्रमाणेच आहे. गेल्या वर्षी प्रमाणे वाढली नाही. थांबल्यासारखी वाटते.' ते ठीक आहे. तुमची स्थिती

थांबलेली नाही. केवळ थांबली आहे, असे तुम्हांला वाटते. गेल्या वर्षीपेक्षा या वर्षी साधन वाढले आहे; पण थांबल्यासारखे वाटते. कारण साधन वाढले तरी फार तीव्रतेने वाढले नाही तर साधकाला त्याच्या वृद्धीची प्रतीती होत नाही. दुसरे असे की, जसे कुणा विद्यार्थ्याने पहिल्यांदा कधीतरी कौमुदीचा पूर्वार्ध वाचलेला असेल, मग काही काळाने त्याची विस्मृती झाली असेल आणि मग नंतर काही काळाने पुन्हा अभ्यास सुरू केल्यास जसा पूर्वी केलेल्या अभ्यासामुळे तो पटकन होतो, पण उत्तरार्धाचा अभ्यास पटकन होत नाही असे वाटते. तसेच तुमचे पूर्वकृत साधन थोड्याशा अभ्यासाने प्रगट झाले. गाडलेले धन अचानक मिळावे, त्याप्रमाणे तुमच्या पूर्वप्राप्त परंतु अज्ञात साधनाच्या अकस्मात येण्याने तुम्हांला साधन आणि स्थिती फार वाढल्यासारखी वाटली. म्हणूनच गेल्या वर्षीच्या व या वर्षीच्या स्थितीत फरक वाटतो. साधन थांबलेले नाही किंवा तुम्हांला वाटते तसे कमीसुद्धा झालेले नाही. जी काही गती कमी झाली, त्याचे कारण हे आहे की, गेल्या वर्षी अधिक लाभ वाटल्याने आनंदामुळे उत्साह वाढला होता. त्यामुळे साधन विशेष तीव्र झाले होते. या वर्षी लाभ कमी झाला, असे वाटल्यामुळे उत्साहाने प्रयत्न झाला नाही. तरी साधन वाढलेलेच आहे. परंतु ज्याप्रमाणे सन्निपात झालेल्या रोग्याचा सन्निपात बरा झाल्यावर जरा जरी त्याच्या पोटात दुखले, तरी तो वैद्यास म्हणतो, 'माझ्या पोटात दुखते, मी बरा झालेला नाही' त्यावर वैद्य म्हणतो, 'तुझा मुख्य रोग बरा झालेला आहे. जरासे पोटात दुखले तर कसली आली काळजी ?' तुमची अवस्थासुद्धा अशीच आहे.

तुम्ही लिहिले आहे की, 'आता वेळ का लागतोय ?' तर उशीर अशासाठी होतो की साधक उशीर सहन करतोय. जर साधकाचे प्राण भगवंताच्या वियोगामुळे उडू लागले तर मग देव भेटावयास मुळीच वेळ लागणार नाही. जोपर्यंत साधक परमात्म्याचा विरह सहन करू शकतोय, त्याच्याशिवाय काम होतंय, तोपर्यंत भगवंत म्हणतात, माझ्याशिवाय जर त्यांचे काम चालले आहे, तर मग घाई कशासाठी ? ज्या दिवशी साधक भगवंताशिवाय राहू शकणार नाही, त्या दिवशी भगवंतसुद्धा भक्ताशिवाय राहू शकणार नाही. कारण ते परम दयाळू आहेत. विलंब भगवंताला भेटण्याच्या इच्छेत आहे. भगवंत मिळविण्यात नाही. वास्तविकतः त्याच्या हृदयात उशीर तुमच्यामुळे होतोय.

तुम्ही लिहिले आहे की 'माझे साधन, प्रेम आणि बळ पहिल्यांदाही असेच होते.' हे बरोबर नाही. साधन, प्रेम आणि बळ पहिल्यांदाही वाढले होते आणि आता उत्तरोत्तर वाढत आहे. तुम्हांला प्रतीत होत नाही. जे काही बळ प्राप्त होते, नि:स्वार्थ आणि निष्काम भावनेची जी पुंजी असते, ती कधीही कमी होत नाही; उत्तरोत्तर वाढते. साधक तिला वाढवू शकतो. जसे सोने गाळण्याच्या मुशीत असलेले सोने नाश पावत नाही. उरलेल्या रिकाम्या जागेत सोने भरण्याची आवश्यकता आहे. (दृष्टांत) सोनार सोने गाळून शुद्ध करण्यासाठी चोख सोने, इकडे तिकडे उडलेले सोने, तसेच दुसऱ्या धातूत व कचऱ्यात मिसळलेले सोने सगळ्याला मुशीत घालून त्यात 'सुहागा' मिसळून विस्तवावर ठेवतो आणि विस्तव फुंकणीने फुंकत राहतो म्हणजे विस्तव विझत नाही, उलट प्रज्वलित होतो. त्या गरमीमुळे मुशीतील सोने सुहागाबरोबर गरम होऊन तापून शुद्ध होते आणि जड असल्याने मुशीच्या तळाशी जमा होते व त्यावर इतर धातू जमा होतात. केरकचरा सगळ्यात वर जमा होतो. नंतर विस्तवामुळे इतर गोष्टी जळून जातात. आणि चोख सोने तेवढे मुशीत तळाशी जमा होते. त्यात पुन्हा दुसरे अशुद्ध सोने घालतात. ते पुन्हा शुद्ध करतात. अशा प्रकारे मूस शुद्ध सोन्याने भरते. केर-कचरा आणि इतर धातू एक तर जळून जातात किंवा वर उभार येऊन उतू जातात व खाली विस्तवावर पडून जळून जातात. सोन्याला इतर धातूंपासून वेगळे पाडणारा सुहागासुद्धा आपले काम करून भस्म होतो. मग त्या मुशीत उरते ते फक्त चोख शुद्ध सोने असते. त्यामुळे दारिद्र्य कायमचे नाश पावते. हा एक दृष्टांत आहे. हा दृष्टांत असे सांगतो की, मूस साधकाचे हृदय आहे. निष्काम भजन, ध्यान, सेवा आणि सदाचार वगैरे खरे सोने आहे. आणि काम, क्रोध, अज्ञान, संशय, विषयासक्ती, प्रमाद, अभिमान आणि आळस हे आठ प्रकारचे दोष दुसरे धातू आहेत. सांसारिक गोष्टींचा विचार हा केर-कचरा आहे. तत्त्वज्ञान अग्नी आहे. सत्संग अग्नीला चेतविणारी फुंकणी आहे. शास्त्रविचार सुहागा आहे आणि परमात्म्याच्या भावाचे अज्ञानच त्या मुशीची रिकामी जागा आहे. साधकाच्या हृदयरूपी मुशीत निष्काम भजन, सेवा, सदाचार वगैरे सोन्याबरोबर काम, क्रोध, वगैरे दोषरूपी अन्य धातू आणि सांसारिक विषयवासनारूपी केर-

कचराही असतो. पण सत्संगरूपी वाऱ्याच्या फुंकणीने वाढलेल्या तत्त्वज्ञानरूपी अग्नीच्या तापामुळे आणि शास्त्ररूपी 'सुहाग्यामुळे हृदयरूपी मुशीचा खालचा भाग निष्काम भजन, ध्यान, सेवा आणि सदाचाररूपी शुद्ध तप्त सोन्याने भरून जातो. काम-क्रोध वगैरे दोषरूपी धातू आणि सांसारिक वासनारूपी केर-कचरा जळून जातो. शास्त्रविचार-रूपी सुहागासुद्धा सोने स्वच्छ करून स्वत: लुप्त होतो. मग निष्काम भजन, ध्यान, सेवा आणि सदाचाररूपी शुद्ध सोनेच बाकी राहते. याप्रमाणे साधकाच्या हृदयाचे जेवढे स्थान निष्काम भजन वगैरेने भरून जाते, त्याचा कधीही नाश होत नाही. पण त्या हृदयरूपी मुशीचा जितका भाग परमात्माच्या भावाज्ञानरूपी शून्यतेमुळे रिकामा असेल आणि जोपर्यंत तो भरणार नाही, तोपर्यंत अज्ञानरूपी दारिद्र्याचा संपूर्णपणे नाश होणार नाही. जसे कलकत्त्याला जाणाऱ्या मुसाफिराकडे तिकिटापेक्षा कमी पैसे असतील, तर कलकत्त्याचे तिकीट मिळणार नाही. जेवढे पैसे असतील,. तिथपर्यन्तचेच तिकीट मिळेल. आपल्याला जिथे जावयाचे आहे, तिथपर्यन्तच्या तिकिटाचे पैसे हवेत. त्याप्रमाणे साधकाचे हृदय सुद्धा जोपर्यन्त भक्तीने पूर्ण भरत नाही. तोपर्यन्त भगवत्प्राप्ती होऊ शकत नाही. जेवढे हृदय रिकामे असेल तेवढे भगवंतापासून दूर राहते. हृदयरूपी मूस वरपर्यंत भरण्यासाठी पुन्हा पुन्हा सोने घालावयास हवे. ते तापवून शुद्ध करण्यासाठी तत्त्वज्ञानरूपी अग्नी आणि अग्नी प्रज्वलित ठेवण्यासाठी सत्संगरूपी वायूची फुंकणी आणि काम , क्रोधरूपी धातू आणि सांसारिक वासनारूपी केर-कचरा निराळा करण्यासाठी शास्त्र-विचाररूपी सुहागा घालत राहावयास हवा. हे काम नीट होत राहिले पाहिजे. या सगळ्यात निष्काम भजन, ध्यान, सेवा आणि सदाचाररूपी सोने आणि सत्संगरूपी वायूच्या फुंकणीला महत्त्वाचे समजावयास हवे. केवळ सोनेच नसले आणि इतर सगळे असले, तरी त्यामुळे दारिद्र्य दूर होऊ शकत नाही. जर सोनेच नसेल, तर नुसत्या वायूच्या फुंकणीरूपी सत्संगाने काय होणार ? औषध घेतल्याशिवाय वैद्याच्या नुसत्या सल्याने काय होणार ? म्हणून निष्काम भजन, ध्यान, सेवा आणि सदाचार वगैरेंची फार आवश्यकता आहे. पण सत्संगरूपी वायूची फुंकणी नसेल, तर तत्त्वज्ञानरूपी अग्नी विझण्याचे भय असते. म्हणून सत्संगसुद्धा महत्त्वाचा आहे. अर्थात हा अग्नी एकदा का

पेटला की, सहसा लौकर विझत नाही. कधी विझलाच तर दुसऱ्या वस्तूंना जाळून केवळ शुद्ध सोने राहिल्यावरच विझतो तसेच ही सत्संगरूपी वायूची फुंकणीसुद्धा सहजासहजी थांबत नाही. साधारण अग्नी तर केवळ सोन्याला तापवून शुद्ध करतो. पण हा तत्त्वज्ञानरूपी अग्नी सोन्याची उत्तरोत्तर वृद्धी करण्यात सहाय्यक होतो. अशाप्रकारे हृदयरूपी मूस तापलेल्या शुद्ध सोन्याने परिपूर्ण होऊन जाते. निष्काम भजन, ध्यान, सेवा आणि सदाचार वगैरेंनी हृदय भरून जाणेच भगवत्प्राप्ती आहे. जसे घास घेतल्याने पोट भरते, त्याप्रमाणे ह्या सोन्याच्या भरण्यातच भगवत्प्राप्ती आहे. मग रिकामी जागा शिल्लक राहात नाही. एक सच्चिदानन्दघन परमात्माच परिपूर्ण होतो. म्हणून वरील दृष्टांताप्रमाणे निरन्तर पूर्णपणे तत्पर राहून भगवत्प्राप्तीसाठी प्रयत्न करावयास हवा.

तुम्ही लिहिले आहे की, 'साधनाच्या उन्नतीमध्ये माझे बळ आणि प्रेम काहीच नव्हते. जे काही झाले, ते भगवंताच्या अद्भुत अनुग्रहामुळेच झाले. असेच मानणे चांगले. विशेषत: हीच गोष्ट खरी आहे. भगवत्प्राप्तीत पुरुषार्थ प्रधान आहे. पुरुषार्थ करण्यात भगवंताची कृपा महत्त्वाची आहे आणि भगवंताची कृपा जीवमात्रांवर निरंतर आहे. जो हे मानतो, त्यालाच लाभ होतो. जर एखाद्याकडे पारसमणी असेल, तर त्याचा उपयोग करून हव्या तेवढ्या लोखंडाचे तो सोने बनवू शकतो आणि दारिद्र्य दूर होऊ शकते. पण त्याने पारसाला पारसच मानले नाही, तर त्यात पारसाचा काय दोष. पारसाला पारस समजण्यातच लाभ आहे. हीच गत भगवंताच्या कृपेची आहे. म्हणून भगवंताची कृपा मानण्यातच मोठा लाभ आहे. सत्संगाने भगवंताचा प्रभाव समजू शकतो. भगवंताचा प्रभाव समजल्यावर भगवत्कृपेचा अनुभव होतो. भगवंताच्या कृपेमुळे भगवत्प्राप्तीसाठीचा पुरुषार्थ वाढतो आणि पुरुषार्थाने भगवंताची प्राप्ती होते.

तुम्ही लिहिले आहे की, 'नित्याभियुक्त झाल्याशिवाय योगक्षेम परमात्म्याने का करावा ?' ते ठीक आहे. नित्याभियुक्त तर व्हावयासच हवे पण योगक्षेमाची इच्छा ठेवू नये, हे उत्तम. अर्थात् योगक्षेम इच्छिणे काही वाईट गोष्ट नाही, पण निर्योगक्षेमी त्यापेक्षाही उत्तम. 'निर्योगक्षेमी होण्याने मला लवकर प्राप्ती होईल' अशा भावनेने निर्योगक्षेमी होणे उत्तम आहे. पण

सगळ्यात उत्तम म्हणजे फळाची इच्छाच राहू नये. मिळो की न मिळो, या भावनेने भगवंतावर अनन्य प्रेम करावयास हवे. असे केल्याने परमात्मा ऋणी होतो. जसे एखादा मजूर चार आणे मिळविण्यासाठी मालकाची सेवा करतो. त्यापेक्षा जो मजुरी मागत नाही, त्याला मालक जास्त पैसे देईल आणि होतेही तसेच. उदार मालक विचार करतो, हा आपल्या तोंडाने काहीच मागत नाही तर याला आपण अधिक पैसे द्यावयास हवेत. याचप्रमाणे योगक्षेमाची इच्छा ठेवण्यापेक्षा भगवंताची प्राप्ती लवकर व्हावी, म्हणून निर्योगक्षेमी होणे उत्तम. पण मजुराने जर अजिबात पैसे घेतले नाहीत, तर मालकाला फार संकोच होतो आणि तो त्याला पहिल्यापेक्षासुद्धा अधिक पैसे देऊ इच्छितो. पण तरीही जर त्याने पैसे घेतले नाहीत तर तो त्याचा ऋणी बनतो. त्याचप्रमाणे जेव्हा साधक भगवंताकडून कसलीच अपेक्षा ठेवत नाही, केवळ प्रेमासाठी प्रेम करतो व म्हणतो की, बस ! मला प्रेमातच सुख मिळते. मला केवळ प्रेम हवे. तर मग परमेश्वर त्याचा ऋणी बनतो. त्यानंतरही जर भगवंत त्याच्याकडे आला नाही तर भगवंताची मर्जी. तो केवळ प्रेमातच मदमस्त आहे. तुम्ही 'भगवंताच्या अनुग्रहात विषमता होणे असंभव', म्हटले आहे, ते ठीक आहे. वास्तविक भगवंताच्या कृपेत कोणतीही विषमता नाही.

तुम्ही लिहिले आहे की, 'भगवंताच्या पावलोपावली प्रगट होणाऱ्या अपार कृपेचा अनुभव का होत नाही ?' याला पूर्वसंचित पाप आडवे येते. त्याचा पुरुषार्थाने नाश होतो. पापरूपी अंधकाराचा नाश होताच, आमची दृष्टी झाकणारे ढग दूर झाल्यावर सूर्य प्रगट होतो, त्याप्रमाणे भगवत्कृपारूपी सूर्य प्रगट होतो. भगवत्कृपेचा सूर्य आहेच; पण पापरूपी अंधकाराने आमची अंत:करणरूपी दृष्टी झाकलेली आहे. म्हणून तो कृपासूर्य आम्हांला दिसत नाही. म्हणून सतत भगवंताची पूर्ण कृपा मानावयास हवी. असे मानत राहण्याने कधी काळी साधनात तीव्रता आल्यास भगवंताची कृपा प्रगट होईल.

तुम्ही लिहिले आहे की, 'प्रेम नाहीये, पण प्रेम-दान जबरदस्तीने करण्यास काय हरकत आहे ?' परमात्मा प्रेम-दान देण्यासाठी सदा तत्पर आहे. पण प्रेम प्राप्त करणाऱ्याची उत्कटता असावयास हवी. जेव्हा भगवंतासाठी लाज,

भय, नीती, योग्यता, अयोग्यता, संकोच, धन, मान, अपमान, परिवार आणि पुत्र वगैरे सर्वांना विसरून परमेश्वरप्राप्तीसाठी जीव तळमळतो, तेव्हा परमेश्वर भेटण्यास विलंब लागत नाही. वरील गोष्टींचा त्याग समजून-उमजून करू नये. समजून त्याग केला तर उलट दोष लागतो. असे करणे म्हणजे प्रमाद व दम्भ आहे. परंतु प्रेमविव्हळ अवस्थेत कुठलेही भान उरत नाही, तेव्हा आपसुकच त्याग होतो. तेव्हाच तो प्रेमत्याग म्हणतात. ज्याप्रमाणे विदुराची पत्नी प्रेमविव्हळतेमुळे सारा-सार विसरली होती. जशा प्रेम आणि भक्तिविव्हळ गोपी भगवंताच्या प्रेमात रममाण होऊन घर, दार, पती, पुत्र, लोक-लाज, मान-अपमान, धर्म आणि भय या सर्वांचा त्याग करून कृष्णमय झाल्या होत्या. गोपींनी काही जाणून बुजून असे केले नव्हते. भगवंतावरील उत्कट प्रेमामुळेच असे घडले. म्हणून भगवंतांनी म्हटले आहे की, माझा प्रभाव केवळ गोपींनाच माहीत आहे. या भावात जितकी कमतरता असते, तितकाच प्रेम प्राप्त करण्यात विलंब होतो, हे समजावयास हवे. ज्याला प्रेमाची इच्छा असते, त्यालाच ते मिळते.. इच्छा नसेल तर प्रेमदान करण्याचा भगवंताचा नियम नाही. जर तसे असते, तर आजपर्यंत सगळे जीव मुक्त झाले असते. भगवंताचे अवतारीसुद्धा असे करत नाहीत. जर तसे करते, तर त्यांच्यासमोरच त्यांच्या वेळच्या सगळ्यांना भगवंताची प्राप्ती झाली असती. कारण ते असे सांगू शकत नव्हते की, माझ्यात जबरदस्तीने प्रेमदान करण्याचे सामर्थ्य नाही. पण असा गळेपडूपणा करून मुक्ती देण्याचा त्यांचा कायदा नाही. भक्तांमध्ये ही विशेषता असते आणि भक्त आपल्या सामर्थ्याप्रमाणे प्रयत्न करतात. हा नियम त्यांनाच लागू होतो की ज्यांनी जीवांच्या उद्धारासाठी भगवंताची परवानगी मिळवली आहे किंवा ज्यांच्या केवळ दर्शन, स्पर्श, चिंतन आणि भाषणानेच जीवांचे कल्याण होते. उदाहरणार्थ, भक्त प्रल्हाद आणि बंगालचे चैतन्य महाप्रभू वगैरे. म्हणून भगवंतापेक्षाही भक्तांची विशेषता आहे.

तुलसीदासांनी रामायणात म्हटले आहे -

***मोरें मन प्रभु अस बिस्वासा। राम ते अधिक राम कर दासा॥***
***राम सिंधु घन सज्जन धीरा। चंदन तरु हरि संत समीरा॥***

कारक पुरुषांसाठी हा नियम लागू होतो. कारक पुरुष म्हणजे जे क्रममुक्तिद्वारा भगवंताच्या परमधामात पोचल्यानंतर भगवंताच्या आज्ञेने केवळ जीवांच्या उद्धारासाठीच परमधामातून जगात येतात. उदाहरणार्थ, व्यास, वसिष्ठ वगैरे. म्हणून भगवंताचा जबरदस्तीने प्रेमदान करण्याचा नियम नाही.

[ ३३ ]

भजन, ध्यान कमी होण्यात तुम्ही जे म्हटले आहे ते ठीक आहे. परंतु दृढ पुरुषार्थाच्या अभ्यासाने संचित कर्म आणि आळसाचा नाश होतो. म्हणून सामर्थ्याप्रमाणे पुरुषार्थ करण्याचा विशेष प्रयत्न करावयास हवा. तुम्ही लिहिले आहे की, भजन, ध्यान आणि सत्संगाचा प्रयत्न जितका व्हावयास हवा तितका होत नाही, ते ठीक आहे. तो होण्यात पुरुषार्थच प्रधान आहे. प्रबळ पुरुषार्थ करता-करता जस-जसा संचित पापाचा नाश होतो, तस-तसे अंत:करणही शुद्ध होत जाते. अंत:करण शुद्ध होण्याने दृढ वैराग्य येऊन लगेच भगवंताची प्राप्ती होते.

भगवंताचा प्रभाव, स्वभाव, गुण आणि लक्षणांविषयी मी काय लिहू ? याविषयी लिहिण्याचे कुणाचेही सामर्थ्य नाही. तरीही माझ्या आकलनाप्रमाणे थोडक्यात लिहितो.

*अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन्।*
*प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया॥* (गीता ४/६)

*परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्।*
*धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे॥* (गीता ४/८)

*सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।*
*अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः॥* (गीता १८/६६)

वगैरे श्लोकांमध्ये त्यांच्या प्रभावाविषयी लिहिले आहे.

*ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्।*
*मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः॥* (गीता ४/११)

*सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति॥* (गीता ५/२९)

*तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम्।*
*ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते॥* (गीता १०/१०)

*तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः।*
*नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता॥* (गीता १०/११)

वगैरे श्लोकांमध्ये त्यांच्या स्वभावाविषयी लिहिले आहे आणि गुणांचा तर ते सागर आहेत.

*धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः।*
*धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम्॥* (मनु. ६/९२)

*तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता॥* (गीता १६/३)

*सत्यं दमस्तपः शौचं संतोषो ह्रीःक्षमार्जवम्।*
*ज्ञानं शमो दया ध्यानमेष धर्मः सनातनः॥*

वगैरे श्लोकांचा भाव सनातन धर्माचे स्वरूप आहे आणि तेच सद्‌गुण मानले गेले आहेत. भगवंतात हे गुण स्वाभाविक असतात. अशा तऱ्हेचे दुसरेही अपार गुण आहेत आणि ते सगळे भगवंताच्या ठायी परिपूर्ण आहेत.

*कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मरेद्यः।*
*सर्वस्य धातारमचिन्त्यरूपमादित्यवर्णं तमसः परस्तात्॥* (गीता ८/९)

*ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते।*
*सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम्॥* (गीता १२/३)

*बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च।*
*सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत्॥* (गीता १३/१५)

*वंशीविभूषितकरान्नवनीरदाभात्पीताम्बरादरुणबिम्बफलाधरोष्ठात्।*
*पूर्णेन्दुसुन्दरमुखादरविन्दनेत्रात् कृष्णात्परं किमपि तत्त्वमहं न जाने॥*

*शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं*
*विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभाङ्गम्।*

*लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं*
*वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ॥*

वगैरे श्लोकांमध्ये भगवंताच्या साकार आणि निराकार स्वरूपाचे लक्षण सांगितले आहे.

अशाप्रकारे जितका आकलन होईल तितका प्रभाव म्हणजे त्याचे सामर्थ्य, स्वभाव अर्थात् त्यांचा आशय, सद्‌गुण आणि त्याच्या स्वरूपाचे स्मरण करून नामजप केला गेला, तर खूप लाभ होऊ शकतो. तुम्ही लिहिले आहे की, त्याचे सामर्थ्य, प्रभाव समजल्याशिवाय नामजपाच्या वेळी त्याचे स्वरूप कसे आठवता येईल, म्हणून याविषयी थोडे लिहिले आहे.

## [ ३४ ]

'संसारात वैराग्य आणि भगवंतावर लगेच प्रेम होण्यासाठी उपाय विचारला आहे'. तर भगवंताचा गुणानुवाद, प्रभावरहस्य आणि प्रेमाच्या गोष्टी वाचण्याने व ऐकण्याने तसेच नामजप आणि स्वरूपाचे ध्यान करण्याने लवकरच भगवंतावर प्रेम आणि संसाराविषयी वैराग्य होऊ शकते.

X X X X च्या ध्यानाविषयी विचारले आहे. तर माझ्या अनुमानाप्रमाणे कार्यकाळात गीता अ. १४/१९ च्या अनुसार द्रष्टा साक्षीचे ध्यान असते आणि एकांतात संसाराचा अभाव आणि सच्चिदानन्दाचा भाव आणि अचिन्त्याच्या ध्यानाचा विशेष प्रयत्न होतो. कधी काळी चिंतन झाले तर केवळ आनंदघनाचेच होते. आनंदघन सोडून दुसरे स्फुरण कमी होते. व्युत्थान अवस्थेत संसाराचे स्फुरण आणि संकल्प होतो. तो संसाराचा अभाव असूनच होतो. अशाप्रकारची अवस्था त्यांच्या गोष्टीवरून वाटते.

मानसिक जपाविषयीचा समाचार कळला. ज्या जपात मन विशेष राहते, त्यालाच मानसिक जप म्हणतात. श्वासाद्वारा होणाऱ्या जपापेक्षा नाडीद्वारा जपात, नाडीद्वारा होणाऱ्या जपापेक्षा केवळ मनाने नामाक्षराचे चिंतन होण्यात आणि त्याहीपेक्षा केवळ परमात्मस्वरूपाचे ज्ञान राहण्याने मन अधिक लागले

आहे, असे मानले जाते. जस-जसे मन अधिक लागते तसे साधन तीव्र समजले जाते. अर्थात् श्वास आणि नाडीद्वारा होणारा जपसुद्धा कमी महत्त्वाचा समजू नये. अशाप्रकारे नामजपाची संख्या जास्त झाल्याने परिणाम उत्तम येतो. वरीलपैकी जे तुम्हाला सरळ वाटेल ते करू शकता. कुठल्याही प्रकाराने का होईना मुख्यत्वे सतत जप झाला पाहिजे. जे साधन दीर्घकाळ व आदराने होते, तेच महत्त्वाचे समजले जाते.

तुम्ही विचारले आहे की, 'परवैराग्य' कसे होईल ? तर वरीलप्रमाणे भगवंताचा नाम-जप, त्याचे स्वरूप-चिंतन, सत्संग आणि तीव्र अभ्यासाने होऊ शकते. 'परवैराग्य' चे स्वरूप परमपुरुष परमात्म्याचे ज्ञान आणि त्याचे फळ परम पुरुष परमात्म्याची प्राप्ती आहे. तुम्ही तुमच्या पुरुषार्थाची कमतरता सांगितली ती राहू नये. कारण यात पुरुषार्थच प्रधान आहे आणि पुरुषार्थहीनासाठी परमात्मासुद्धा काही करत नाही. जर केले असते, तर आजपर्यंत झालेच असते.

तुम्ही लिहिले आहे की, 'माझा सगळा वेळ सतत साधनातच कसा व्यतीत होईल ?' ते ठीक आहे. संसाराविषयी वैराग्य आणि भगवंताविषयी प्रेम राहण्याने असे होऊ शकते. जोपर्यंत असे होत नाही तोपर्यंत ध्यान अमृतरूप भासत नाही. ध्यान अमृतरूप प्रतीत झाल्यानंतर ध्यानाची तार तुटू शकत नाही. सदा सर्वदा भगवत्स्वरूपाचा असा ध्यास राहिल्यावर परमेश्वराच्या स्वरूपात निरंतर स्थिती राहू शकते. जसजसा आणि जितका भगवंताच्या अस्तित्वाचा विश्वास होऊ लागेल, तितकी भगवत्प्राप्ती समजावयास हवी. वैराग्य वाढल्यावर मग सतत एकरस स्थिती राहू शकते. यासारखा दुसरा उपाय दिसत नाही. म्हणून भजन आणि सत्संगाचा सतत प्रयत्न करावयास हवा.

तुम्ही लिहिले आहे की, 'स्वामी श्री स्वयंज्योतिजी महाराजांचे दर्शन घेतल्याने वैराग्य उत्पन्न झाल्यासारखे वाटते. परंतु सदा सर्वकाळ एकच स्थिती राहात नाही.' ते ठीक आहे. अंत:करण एकदम शुद्ध झाल्याने, केवळ सत्त्वप्रधान अंत:करण झाल्याने एकरस अवस्था राहू शकते.

'अंत:करणात वैराग्य उत्पन्न होण्यासाठी काही विशेष उपाय विचारला

आहे'. तर नामजपाचा तीव्र अभ्यास करावयास हवा आणि भक्ती व वैराग्यशास्त्राचा अभ्यास तसेच सत्पुरुषांचा संग करावयास हवा.

मागे एकदा तुम्ही विचारले होते की, आसक्तीशिवाय जेव्हा सांसारिक गोष्टी ऐकतो, तेव्हा मध्ये-मध्ये बोलावे लागते. मग मनात निरर्थक गोष्टींचे विचार येतात, त्यावर काही उपाय करावयास हवा. त्याचे उत्तर असे आहे की, ज्याला व्यर्थ गोष्टींविषयी वैराग्य येते, तो त्या गोष्टी ऐकतच नाही. जर ऐकल्याच तर त्या मनांत राहात नाहीत. म्हणून त्यावर उपाय करण्याची आवश्यकता नाही.

सच्चिदानंद भगवानच सर्वत्र परिपूर्ण आहे. त्या आनंदघनाच्या अस्तित्वाचे ज्ञानसुद्धा त्या आनंदमय भगवंतालाच आहे. भगवान नेहमी आपल्या स्वरूपातच स्थित आहे. जर ह्याची प्रतीती आली, तर मग 'मी' चा अभाव होतो. मग 'मी' शोधूनसुद्धा सापडत नाही. पण नेहमी एकसारखा भाव राहात नाही. यासाठी तुम्ही उपाय विचारला आहे. तर 'मी' चा नाश हाच उपाय आहे. वरील आनंदघनाच्या स्थितीच्या वेळी 'मी' क्षीण आणि हलका होतो. 'मी' सर्वव्यापी साक्षी चेतनेत लपलेला आहे. जर शोधूनही 'मी' सापडला नाही, तर शोधणाऱ्यात सुद्धा 'मी' व्यापक समजला जातो. 'मी' चा सर्वस्वी अभाव झाल्यानंतर त्याला शोधण्याचा विचारसुद्धा येत नाही. मग 'मी' ला कशासाठी कोण शोधेल ? या पत्रातील काही तुम्हांला समजले नाही, तर भेटल्यावर विचारावयास हवे.

तुम्ही लिहिले आहे की, 'ऋषिकेशच्या साधनाविषयी विचारले, तर ते सामान्य साधन आहे. ते तुमच्या समोरच आहे. जर काही लिहिण्यासारखे साधन असते तर लिहिले असते.' तर तुमचे लिहिणे बरोबर आहे. पण तुम्ही लिहिले आहे की, 'जे काही साधन आहे ते आपल्या समोरच आहे.' असे कसे लिहिले ? मी अंतर्यामी थोडाच आहे.

तीव्र ध्यान झाल्यामुळे X X X X चा जन्म सफल झाला. ते ठीक आहे. 'सफळ' शब्दाने भगवत्प्राप्तीची कामना वाटते. पण भगवत्प्राप्तिरूप फळाची इच्छा दोषयुक्त नाही. म्हणून 'सफळ' शब्द मीसुद्धा लिहितो.

तुम्ही विचारले आहे की 'X X X X च्या खोलीत आणि नदी किनाऱ्यावर

जसे ध्यान होत होते त्यामुळे श्री X X X X ध्यान तीव्र लिहिले. तर त्यांच्या ध्यानामध्ये निरंतरताच विशेष आहे की दुसरे काही विलक्षण आहे ?' ते पत्राद्वारा लिहिण्यासारखे आहे आणि विशेषत: भेटल्यावर सांगणे ठीक आहे.

जे सच्चिदानन्दघनाचे ध्यान आहे, तेच सच्चिदानंद भगवंताचे स्वरूप आहे. ज्याचे ध्यान केले जाते तो अमृतरूप आहे. त्यावेळी ध्यान साक्षात अमृतमय होते आणि केवळ अर्थमात्रच राहतो. आणि ध्याता, ध्यान ध्येयरूप त्रिपुटी आहे, असे म्हणू शकत नाही. अमृताचे ज्ञान, अमृतस्वरूप परमात्म्यालाच आहे. मग अमृतमयाची इच्छा कोणाला होईल ?

साधनाच्या प्रयत्नाविषयी तुम्ही लिहिले आहे की, 'माझ्या पुरुषार्थामुळे काही होऊ शकत नाही. तो परमात्माच सामर्थ्यशाली आहे. .आतासुद्धा जे साधन होऊ शकते त्यात माझा कोणता पुरुषार्थ आहे ?' ते ठीक आहे. असेच समजावयास हवे. पर पुरुषार्थ, प्रयत्न करून साधन करत राहावयास हवे आणि त्यातही ईश्वराची प्रेरणा मानावयास हवी. म्हणजे कधी अहंकार होत नाही. जर ईश्वर पुंरुषार्थ केल्याशिवायच दया करून स्वकृपेने उद्धार करतो तर ईश्वराची दया तर सदासर्वदा आहेच. पण प्रयत्न आणि पुरुषार्थ केल्याशिवाय कोणालाही भगवंताची प्राप्ती होत नाही. भगवत्प्राप्ती स्वत:च्या पुरुषार्थामुळेच होते आणि तो पुरुषार्थ भगवंताच्या प्रेरणेमुळेच होतो. भगवंताची कृपा सर्वांवर आहे. पण कृपा मानण्यामुळेच कृपेचे फळ मिळते. श्वासाद्वारा भजन होते. त्यात मन असते. पण मानसिक म्हणजे जे केवळ मनाने चिंतन केले जाते, त्याच जपाला मानसिक जप म्हणतात. श्वासाद्वारा होणारा जपसुद्धा फार उत्तम आहे. त्यामुळे सुद्धा वासनांचा नाश होतो. म्हणून शेवटी परिणामी हासुद्धा उत्तम आहे.

[ ३५ ]

सतत शरीर, प्राण, मन, बुद्धी आणि इंद्रियातून 'मी' काढून घेण्याचा प्रयत्न करावयास हवा. नीट लक्षात ठेवावे की, शरीर म्हणजे 'मी' नाही. मी त्यापासून वेगळा आहे. मी त्याचा द्रष्टा आहे.

श्री सच्चिदानन्दघन परमात्माच तुझे स्वरूप आहे. त्यातच 'मी' पहावयास हवा. व्यवहारात आणि बोलताना सुद्धा शरीरात 'मी' चा भाव होऊ देऊ नये. त्यासाठी एक युक्ती आहे. द्रष्टा बनून शरीराला पाहिल्यामुळे शरीरामधून 'मी' चा भाव दूर होतो. बोलताना मधून मधून थांबले, तर याचे स्मरण राहते.

स्त्री, पुत्र, धन आणि संपूर्ण विषयभोगांमध्ये सुख नाही. जर खरेच त्यात सुख असते तर मग ते सर्व असतानाही दु:ख का होते ? दु:ख व्हावयास नको. पण ते असतानाही दु:ख होते. त्यावरून सिद्ध होते की, त्यात सुख नाही. सुख तर विचार, शान्ती आणि संतोषातच आहे.

[ ३६ ]

तुम्ही विचारले आहे की, 'लोकांचा उद्धार लवकर व्हावा आणि सर्वांचे भगवंताठायी प्रेम जडावे यासाठी आम्हांला तत्परतेने काय प्रयत्न करावयास हवे ?' मी याचा काय उपाय सांगू ? याचा उपाय जे प्रल्हादासारखे भगवंताचे परमभक्त आहेत त्यांनाच माहीत. ज्याच्या ध्यानाने, स्पर्शाने आणि ज्याच्या चर्चेने जीव भगवंताचा परमभक्त होऊन त्याचा उद्धार होतो तोच निष्कामी, ज्ञानी आणि भक्तशिरोमणी आहे. पण तुम्ही विचारताच आहा, म्हणून माझ्या बुद्धीनुसार उत्तर लिहिणे योग्य समजून लिहीत आहे.

तुम्ही तुमचा जो उद्देश सांगितला, माझ्या मते तो उद्देशच उपाय आहे. भक्तांचा हाच उद्देश असावयास हवा. या असार संसारात भगवंताचा नाम-जपच प्रेम, आणि भक्ती वाढविण्याचा श्रेष्ठ उपाय आहे. मनुष्यजन्माला येऊन जो भगवद्भक्तीचा प्रयत्न करीत नाही, त्याचा धिक्कार असो. लोकांना भजन, ध्यान, कीर्तनात लावणेच परम कर्तव्य आहे. हाच जीवनाचा उद्देश समजावयास हवा. जो या कामासाठीच आपले जीवन आहे, असे समजतो तो धन्यवादाला पात्र आहे. जो आपले तन, मन, धन सर्वस्व सांसारिक माणसांना भगवंताची भक्ती करावयास लावण्यात अर्पित समजतो, त्याला अर्पण करावे लागत नाही. त्याच्यासाठी सर्वस्व भगवंताचे आहे आणि तो त्याच कामास

लागलेला आहे. लोकांना भगवद्‌भक्तीला लावण्यासाठी तो आपल्या शरीराची साले सोलण्यासाठीही संकोच करीत नाही. त्याचे जीवन लोकांचा उद्धार करण्यासाठीच असते. तो भक्तीच्या प्रचारासाठी प्रसन्नतेने आपल्या प्राणांची आहुतीसुद्धा देतो.

## [ ३७ ]

तुमची पत्नी आणि घरातील लोक तुमच्यावर विशेष प्रसन्न नाहीत, म्हणून तुम्हांला त्यांच्याशी प्रेमाने वागावयास हवे. माझा स्वभाव सर्वांशी प्रेमाने वागण्याचा आहे. घरातल्यांना ज्यामुळे आराम मिळेल, सुख मिळेल, त्यांचे मन आनंदात राहील असे न्यायुक्त वागणे मी उत्तम समजतो. शरीराला घर आणि जगातील सगळ्या माणसांच्या सेवेत लावावयास हवे.

सत्संगाचा विशेष प्रयत्न करावयास हवा. सत्संगाच्या प्रतापामुळे नीचसुद्धा सुधारतो. भगवद्‌भक्ती एक अशी उत्तम गोष्ट आहे की, त्याच्यासारखी दुसरी कुठलीच गोष्ट नाही.

जे भगवंताचा गुणानुवाद करत राहतात ते धन्य होत. भगवंताच्या कृपेमुळेच भगवत्-चर्चा होते.

## [ ३८ ]

तुम्ही लिहिले आहे की, 'जो आधीपासूनच मोहपाशात अडकलेला आहे, तो स्वत:हून कसा निघेल ? त्यासाठी कसेही करून तुम्हांलाच त्याला काढावयास हवे.' तर काढणारा श्रीपरमात्मा देव आहे. खालील श्लोकाप्रमाणे त्या परमेश्वराला शरण जावयास हवे. त्याच्याहून दुसरा उपाय नाही.

*तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।*
*तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्॥* (गीता १८/६२)

'हे भारता ! सर्वार्थाने त्या परमेश्वराला अनन्य भावाने शरण जा, परमेश्वराच्या कृपेमुळेच परम शांती आणि सनातन परमधाम मिळेल.'

या शरणागतीसाठी सत्संग करावयास हवा. सत्संगाचा महिमा समजल्यावर एक क्षणसुद्धा सत्संगाशिवाय वाया घालवल्यास मोठे नुकसान वाटते. सत्संगाशिवाय दुसरे काही दिसत नाही. सांसारिक विषयभोग चांगले वाटत नाहीत. सत्संगात फार आनंद होतो. अश्रुपात होतो आणि वारंवार रोमांच उभे राहतात. जोपर्यंत अशी अवस्था होत नाही, तोपर्यंत खरा सत्संग झाला नाही आणि त्याचे मर्म सुद्धा समजले नाही.

[ ३९ ]

तुमच्या घरातील लोक तुमच्यावर प्रेम करतील असा प्रयत्न करणेच योग्य असे मी मानतो. आसक्तीशिवायसुद्धा दुकानाचे काम उत्तम तऱ्हेने होण्याचा उपाय मागे लिहिलाच आहे. तसा प्रयत्न करावयास हवा. तुम्ही विचारले आहे की, 'भगवंताच्या भजनात प्रेम कसे वाटेल' तर भगवंताच्या भजनाचा प्रभाव समजल्यावर आणि त्याच्यावर श्रद्धा बसल्याने प्रेम वाटेल. ज्यांची भगवंतावर श्रद्धा असते, त्यांचा संग केल्याने श्रद्धा वाढते. भजन करणाऱ्यांचा संग केल्याने भजन-ध्यान अधिक होते. आणि प्रेमळ भक्तांचा संग केल्याने आणि त्यांनी लिहिलेल्या गोष्टी वाचण्याने भगवंतावर आणि त्यांच्या भजनात प्रेम बसू शकते. एखाद्या वस्तूची आवश्यकता असल्यास ती वस्तू ज्याच्याजवळ असेल त्याचा व त्या वस्तूचा संग करण्याने त्या वस्तूवर प्रेम होऊ शकते. ती वस्तू मिळू शकते.

जर माणूस प्रेम आणि उत्कट इच्छेने सत्संग करील तर त्याप्रमाणे त्यांचा भाव अवश्य होतो आणि भजन करता-करता सुद्धा सांसारिक कामे जितकी करता येतील, तितकी करण्याचा प्रयत्न अवश्य करावयास हवा.

[ ४० ]

तुम्ही लिहिले आहे की, 'श्री परमात्मा आणि श्री गुरुदेवांची जे वाहवा करतात ते धन्यवादास पात्र आहेत. तसेच श्री परमात्मा आणि श्री गुरुदेवांच्या वचनावर श्रद्धा असल्यावर कितीही पापी का असेना, त्याचे कल्याण होते.' तर आपले म्हणणे ठीक आहे. श्रद्धा बसल्यावर कुठलीच गोष्ट कठीण नाही. श्री परमात्म्यावर आणि गुरुदेवांवर श्रद्धा बसल्यानंतर तो दुसऱ्या इतर माणसांचेही कल्याण करण्यास योग्य बनतो.

तुम्ही लिहिले आहे की, 'परमात्म्यावर श्रद्धा बसून कल्याण होईल असा उपाय व्हावयास हवा.' ते ठीक आहे. उपाय होणे फार मोठी गोष्ट नाही. उपाय करावयाचा असेल तर करावयास हवा. भगवंताकडून कसलाच विलंब नाही. ज्या माणसाला श्री परमात्म्याला भेटण्याचा उपाय करावयाचा असेल, कशाही प्रकारे का होईना तो करीलच. मग तो भगवंतासमान दुसरे काहीही समजणांर नाही. असे झाले म्हणजे त्याच्यासाठी उपाय कठीण नाही.

तुम्ही लिहिले आहे की, 'परमात्मदेवावर माझी श्रद्धा बसावयास हवी'. ते ठीक आहे. श्रद्धाच बसावयास हवी असेल तर सर्वस्व भगवंताला अर्पण केल्याने होऊ शकते आणि इच्छा नसेल तर असे लिहू शकत नाही.

तुम्ही एका ठिकाणी लिहिले आहे की, 'मी तर श्री गुरुदेवांच्या सभेत लहानात लहान साधन करणारा आहे'. मग दुसऱ्या एका ठिकाणी लिहिले आहे की, 'माझे साधन काहीच नाही' तर अशा दोन विधानांचा काय अर्थ आहे ? तसेच श्री गुरूदेवांची सभा कुठली आहे की ज्यात तुम्ही लहानात लहान साधनवाले आहात. साधन लहान असते तेसुद्धा उत्तम असते. लहान साधनामुळेच मोठे साधन होऊ शकते.

तुम्ही लिहिले आहे की, 'माझ्या भजन साधनाच्या भरंवशावर उद्धार होणे कठीण आहे. जर कोणी नीचातला नीचही महान पुरुषाकडे गेला तर ते त्याचा स्वीकार करतात. त्याप्रमाणे माझा उद्धार होऊ शकतो' हे ठीक आहे. महात्मे दयाळू असतात. त्यांच्या दर्शनमात्रानेसुद्धा उद्धार आणि कल्याण

व्हावयास हवे. मग सहवासात आल्यावर तर काय विचारावे ? खरे महात्मे भेटणे अत्यंत कठीण. भेटले तर अत्यानंदाची गोष्ट आहे. महात्म्याला शरण गेल्याने भजन-ध्यान होण्यात काहीच कठीण वाटत नाही आणि स्वभावसुद्धा आपसुक चांगला होतो.

[ ४१ ]

तुमचे ध्यान कसे होते ? सतत सच्चिदानन्दघनात ध्यान राहावयास हवे. 'मी' पणाचा अभाव झाला पाहिजे. आणि आपल्या शरीराला व संसाराला आनंदात कल्पून त्याला मिथ्या समजून त्याचा संकल्पच सोडावयास हवा. शरीराची शुद्ध-बुद्ध राहता कामा नये.

*जब मैं था तब हरि नहीं, अब हरि है मैं नाहिं।*
*कबिरा नगरी एकमें, राजा दो न समाहिं॥*

'जे काही आहे, ते एक सच्चिदानन्दघनच आहे'. असे ध्यान सोडून जो मनुष्य मिथ्या सांसारिक वस्तूंच्या चिंतनात आपले मन लावतो तो महामूर्ख आहे. मिथ्या नाशवंत वस्तूंचे स्मरण कशासाठी करावयाचे ?

जो पूर्णानंद हृदयात मावत नाही, त्याचे सतत ध्यान केल्याने ध्याता स्वत:सुद्धा आनंदस्वरूप होतो. 'मी' पणाचा संपूर्णपणे नाश झाल्यावर एक सच्चिदानन्दघनच बाकी राहतो.

*मैं जाना मैं और था, मैं तो भया अब सोय।*
*'मैं' 'तैं' दोनों मिट गई, रही कहनकी दोय॥*

[ ४२ ]

तुम्हांला कसला आजार आहे ते लिहावयास हवे. तुम्ही लिहिले आहे की, 'श्रीपरमात्मादेव पंधरा-वीस दिवसात बरे करतील'. तर भगवंताठायी

या तुच्छ देहासाठी प्रार्थना करता कामा नये. कारण तसे केल्याने भक्ती सकाम होते. भगवंताजवळ जर मागावयाचेच असेल तर त्याचे दर्शन मागावयास हवे किंवा अशी वस्तू मागावयास हवी की जी मिळाल्यावर मग काही मागावयास लागता कामा नये. शरीर, स्त्री, पुत्र, धन यासाठी त्याच्याजवळ मागू नये. तुच्छ मिथ्या शरीर आणि भोग इथेच राहणार आहेत. महात्मा लोक म्हणतात 'भले मेलो तरी चालेल, पण भगवंताजवळ स्वत:साठी काही मागू नये.'

***मर जाऊँ माँगू नही, अपने तनके काज।***
***परमारथके कारणे, मोहिं न आवैं लाज॥***

परमार्थ अर्थात परमेश्वरासाठी मागण्यात काही हरकत नाही. आपल्या शरीरासाठी भगवंताकडे काही मागणे फार लहान गोष्ट आहे.

नामजप झाल्याने ध्यान आपोआप होते. राम-नामाची पुंजी हेच खरे धन आहे. त्याला व्यर्थ कामात लावू नये. असे म्हटलेच आहे की -

***कबिरा सब जग निरधना, धनवंता नहिं कोय।***
***धनवंता सो जानिये, (जाके) रामनाम धन होय॥***

रामनाम अनमोल रत्न आहे. त्याला शरीराला आराम देणाऱ्या सांसारिक भोगरूपी दगडाने फोडू नये. भगवंताजवळ नाशवंत वस्तू मागू नयेत.

[ ४३ ]

सतत नामजपासोबत 'मी' नाही, 'मी' नाही चा अभ्यास करावयास हवा. शरीरापासून 'मी' चा भाव निघावयास हवा. नाहीतर पुढे कठीण आहे.

***'मैं', 'मैं' बडी बलाय है, सको तो निकसो भाग।***
***कब लग राखो रामजी, रुई लपेटी आग॥***

शरीर मिथ्या आणि नाशवंत आहे. ही कापसात गुंडाळलेली आग

कुठपर्यंत राहील ? म्हणून लवकर लवकर शरीरापासून बाहेर निघावयास हवे. मिथ्या शरीरात जो 'मी' चा भाव आरोपित झाला आहे, तो काढून टाकण्यात वेळ लावू नये. जगात बरीच माणसे 'मी', 'माझे' च्या दोरीने बांधलेली आहेत. पण ज्याला भगवंताचा आधार आहे, त्याला कसलेही बंधन नाही.

*मोर तोर की जेवरी, गल बाँधी संसार।*
*दास कबीरा क्यों बँधै, (जाके) राम नाम आधार ॥*

बंधन असेल तर ते सुद्धा सुटून जाते. म्हणून त्या परमेश्वराचा आश्रय अशाप्रकारे घेतला पाहिजे की, 'जे काही असेल ते एकमात्र भगवंतच आहे' त्याला प्राणाहूनसुद्धा विशेष समजावयास हवे.

त्याचा गुणानुवाद व प्रभाव ऐकल्याने प्रेम वाढते. प्रभाव सत्संगामुळे समजतो. म्हणून सत्संग करावयास हवा. शास्त्रांचा अभ्यास करावयास हवा. हरिकथेमुळे हरीवरील श्रद्धा वाढते व भेटण्याची इच्छा वाढते. इच्छा वाढल्यामुळे भजन जास्त होते. भजनामुळे निष्काम प्रेम जडून भगवंताचे दर्शन घडते. महात्मे आणि भक्त असे म्हणतात.

तुम्ही लिहिले आहे की, 'संसाराच्या आसक्तीमुळे तुमचा विरह झाला आहे'. तर आसक्ती वाईटच आहे. पण विरहाचे कारण भेटण्याची तीव्रता कमी हेही आहे.

बंधो ! नामजप, सत्संग, भगवंताचे ध्यान आणि भावसहित स्मरण निष्काम भावनेने करण्याने प्रेम वाढावयास हवे. मग भेट भले कमी झाली तरी चालेल. प्रेमपात्रावर प्रेम हवे. प्रेमच मुख्य आहे. प्रेम नसेल तर भेटण्याला विशेष अर्थ नाही.

## [ ४४ ]

संसारात राहून शुद्ध हृदयाने काम केले तर काम उत्तम तऱ्हेने होऊ शकते. चतुर माणसांबरोबर चातुर्याने गोष्टी करण्यास हरकत नाही. हरकत आहे छल-कपट करण्यात. पण हृदय शुद्ध झाल्याशिवाय व्यवहार शुद्ध होणे

कठीण. भजन-ध्यान करत सांसारिक कामे करण्याने पापांचा नाश झाल्यावर जेव्हा हृदय शुद्ध होईल तेव्हा मग कुठलीही अडचण नाही. जेव्हा धनलोभच सुटेल तेव्हा कपटाची आवश्यकताच उरणार नाही.

स्वार्थत्याग केल्यावर व्यवहार शुद्ध होऊ शकतो, पण व्यापार फार करणे ठीक नाही. साधन तीव्र झाल्यावर मग अधिक काम करण्यास हरकत नाही. पण पहिल्यांदा शक्ती नसताना अधिक काम करू नये. भजन, ध्यान करत जितके काम होईल, तितकेच काम करणे उचित आहे.

तुम्ही लिहिले आहे की, 'श्रीमद्‌भगवद्‌गीतेत भगवंताने अर्जुनाला आणि योगवासिष्ठात श्री वशिष्ठजींनी भगवान रामचंद्रजींना गृहस्थाश्रम सोडण्याचा भाव दाखवला आहे' तर ही गोष्ट बरोबर नाही. जर गृहस्थाश्रम सोडावयास सांगितला असता तर अर्जुनाने आणि श्रीरामाने तो सोडला असता. अर्जुन तर गृहस्थाश्रम सोडावयास तयारच होता. भगवंताने उपदेश करून अर्जुनाला युद्धाला प्रवृत्त केले. भगवंत म्हणतात -

***तस्मात् सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च।*** (गीता ८/७)

'तू सदा सर्वकाळ सतत माझे स्मरण कर आणि युद्ध ही कर'.

दुसऱ्या अनेक ठिकाणी भगवंताने याच आशयाची वचने सांगितली आहेत. 'निष्काम भावाने कर्म करत संसारात रहा' 'माझे ध्यान करत, मन आणि बुद्धी माझ्याठायी ठेवून स्वार्थत्याग करून सांसारिक कर्म कर, माझ्या कृपेने तुझा उद्धार होईल' गृहस्थाश्रम सोडण्यास कुठेही सांगितलेले नाही.

तुम्ही लिहिले आहे की, 'मला वाईट सोबत नाही'. तर हे मलाही ज्ञात आहे की, तुम्हांला फार वाईट सोबत नाही, पण संसार, सांसारिक पदार्थ, भोग, धन आणि सांसारिक सुख देणाऱ्या वस्तूंचे ज्या प्रेमाने चिंतन करता, ती वाईट सोबतच आहे, कुसंगच आहे. एका श्रीनारायण देवाचे भजन, ध्यान आणि सत्संग सोडून बाकी सर्व कुसङ्गच आहे.

तुम्ही लिहिले आहे की, 'सुग्रीव, उद्धव आणि अर्जुनाचा मित्र बनून भगवंताने त्यांच्यावर फार कृपा केली. त्यांच्यासारखी कृपा दुसऱ्या कोणावरच

झाली नाही. आणि असे असूनही सुग्रीव, उद्धव आणि अर्जुनाला ज्ञान झाले नाही.' तुम्ही जे समजता ते चूक आहे. मलातरी असे वाटते की, त्यांना अवश्य ज्ञान झाले होते. त्यांचा उद्धार झाला, त्यात काय मोठे विशेष ? भगवंताचे भक्त किंवा सखा यांची ज्यांच्यावर कृपा होते, त्याला सुद्धा ज्ञान प्राप्त होते आणि तो या असार संसाराचा सागर तरून जातो.

भगवंताचा नाम-जप, प्रेम भक्ती आणि भगवंताच्या कृपेमुळे माणसाचा उद्धार होतो. भगवंत स्वतःच त्याला बुद्धियोग देतात. भगवंत म्हणतात -

*मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् ।*
*कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ॥*

*तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।*
*ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ॥* (गीता १०/९-१०)

ते सतत माझ्यात मन लावणारे, माझ्यात प्राणार्पण करणारे भक्तजन नेहमीच माझ्या भक्तीच्या चर्चेद्वारा आपआपसात माझा प्रभाव समजून गुण आणि प्रभावासहित माझे कथन करीत संतुष्ट होतात आणि माझ्यात (वासुदेवात) सतत रममाण असतात. त्या सतत माझ्या ध्यानात असणाऱ्या आणि प्रेमाने भजणाऱ्या भक्तांना मी तो तत्त्वज्ञानरूप योग देतो की, ज्यामुळे ते मलाच प्राप्त होतात.

तुम्ही लिहिले आहे की, 'कोणत्या कृपेने उद्धार होऊ शकतो ?' तर खाली दिलेल्या श्लोकांप्रमाणे भगवंताला शरण जावयास हवे.

*तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।*
*तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥* (गीता १८/६२)

'हे भारता ! सगळ्या प्रकारे त्या परमेश्वरालाच अनन्यभावे शरण जा. त्या परमेश्वराच्या कृपेमुळेच परमशांती आणि सनातन परमधाम प्राप्त होईल.'

*सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।*
*अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥* (गीता १८/६६)

सर्व धर्मांना अर्थात् सम्पूर्ण कर्मांच्या आश्रयाचा त्याग करून केवळ एका मला सच्चिदानन्दघन वासुदेव परमात्म्यालाच अनन्य भावाने शरण जा. मी तुला संपूर्ण पापांपासून मुक्त करीन, तू शोक करू नकोस.'

सतत भगवंताचे चिंतन करण्यानेच अशी शरणागती येते आणि अशाप्रकारे भगवंताच्या कृपेमुळे ज्ञान प्राप्त करून निश्चयाने परमपद प्राप्त करतो. भगवंताच्या या कृपेमुळे भगवंताची भेट होते आणि जीवांचा उद्धार होतो. या सगळ्या गोष्टी नीट समजावयास हव्यात.

तुम्ही विचारले आहे की, 'मला संसारात राहून काय करावयास हवे ?' त्याचे उत्तर वर दिलेच आहे. भगवंताचा गुणानुवाद, प्रभाव आणि प्रेमाच्या गोष्टी वाचावयास आणि ऐकावयास हव्यात. प्रत्येक क्षणी भगवंताचा नाम-जप आणि स्वरूपाचे ध्यान करत-करतच आसक्ती आणि स्वार्थ सोडून सांसारिक काम करावयास हवे. आसक्ती सुटली नाही तरी काही हरकत नाही. सगळे काही भगवंताचेच आहे, असे समजून गुमास्ता मालकासाठी सगळे काम करतो त्याप्रमाणे स्वत:चा स्वार्थ सोडून सांसारिक कामे भगवंतासाठीच करावयास हवीत.

तुम्ही लिहिले आहे की, 'उपदेशाचे सदावर्त मलासुद्धा यात्री समजून द्यावयास हवे.' तर उपदेश देणारा मी कोण ? तरीही तुमची आज्ञा मानून माझ्या मताप्रमाणे शास्त्रांमधील काही गोष्टी लिहिल्या आहेत.

तुम्ही लिहिले आहे की, 'संसारात तर दु:खच आहे' तर ही गोष्ट बरोबर आहे. संसारात कसलेच सुख नाही. जे काही सुख दिसते, तो सुखाचा आभास आहे. शेवटी तर दु:खच दु:ख आहे.

महाराज दशरथ आणि वासुदेवाविषयीचे समाचार वाचले. ते लोक धन्य होत. ज्यांच्या घरी भगवंताने जन्म घेतला. वरवर पाहता त्या लोकांना फार सांसारिक दु:ख भोगावे लागले. पण शेवट त्यांचा संसारातून उद्धार झाला. त्यांना नेहमीसाठी आनन्दघन परमात्म्याची प्राप्ती झाली. माझ्या मानण्याप्रमाणे त्यांना पुनर्जन्म नसेल. त्यांच्या उद्धाराविषयी मला शंका नाही. त्यांना सांसारिक क्लेश झाले हे खरे. आधी केलेली काही पापे शिल्लक असतील ती भोगून ते शुद्ध झाले आणि भगवंतांनी त्यांच्या घरी अवतार घेतल्यामुळे त्यांचा उद्धार

झाला. ते पुण्यात्मा होते. पाप-पुण्य सर्वांना असते, कोणाचे पाप जास्त असते तर कोणाचे पुण्य जास्त असते.

श्री दशरथ आणि श्री वासुदेव पहिल्या जन्मात भगवंताचे मोठे भक्त होते. कदाचित पूर्वजन्मीची काही पापे शिल्लक असतील. त्या सगळ्या पापांना भोगून भक्तीच्या प्रतापाने पापांचा नाश झाल्यावर शेवटी त्यांचा या भवसागरातून उद्धार झाला.

तुम्ही विचारले आहे की, 'संसारात जीवांना सुख तर दिसत नाही. तरीही जीव संसारात का भटकत राहतात ?' तर याचे कारण म्हणजे मूर्खपणा व अज्ञान. त्यांनी चुकून संसारात सुख आहे असे मानले आहे, मृगतृष्णेच्या जलाप्रमाणे संसारात भ्रामक सुख भासते. म्हणून मूर्खपणामुळे मृगाप्रमाणे भटकत फिरतात.

तुम्ही विचारले आहे की, 'या जीवाला सुख कसे मिळेल ?' तर भगवंताच्या भक्तीमुळे सुख मिळते. कारण भक्तीतच सुख आहे. भक्तीमुळे भगवंत भेटतो आणि मग सदासाठी पूर्ण आनंद मिळतो. गीता अध्याय ६ श्लोक ११ ते ३२ पर्यंतचा अर्थ वाचावयास हवा. त्यानुसार भजन, ध्यान केल्याने अपार सुखाची प्राप्ती होऊ शकते. मग कधीही दुःख होऊ शकत नाही. मग असा आनंद वाटतो की, त्यासारखा दुसरा आनंद नाही व त्याचा कधी नाशही होत नाही.

तुम्ही विचारले आहे की, 'संसारात राहून कसे वागावे ?' ते ठीक आहे. वडील माणसांवर श्रद्धा, समवयस्कांबरोबर मैत्री, लहानांचे पालन करण्याचा भाव ठेवून सर्वांची सेवा करावयास हवी.

[ ४५ ]

मला कळले आहे की, हिंदू-मुसलमानांच्या बाबतीत तुम्ही फार उद्विग्न झाला आहात आणि चिंता करीत आहात. माझ्या मताप्रमाणे ही फार लाजेची गोष्ट आहे. परोपकारात जीवन घालविणे उत्तम आहे. त्यातच आनंद मानावयास हवा. लोकसेवा करणाऱ्यांवर मोठ-मोठी संकटे येतात. पण त्यासाठी ते कधी

दु:ख करीत नाहीत. त्यात घाबरण्यासारखे आहेच काय ? जर तुम्ही लोकहितासाठी न्यायसंगत प्रयत्न केलात आणि म्हणून तुमच्यावर संकट आले तर त्यासाठी तुम्हांला आनंद वाटावयास हवा.

जर तुम्ही निर्दोष असाल तर नुकसान होणार नाही, असा विश्वास हवा आणि जर दोषी असाल तर शिक्षा भोगण्यासाठी आनंदाने तयार व्हावयास हवे. आणि तुम्ही जर असे समजत असाल की, दोष नसतानाही लोकहित करताना तुमच्यावर हे संकट आले आहे, तर एखाद्या वीराप्रमाणे प्रसन्न चित्ताने तुरुंगात जावयास हवे. किंवा सप्रमाण स्वत:ला निर्दोष शाबीत करावयास हवे. रडणे, चिंता करणे किंवा लपणे भ्याडपणाचे लक्षण आहे. भ्याडपणा फार वाईट गोष्ट आहे. गीता अध्याय २ श्लोक २, ३ चा अर्थ समजून भ्याडपणाचा त्याग करावयास हवा. इथे वीरताच मुक्तीचा हेतू आहे. भ्याडपणाने जगणे मरणा समान आहे. शूरतेने प्राणत्याग करणे लाभदायी आहे. तोच धर्म आहे. (गीता अध्याय २ श्लोक ३७, ३८ आणि अध्याय ३ श्लोक ३५ चा अर्थ पहा.) तुम्ही जर इथल्या सामान्य वॉरंटाला इतके घाबरता, तर त्या मोठ्या यमराजाचे वॉरंट निघाल्यावर तुमची काय दशा होईल ? तुम्हांला तर ते वॉरंट निघाले तरी घाबरता कामा नये. शरीर तर एक दिवशी जाणारच आहे. मृत्यू अटळ आहे. मग चांगले काम करता-करता जाऊ, ते अधिक चांगले. कैद तर सोडाच, पण परोपकार करताना फासावर लटकावे लागले तरी फार आनंदाची गोष्ट आहे. भित्रेपणाने काही दिवस जगलो, तरी त्याला काय अर्थ आहे ?

तुम्हांला त्यात तुमचा अपमान वाटतो का ? अपमान तर भित्रेपणात आहे, वीरतेत नाही. धर्माच्या त्यागात आहे, धर्माच्या रक्षणात नाही. दुसरे काही झाले नाही तरी जे काही देवाच्या मर्जीप्रमाणे घडते, त्यात प्रसन्न राहावयास हवे. विचारांनी किंवा हट्टांनी कशाही प्रकाराने शोक, चिंता आणि दु:खाला हटवून प्रत्येक क्षणी कुठल्याही अवस्थेत आनंदमग्न रहावयास हवे. भजन, ध्यानाचा सतत प्रयत्न करून या गोष्टीवर विश्वास ठेवावयास हवा की जे काही होते ते भगवंताच्या दयेने होते आणि त्यातच कल्याण आहे.

[ ४६ ]

तुम्ही लिहिले आहे की, 'सध्या भजन, ध्यान आणि सत्संग माझ्याच्याने होत नाही'. तर भजन, ध्यान वगैरे करण्याचा प्रयत्न करावयास हवा. नाहीतर फार कठीण समस्या आहे.

द्रव्योपार्जनासाठी व्यापार करण्यात तुमच्याकडून परिश्रम होतात. पण स्वत:च्या खऱ्या कल्याणासाठी प्रयत्न होत नाहीत. ह्यावरून असे दिसते की, तुम्ही भजन, ध्यान आणि सत्संगाला धनासमानसुद्धा मानत नाही. तुम्हांला विवेकाने विचार करावयास हवा की, हे नश्वर धन मृत्युसमयी तुमची मदत करू शकेल ? धनाने तुम्हांला भगवंतासंबंधी आनंद मिळू शकेल ? असे कधी होणार नाही. कारण तिथे कोणी लाच घेणारे नाही. परलोकाची गोष्ट दूर राहिली. धनामुळे इहलोकीसुद्धा वास्तविक सुख मिळू शकत नाही. संसारात मूर्खांनाच सुख प्रतीत होते. विवेकी पुरुषांना तर सांसारिक सुख दु:खरूपच आहे. महर्षी पतञ्जली म्हणतात -

*'परिणामतापसंस्कारदु:खैर्गुणवृत्तिविरोधाच्च दु:खमेव सर्वं विवेकिन:'*

संसारात जर खरोखरच वास्तविक सुख असते, तर ऋषि-मुनिगण सांसारिक सुखांचा त्याग करून तपस्येसाठी वनात का जाते ? तुम्हांला जर तुमचे कल्याण व्हावे असे वाटत असेल तर निष्काम भावनेने प्रेमाने परमेश्वराच्या पवित्र नावाचा सतत जप करण्याचा प्रयत्न करावयास हवा. त्या वास्तविक खऱ्या निष्कामी परमप्रिय परमेश्वराच्या प्रेमाला कलंक लावता कामा नये.

जो माणूस या असार संसाराच्या तुच्छ, अनित्य आणि क्षणभंगुर भोगांमध्ये अडकून भगवद्भजन, ध्यान, सत्संग सोडतो तो महामूर्ख आहे. शेवटी त्याची फार दुर्दशा होते. म्हणून तुम्हांला अशा अधोगतीच्या गर्तेत नेणारे कार्य चुकूनही करता कामा नये.

॥ ॐ श्रीपरमात्मने नमः ॥

# उद्धार कसा होईल ?

[ १ ]

तुम्ही जगात काय सांगून आला होता ? प्रतिज्ञा मोडणे केवढे मोठे पाप आहे ? धन यौवन अस्थिर आहे. केवळ भगवत्प्रेम आणि भक्तीच स्थिर आहे. ती मिळवावयास हवी. मनरूपी नटाला केवळ भगवच्चरणरूपी स्तंभावर चढवत राहिल्यानेच त्याची चंचलता संपेल. या असार संसारात केवळ राम-नामातच सार आहे ! संसाराची असारता जुने भग्नावशेष आणि स्मशान पाहिल्यावर प्रत्यक्ष प्रतीत होते. समुद्राच्या पाण्यात मीठ, लाकडात अग्नी आणि दुधात तूप ज्याप्रमाणे प्रच्छन्नरूपाने विद्यमान असते, त्याप्रमाणेच परमात्मा सगळ्या जीवांच्या ठाई असतोच. त्याच्या नित्य ध्यानानेच कल्याण-प्राप्ती होते. तुम्ही भगवंताला (मालकाला) का विसरता ? स्त्री, पुरुष आणि धन काय कामाचे? प्राण जातेवेळी कोणीही मदत करू शकणार नाही. शरीर सुद्धा बरोबर येणार नाही. केवळ केलेले कर्मच बरोबर असते. तुम्ही त्या ईश्वराशी मैत्री का करत नाही ? त्याच्याशिवाय प्रभू आणि प्रेमी दुसरा कोण मिळेल ? असा हितैषी दुसरा कोण आहे ? *'उमा राम सम हितु जगमाहीं। गुरु पितु मातु बन्धु कोऊ नाही ॥'*

सगळे स्वार्थाने प्रेम करणारे आहेत. मग तुम्ही त्या ईश्वरावर का प्रेम करत नाही ? प्रभू तर तुमच्याजवळ काहीच मागत नाही. फक्त त्याचे सतत स्मरण ठेवले पाहिजे. त्याच्या नावाचा जप आणि ध्यानच सर्वस्व आहे. जप केल्यामुळे ध्यान आपोआप होऊ लागते.